आस्तित्व

मधु सोंनवणे

म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क. २९७९

REFBK-0023450

विश्व ो स्वतःचे अस्तित्व टिकविण्यासाठी आहे. मानवाची धडप व चालते. मानव हा विश्वाचाच अंश आहे. दोघांचा हेतू एकच असला पाहिजे. मग विश्वात कांहीचें, उदा. तारे, अस्तित्व हे अनन्त काळापासून चालत आलेले आहे व अनन्त काळापर्यंत चालत राहील. पण मानवाचे अस्तित्व त्या मानानें क्षणभंगूर ठरते. मानवाला मिळालेल्या निर्मिती शक्तीच्या सहाय्याने अनन्त काळापर्यंत अपले अस्तित्व टिकविणे त्याला शक्य होईल काय ? कोणत्या मार्गाने?

सं. निबंध

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

(क्र. मा. प.)
५०००-४-८०

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२९१
२३५५०
निबंध

प्रकाशिका :
मो. मीरा सोनवणे
मेघा प्रकाशन
आनंद भवन प्रताप मीलसमोर
धुळे–४२४ ००१

© मधु सोनवणे

प्रथम आवृत्ती :
डिसेंबर १९८१

किंमत : १५ रुपये

मुद्रणस्थळ :
प. बा. कदम
निलेश प्रिंटींग प्रेस
११३६–१, ब्राह्मण आळी
अलिबाग, जिल्हा–रायगड

काही शब्द

जग ज्या नवविचार प्रणालीच्या शोधार्थ आहे, जी मानवाची त्याच्या सर्वनाशाच्या संकटापासून सहीसलामत सुटका करू शकेल, अशी मी मांडलेली 'अस्तित्व' पुस्तकातील नवविचार प्रणाली मानवाची सुटका करून प्रगतिला विलक्षण गति देण्यास प्रेरणादायी ठरेल, ही माझी धारणा आहे.

आजच्या ज्वलंत समस्यांची व भयंकर संकटाची पाया मुळे कशी व कोठे दडून बसलेली आहेत हे ह्या नवविचार प्रणालीत दाखविलेले आहे. धर्म, राष्ट्र, कुटुंब या कल्पना मानवाला घातक ठरतात. त्यांचा फेरविचार करून फेररचना करण्यास ही नवविचार प्रणाली पाया ठरेल. ही नवविचार प्रणाली शास्त्रिय पायावर उभी केलेली आहे. कार्ल मार्क्स ह्या नवविचार प्रणालीने अपूर्ण सिद्ध होतो.

मानवी जीवन ज्या तत्वांवर आधारलेले आहे, ती तत्वे चुकीच्या कल्पनेवर आधारलेली आहेत. 'ईश्वर' ही एक चुकीची कल्पना आहे. केवळ ती चुकीचीच नव्हे तर मानवाला घातक ठरलेली आहे. ती धर्मात मांडण्यात आली आहे. धर्मात सांगितलेल्या पद्धतीनेच 'ईश्वरी' अस्तित्व जाणून घ्यावे लागते. धर्माशिवाय ईश्वरी अस्तित्व कोठेही जाणवत नाही. अनाकलनीय घटनांचा उपयोग धर्म ईश्वरी कल्पना मानवावर बिंबवण्यासाठी करुन घेतो. मानसशास्त्रीय युक्त्यांनी ईश्वर खोल विंबवला जातो. धर्म मानवात पिळवणूक प्रवृत्ती जोपासतो.

ईश्वर या कल्पने प्रमाणेच राष्ट्र, कुटुंब या कल्पना मानवानेच निर्माण केलेल्या आहेत. आज त्याला त्या नैसर्गिक वाटतात. त्यावर मानवी जीवन उभे आहे. त्या कल्पना खरोखरच हितकारक आहेत काय ? अशी शंकाही त्याला येत नाही.

'राष्ट्र' हीं अत्यंत घातक कल्पना आहे. तिने मानवाची प्रचंड हत्त्या घडविली आहे. ती प्रगतीला मोठा अडसर ठरते. निसर्गनिर्मित

साधनसामुग्रीवर मानवाला मालकी हक्क सांगण्याचा अधिकार पोहचत नाही. निसर्गनिर्मित साधनांवर मालकी हक्क प्रस्थापित करून निसर्गाने दिलेल्या त्या साधनांचा उपभोग घेण्याच्या अधिकारावर त्याने अतिक्रमण केलेले आहे. 'राष्ट्र' हे असे अतिक्रमण आहे.

कुटुंब हे पिळवणूक प्रवृत्तीचे नागडे दर्शन घडविते. ती अहितकारक कल्पना आहे. निसर्गातील पशू–पक्षी यांचे जीवन बघितल्यास ते लक्षात येते. नर मादी यांच्यातील लैंगिक संबंध ऐच्छीक असतो. त्यांच्यावर कोणतेही बंधन अथवा जबरदस्ती नसते. लग्नबंधनाखाली कुटुंबातील स्त्री व पुरुष यांच्यातील संबंध हे, पुरुषाचे स्त्रीवरील लादलेले लैंगिक क्रीयेची शक्ती या स्वरुपात असतात. पुरुषाला हवे तेव्हा लैंगिक सुख मिळवता येते. स्त्रिच्या संमत्तीचा विचार न करता. आर्थिक परावलंबित्व धार्मिक भीती, सामाजिक दडपण यांच्या सहाय्याने स्त्रीचा विरोध मोडून काढला आहे. कुटुंबातील पुरुष स्त्रीची पिळवणूक करतो, ते संस्कार मुलांवर कळत नकळत पडतात. त्यातून मुलांमध्ये पिळवणूकीची बीजे रुजविली जातात.

संस्कृती, शिक्षण, इतिहास, नीतिमूल्ये इत्यादींचा फेरविचार करणे क्रमप्राप्त आहे.

दुसऱ्या महायुद्धात अणुबॉम्बचा अनुभव घेतलेल्या मानवाने न्यूट्रॉन बॉम्ब तयार करावा याचा अर्थ काय ? त्याचा अर्थ स्पष्ट आहे. ज्या कल्पनांच्या तत्वावर मानव जगत आहे, त्या त्याला त्याच्या विनाशाकडे फरफटत घेऊन जात आहेत. हे असेच चालत राहिल्यास मानव जातीचा विनाश अटळ आहे.

मानवाची सर्वनाशाच्या संकटापासून सुटका व्हावी आणि तो सुखी व चिरंतन व्हावा ह्या एकमेव उद्देशाने हा प्रयत्न केलेला आहे.

मधु सोनवणे



॥ संकट ॥

मानवाने केलेली प्रगती ही जगातील बहुसंख्य लोकांचे दारिद्र्य नष्ट करू शकली नाही. परंतु त्याने निर्माण केलेली मानवाच्या संहाराची साधने मानव जातीचा कितीतरी वेळ संहार करू शकतील एवढी सामर्थ्यशाली आहेत.

जग आजच्या या सर्व नाशाच्या संकटाची जाणून बुजून भलावणी करीत आहे. त्याची भयानकता आमच्या लेखी नाही असा आभास निर्माण करीत आहे. वावरते आहे मात्र त्याच्याच दडपणाखाली. सर्वनाशाची भयानकता आमच्या लेखी नसल्याचा जो आभास निर्माण करण्याची प्रवृत्ती आज दिसून येत आहे तीच जास्त घातक ठरणार आहे.

विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात जेवढे मानव मारले गेले तेवढे मानव पृथ्वीतलावर अवतरल्यापासून कोणत्याच काळात मारले गेलेले नाहीत. एवढी प्रचंड मानवी हत्या होऊनही जगाने त्याची दखल घेतलेली नाही. त्याबद्दल दुःख केलेले नाही. त्याचे

प्रमुख कारण हे आहे की, हत्या मानवानेच केलेली आहे मानवाने केलेल्या कृत्यांबद्दल स्वतःला दोष देणे हे त्याच्या स्वभावात बसत नाही. एक चुकला तर दुसरा त्याची चूक त्याच्या पदरात घालू शकतो. परंतु जेथे अखिल मानव जातच चूक करते तिला कोणी सांगावे ती चुकते म्हणून ! आत्म परिक्षणाने ही चूक जाणून घेतली जाऊ शकते व त्या प्रमाणे सुधारणा घडवून आणता येते. परंतु आत्मपरिक्षण चांगली अद्दल घडल्याशिवाय केले जात नाही. गेल्या दोन महायुद्धांच्या घटनाही त्याला अद्दल घडवून आणण्यास असमर्थ ठरल्यात आणि यापुढे अद्दल घडू देण्यापर्यंत वाट पहात राहिल्यास त्यानंतर सुधारण्याचा प्रश्नच उद्‌भवणार नाही. तेव्हा सर्व मानवी संस्कृती नष्ट झालेली असेल.

आद्य–मानवाने त्याच्या अस्तित्वाला धोका निर्माण करणाऱ्या अजस्र व हिंस्र अशा प्राण्यांचा त्यांच्याशी संघर्ष करीत नाश घडवून आणला. प्राचीन मानवाने त्याच्या विरुद्ध असणाऱ्या निसर्गाला यशस्वीपणे प्रतिकार करून आपले अस्तित्व अबाधीत ठेवले. त्या नंतरच्या काळात थैमान घालणाऱ्या रोगराईचे उच्चाटन करून त्याच्या संकटापासून स्वतःची मुक्तता करून घेतली आणि आजचा मानव तर प्रयोग-शाळेत मनुष्य निर्माण करण्याच्या प्रयत्नापर्यंत येऊन पोहोचला आहे. प्रचंड निसर्गावर इवल्याशा मानवाने आपल्या विजयश्रीचा झेंडा दिमाखाने रोवला आहे. परंतु नामोहरम झाला आहे तो स्वतःपुढे. यासारखा दुष्ट विनोद दुसरा असेल काय ?

मानवाने स्वतःच्या विकासासाठी धर्म, राजकीय विचार प्रणाली, आर्थिक विचार पद्धती, समाज रचना, संस्कृती, शिक्षण, विविध प्रकारची शास्त्रे इ. निर्माण केलेली आहेत. वेळोवेळी त्यांचा उपयोगही करून घेतला आहे. हे सर्व अमलात आणीत असताना त्याची त्याची स्वतःचीही एक गती होती. त्या गतीमान भूमिकेत ही असताना त्यांनी मानव जातीवर कोणते परिणाम घडवून आणले

याचा बारकाईने, सखोल व दुरोगामी परिणामांच्या दृष्टीने विचार झालेला नाही. तसा विचार झाला असता तर आजचा स्वतःला कडेलोट करून घेण्याचा बाका प्रसंग मानवावर उद्‌भवला नसता.

धर्म, राजकीय विचार, धर्मकारण, शिक्षण, सामाजिक रचना, संस्कृती, इतिहास, तत्वज्ञान, नीतिमूल्ये इत्यादींचा फेर विचार त्या नवीन भूमिकेतून करून पाहिला पाहिजे. ते मानव जातीच्या चिरंतन अस्तित्वासाठी व संपूर्ण विकासासाठी आवश्यक झालेले आहे. त्याच्यात आता कुचराई करून चालणार नाही. हे परिक्षण अत्यंत निर्भिड व कठोरपणाने करावे लागेल. ते करीत असताना कोणत्याही प्रकारची कुचराई, पक्षपातीपणा, पूर्वग्रहदुषितता, कानाडोळा, भीति, दयाळूपणा इत्यादींची बाधा होता कामा नये. नाहीतर आता ते आत्मघातकी ठरेल. अशा परिक्षणाला आज तरी पर्याय दिसत नाही. वेळोवेळी इतिहासात ज्या त्याज्य परिस्थितीचे परिक्षण करून नवीन पोषक परिस्थिती निर्माण करण्यासाठी विविध विषयांवरील विचार मांडण्यात आलेत, त्या विचारांवर वरील पैकी बऱ्याच बाबींची बाधा झालेली दिसून येते. त्याचा परिणाम बऱ्याच वेळा पुढे चालून ती बदललेली परिस्थिती मानवाला जास्त घातक ठरलेली आहे.

निकोप प्रगती घडवून आणण्याच्या उद्देशाने विचार मांडण्यात येतात. प्रगती ही त्यांच्या विचारावर आरूढ होऊन दौड करीत असते. हे विचार धार्मिक, राजकीय, आर्थिक, सामाजिक इत्यादी क्षेत्रांसंबंधी मांडण्यात आलेले असतात. जुने विचार प्रगती घडवून आणण्यास जेव्हा असमर्थता दर्शवू लागतात, तेव्हा त्यांना त्याज्य ठरविण्यात येते व त्यांची जागा नव्या विचाराने भरून काढण्यात येते. नवे विचार मांडताना प्रगतीची स्वप्ने दाखविलेली असतात. परंतु ते विचारही प्रगती घडवून आणण्यास असमर्थ ठरतात, तेव्हा त्यांचाही त्याग केला जातो व त्यांच्या जागेवर नवीन विचारांना बसविले जाते. नवे विचार मांडताना भावी जीवनाबद्दल स्वप्ने

रंगविण्यावरच भर दिलेला असल्याचे दिसून येते. परंतु जुन्या विचारांना त्याज्य ठरविताना त्यांना त्याज्य ठरविणाऱ्या कारणांचा सखोल विचार करण्यात आलेला नाही असे आढळून येते. ते विचार त्याज्य ठरविताना त्यांच्या कारणांच्या इतर परिणामानाच कारण समजण्यात आले. त्यामुळे प्रत्येकवेळी विचार त्याज्य ठरविताना त्यांच्या कारणांचा मागमुस न लागल्यामुळे ते नष्ट होऊ शकले नाहीत. त्यामुळे नव्या विचारांना परत तीच कारणे घातक ठरलीत व ती त्यांनाही निरुपयोगी करीत आलीत. त्याच कारणांनी कोणतीच विचारप्रणाली मानवाचा निकोप विकास घडवून आणण्यास समर्थ ठरू दिली नाही. हे केवळ विचारांना त्याज्य ठरविणाऱ्या कारणांचा पूर्ण शोध न घेतल्यामुळे सर्वांगिण व निकोप प्रगती घडवून आणण्यास मानव असमर्थ ठरत आहे.

जुन्या विचारांचा त्याग करताना त्यातून जी प्रगती निर्माण झाली होती तिला मात्र स्वीकारण्यात येत होते. परंतु प्रगती करून घेताना ती ज्या विचारांवर आरूढ होऊन आली तिचा त्याग करताना त्याची फार मोठी किंमत मोजावी लागली आहे. नवे विचार अमलात आणताना त्यांचे पुरस्कर्ते व जुन्या विचारांचे समर्थन यांच्यात मोठा संघर्ष झडतो व त्यात बहुतेक वेळा त्याला त्याची प्रचंड मानवी शक्ति व साधने नष्ट करावी लागतात. विचार बदलाच्या क्रमात मानवाला मोठी हानी पोहोचते ती हानी त्याने मिळविलेल्या प्रगतीपेक्षा अधिक असते. आणि तरीही तो अद्याप त्याच विचारांच्या बदलाच्या क्रमात विसंबून आहे. त्या पद्धतीने बदलत जाणाऱ्या विचारांच्या क्रमातून होणारी प्रगती ही त्याचा निकोप व सर्वांगिण विकास घडू देणार नाही. विचारांच्या बदलाच्या क्रमातून निर्माण होणारी हानी थांबविण्यासाठी विचारांना त्याज्य ठरविणाऱ्या कारणांच्या सर्व घटकांचा शोध घेतला पाहिजे.

नव्या विचारांना निरुपयोगी करणाऱ्या घटकांमध्येच मानवी संकटावस्थेच्या कारणाची मूळे सापडतील. त्या घटकांना शोधून काढून

त्यांचे संपूर्ण उच्चाटन केल्यास मानवाची त्याच्या संकटापासून कायमची सुटका होऊ शकेल. नजरेआड असलेल्या त्या घटकांनी मानवी जीवन उध्वस्त करून ठेवले आहे. मानवाच्या प्रत्येक समस्या व संकटाची नांदी त्या घटकांपासून सुरू होत आहे. ते घटक शोधन काढण्यासाठी सर्व विचारांची कसून तपासणी, विचारांच्या बदलाचा क्रम सुरू झाल्यापासून करून पाहिली पाहिजे.

धार्मिक विचार, आर्थिक विचार, राजकीय विचार, तत्वज्ञानात्मक विचार इत्यादींचा त्यांच्या निर्मितीपासून विचार केल्यास काही निष्कर्श निघतात. धार्मिक विचार सोडल्यास इतर सर्व क्षेत्रातील विचारांचा बदल हा वरील विचाराच्या बदलाच्या क्रमाने घडत आला आहे. हे विचारांच्या इतिहासाचे अवलोकन करीत असताना चटकन लक्षात येते धार्मिक विचार हे ते निर्माण झाल्यापासून आजतागायत त्यांच्यात कोणताच बदल घडून आलेला नाही. इतर सर्व विचारांना विशिष्ट काळानंतर त्याज्य ठरवून बदलण्यात येते व त्या जागी दुसरे विचार अमलात आणले जातात, परंतु धार्मिक विचारांना ते मांडण्यात आल्यापासून त्याज्य ठरविण्यात आलेले नाहीत. म्हणून त्यांच्यात कोणताही बदल घडवून आणून नवीन विचार प्रस्थापना करण्याचा प्रश्न उद्‌भवला नाही. याचा अर्थ असा होतो की इतर विचारांवर जे घटक आपला प्रभाव पाडून त्यांना निरुपयोगी व त्याज्य ठरवितात, ते घटक धार्मिक विचारांवर आपला प्रभाव पाडण्यास असमर्थ ठरलेले असावेत म्हणून विचारांना त्याज्य ठरविणाऱ्या घटकांचा शोध घेण्याचा प्रयत्न धार्मिक विचारांची कसून तपासणी करीत गेल्यास यशस्वी होण्याची दाट शक्यता वाटू लागते.

प्रत्येक क्षेत्रावरील विचार हे त्या क्षेत्रातील समस्या व त्यांना सोडविण्यात आलेले तोडगे यांना जाणून घेण्याचे साधन आहे. विचार हे समस्यांचे स्वरुप विषद करीत असतात. समस्यांचे पूर्ण आकलन झाले नाही तर त्यांच्या विचारांमध्येही दोष निर्माण होत असतात.

समस्यांच्या विचारात निर्माण झालेल्या दोषांमुळे त्या समस्या सोडविण्यासाठी जे तोडगे केले जातात त्यांच्यातही दोष निर्माण होतो व त्यामुळे ते ती समस्या सोडविण्यास असमर्थ ठरतात. समस्या जितकी अधिक आकलन होते तितकी त्या विचारांची प्रगल्भता अधिक होते. जो पर्यंत समस्यांचे स्वरुप विचारांनी स्पष्ट केले जात नाही तोपर्यंत त्यावर परिणामकारक तोडगा काढणे शक्य होत नाही. विचारांची प्रगल्भता जेवढी अधिक तेवढा तोडगा अचूक तयार करता येतो. म्हणून विचारांना त्याज्य ठरविणाऱ्या घटकांचा शोध घेण्यासाठी त्या क्षेत्रातील परिस्थितीचाही व समस्यांचा ठाव घेण्याचाही प्रयत्न करून पाहिला पाहिजे. पुढे समस्यांचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

मानवाने तो या पृथ्वितलावर अवतरल्यापासून आजतागायत जी वाटचाल केली आहे ती समस्या व संकटे यांच्याशी संघर्ष करीत. या संघर्षात कधी तो विजयी होतो तर कधी पराजय स्विकारावा लागतो. तर कधी संघर्ष अनिर्णीत स्वरुपात तसाच चालू ठेवावा लागतो आहे. मानवी जीवन सुखकर व सुलभ व्हावे म्हणून त्याने चालविलेल्या प्रत्यत्नांमध्ये उभ्या राहिलेल्या अडचणी म्हणजे समस्या होय. तर त्याच्या अस्तित्वाला निर्माण होणारा धोका म्हणजे संकट होय असे ढोबळ मानाने मानता येईल. त्याच्या समोरील समस्या जेव्हा तो सोडविण्यास समर्थ ठरला की त्यातून त्याच्या समोर दुसऱ्या समस्या उभ्या राहात असतात. तर त्याला भेडसावणाऱ्या एका संकटावर मात केली की दुसरे संकट आव्हान देण्यास त्याच्या समोर येऊन उभे राहाते. प्रत्येक वेळी समस्या व संकटे यांचे स्वरुप व तीव्रता यांच्यात फरक झालेला असतो. समस्या व संकटे यशस्वी सोडविल्यामुळे अज्ञात परिस्थितीचे आकलन होऊन त्याच्या ज्ञानात अधिक भर पडत जाते व पुढची संकटे व समस्या यांना अधिक ताकदीने सामोरा जाऊ लागतो.

समस्या व संकटे यांची दोन विभागात विभागणी करता येईल. पहिल्या विभागात निसर्ग निर्मित समस्या व संकटे यांचा समावेश करता येईल व दुसऱ्या विभागात मानवनिर्मित समस्या व संकटे यांचा विचार करता येईल. निसर्गनिर्मित संकटे व समस्या म्हणजे ज्या समस्या व संकटे यांचे स्वरुप नैसर्गिक असते. मानव निर्मित समस्या व संकटे म्हणजे मानवाने स्वतः निर्माण केलेली समस्या व संकटे. निसर्गनिर्मित संकटे व समस्या सोडविली जात असताना त्यांच्या कडून प्रतिकार केला जात नाही आणि त्या एकदा सुटल्या की परत संकटाच्या व समस्यांच्या स्वरुपात त्याच्या समोर उभ्या रहात नाहीत. अधिक धान्य उत्पादन करण्याची समस्या आणि प्रचंड प्रमाणात प्राणहानी घडवून आणणारी, एखाद्या रोगाच्या साथीने उभे केलेले संकट यांना निसर्गनिर्मित समस्या व संकटे म्हणता येईल.

मानव निर्मित समस्या व संकटे हेच त्याच्या समोरील सर्वात मोठे अरिष्ट आहे. त्या समस्या व संकटे सोडविताना त्याला अत्यंत जिकरीचे प्रयत्न करावे लागतात व त्यात त्याची मोठी हानीही घडून येत असते. त्या सोडविल्या जात असताना त्यातून तीव्र प्रतिकार होत असतो. एखादी समस्या व संकट सोडविले गेले असल्यास ते नष्ट होत नाही तर त्याचे स्वरुप बदलून त्या नवीन पात्रिस्थात उभ्या रहातात. तेव्हा त्या अधिक गुंतागुंतीच्या व घातक ठरतात. हे त्या समस्या व संकटामागे जो प्रतिकार असतो त्यामुळे घडून येत असते. एका समस्येतून व संकटातून तो सुटकेचा निश्वास टाकतो न टाकतो तोच त्यातून दुसरी समस्या व संकटे उभी राहिलेली असतात. दारिद्र्याची समस्या व युद्धाचे संकट हे मानव निर्मित आहे. त्याचे आजचे स्वरुप हे अधिक गुंतागुंतीचे व घातक ठरले आहे. दारिद्र्य व युद्ध हे मानवासमोरील सर्वात मोठी समस्या व संकट ठरले आहे.

विश्वातील सर्व निसर्गनिर्मित साधनांवर सर्व मानव जातीचा सारखाच अधिकार पोहोचतो. ज्या निसर्गाने मानवाला निर्माण केले आहे त्याच निसर्गाने ती साधने निर्माण केली आहेत. प्रत्येक मानवाला या निसर्ग निर्मित साधनांचा उपयोग आपला विकास करून घेण्यासाठी सारखाच अधिकार पोहोचतो. परंतु त्यांच्यावर मालकी हक्क प्रस्थापित करून त्यांचा उपयोग करून घेताना इतर मानवांना त्यांचा उपयोग करून घेण्यास प्रतिबंध कोणीही करू शकत नाही. या निसर्गनिर्मित मानवाच्या जीवनाचा हेतू सुखप्राप्ती करून घेणे हा आहे आणि सुख हे गरजांच्या पूर्तता करणाऱ्या साधनांच्या उपभोगातून मिळत असते. ती साधने निसर्ग निर्मित असतात. ज्या निसर्गाने सुखप्राप्ती हा हेतू ठेवून त्याला निर्माण केले आहे त्याच निसर्गाने त्याचा हेतू साध्य करण्यासाठी साधने निर्माण केलेली आहेत. त्यावरून मानवाने सुखप्राप्ती करून घेण्यासाठी निसर्ग निर्मित साधनांचा उपयोग करून घ्यावा अशी या निसर्गाच्या निर्मिती मागील योजना असावी हे सिद्ध करता येते. निसर्ग निर्मित साधनांवर मालकी प्रस्थापित करण्याचा हक्क त्याने निसर्गातील कोणत्या तत्वाने राखून ठेवला आहे हे अद्याप त्याला स्पष्ट करता आलेले नाही. काही मानवानी निसर्गनिर्मित साधनांवर आपली मालकी प्रस्थापित करून इतराना त्यांचा उपयोग करून घेण्यास प्रतिबंध करून निसर्ग योजनेत हस्तक्षेप केला आहे. त्याचीच परिणिती मानव जातीमध्ये असमतोल निर्माण करण्यात झाली व त्याचाच दुष्परिणाम म्हणून प्रत्येक पळी त्याच्या अस्तित्वाला झळ पोचत आली आहे.

मानव निर्मित राष्ट्र या कल्पनेने निसर्ग योजनेत हस्तक्षेप केलेला आहे. मानव जेव्हा विशिष्ट प्रदेशाला स्वतःचा देश मानीत असतात तेव्हा ते सामुहिकरित्या त्या विशिष्ट भू प्रदेशातील निसर्ग निर्मित साधनांचा उपयोग स्वतःसाठी करून घेण्याचा मालकी हक्क सांगत

असतात आणि इतरांना त्या विशिष्ट भू प्रदेशातील निसर्ग निर्मित साधनांचा उपयोग करून घेण्यास प्रतिबंध करतात.

राष्ट्र या कल्पनेने निसर्ग योजनेस मोठ्या प्रमाणात धक्का पोहोचवला आहे त्यामुळे मानवजातीतील समतोल मोठ्या प्रमाणात ढासळलेला आहे.

राष्ट्राच्या सीमारेषांनी जो भू प्रदेश व्यापलेला असतो त्यात जी निसर्ग निर्मित साधने असतात त्यांचा उपयोग स्वतःसाठी करुन घेण्यास व त्यांचा उपभोग दुसऱ्या राष्ट्रातील मानवाना घेता येऊ नये यासाठी मानवाची सर्व शक्ति खर्ची पडत असते. विश्वात निसर्गाने अमर्याद साधने निर्माण करून ठेवली आहेत. त्यांचा शोध घेऊन त्यांचा उपभोग घेण्याकडे त्याने त्यामुळे दुर्लक्ष केलेले आहे. राष्ट्रीय भू प्रदेशातील निसर्ग निर्मित साधनांच्यावर सर्व लक्ष केंद्रित करून त्याचा विकास त्याने स्वतःहून सिमित करून ठेवला आहे.

राष्ट्र ही एक मानव निर्मित समस्या आहे. तिने निसर्ग योजनेला बाधा निर्माण केली आहे. मानवाच्या विकासास ती मोठा अडसर ठरते. राष्ट्र ही कल्पना मानवाला अजूनही त्याच्या सामर्थ्याची व कर्तृत्वाची पूर्ण न झालेली जाणीव दर्शविते. तशी जाणीव त्याला असती तर त्याने राष्ट्र ही कल्पना कधीच झुगारून दिली असती. सर्व मानवजातीला पृथ्वीवरील निसर्ग निर्मित साधनांचा उपयोग मुक्तपणे करु दिला असता तर त्यामुळे जो विकास घडून आला असता तो आजच्या पेक्षा कितीतरी पटीने अधिक राहिला असता व मानवी हत्याही घडून आली नसती.

उपलब्ध निसर्ग निर्मित साधनांवर मालकी हक्क प्रस्थापित करण्यासाठी मानवाने केलेल्या प्रयत्नांच्या मालिकेचे दर्शन इतिहासात प्रकर्षाने घडते. त्या मानाने त्याने निसर्ग साधनांच्या शोधार्थ केलेले प्रयत्न हे अत्यंत अल्प प्रमाणात आहे. उपलब्ध निसर्ग निर्मित साध-

नांच्या उपयोगानेच त्याने आजची बहुतेक सर्व मानवी प्रगती घडवून आणलेली आहे व त्यातच तो स्वतःला धन्य समजतो आहे. परंतु त्याने संपूर्ण मानवी सामर्थ्याचा उपयोग करून घेतला असता तर अमर्याद निसर्ग साधनांच्या उपयोगाने त्याने समस्त विश्वाचा राजा म्हणून स्वतःचा अभिषेक करून घेतला असता. अद्याप त्याला त्याच्या सामर्थ्याची पूर्ण जाणीव झालेली नाही. तशी जाणीव त्याच्यात राहिली असती तर त्याने स्वतःला तुटपुंज्या प्रगतीने धन्य मानून स्वतःला राष्ट्रीय कल्पनेत सीमित करून ठेवले नसते व मानवी विकास घडवून आणण्याचा जो नैसर्गिक मार्ग होता तो सोडून देऊन अधोगती व आत्मनाशाची वाट त्याने स्वतः होऊन चोखाळली नसती.

मानवासमोर मोठी समस्या आहे ती त्याच्या दारिद्र्याची. निम्म्यापेक्षा जास्त मानवी जात ही दारिद्र्य अवस्थेतून स्वतःला सोडवून घेण्यास त्रस्त झालेली आहे. अन्न, पाणी, निवारा यांचा त्यांना योग्य प्रमाणात पुरवठा होत नाही. त्यांच्या मुलभूत गरजा भागवल्या जात नाहीत. पूर्वी मानवात ज्ञानाच्या अभावामुळे उपलब्ध साधनांचा उपयोग मूलभूत गरजा भागविण्यासाठी योग्य प्रकारे करु शकत नव्हते. तर आज मुलभूत गरजा भागविण्याच्या साधनांवर काहींनी आपले नियंत्रण प्रस्थापित करुन ठेवले आहे. एकीकडे भूकबळी पडत असताना दुसरीकडे हजारो टन धान्य समुद्रात बुडविले जाते. भारतात उपोषणामुळे मृत्यूचे प्रमाण अधिक आहे. मुलभूत गरजा भागविणाऱ्या साधनांवर नियंत्रण प्रस्थापित करून दारिद्र्य निर्माण केले आहे.

दारिद्र्यात असलेल्यांवर वर्चस्व निर्माण करण्याचे हुकमी हत्यार म्हणून मुलभूत गरजा भागविणाऱ्या साधनांचा उपयोग करून घेतला जात आहे. त्याचा परिणाम ते कमी न होता वाढतानाच दिसत आहे. जितके दारिद्र्य अधिक तितके वर्चस्व अधिक घट्ट होत असते. या सुत्राने मानवात दारिद्र्य निर्माण करून ते विशेष प्रयत्नांनी टिकविले आहे.

कधी कधी एखादी व्यक्ति दारिद्र्याचा उपयोग त्यांच्यात असंतोष निर्माण करण्यासाठी करून घेत असते. दारिद्र्य नष्ट करण्याचे स्वप्न दाखविते. त्या असंतोषाच्या उद्रेकातून मोठ्याप्रमाणात साधन सामुग्री नष्ट होते व मानवी हत्याकांड घडून येते. परंतु तरीही त्यांची पूर्णपणे दारिद्र्यातून सुटका होत नाही. बहुतेक वेळा जेव्हा त्याला तसा साक्षात्कार घडून येईल असे वाटू लागते तेव्हा त्याच्यासमोर दुसरी मोठी समस्या उभी राहिलेली दिसून येते. स्वातंत्र्य अबाधित राखण्यासाठी, दारिद्र्याचे उच्चाटन करण्यासाठी अनेक सिद्धांत मांडण्यात आले. परंतु ते सर्व अपूर्ण तरी ठरले अथवा असमर्थ तरी ठरले.

तोडगा हा समस्येपेक्षा सर्वव्यापी व प्रभावी असल्याशिवाय ती समस्या सोडविणे पुर्णपणे शक्य होत नाही. समस्या सोडविण्याच्या प्रयत्नात तोडगा जेव्हा असमर्थ किंवा अपूर्ण ठरतो तेव्हा ती समस्या अधिक उग्र स्वरुप धारण करण्याची शक्यता असते. कारण ती समस्या पूर्ण नष्ट न झाल्याने वाढू लागते व वाढतांना ती तिच्यातील पूर्वीची न्यूनता भरून काढून पूर्वीपेक्षा अधिक भक्कमपणे उभी ठाकते. बऱ्याचवेळा ती आपले स्वरुप बदलून उभी रहाते. तिचे स्वरुप जरी बदलले तरी दुष्परिणाम कमी होत नाही. उलट अधिक बाढलेलेच दिसून येतात. समस्येवर तोडगा तयार करताना त्या समस्येचे पूर्ण आकलन झाले असले पाहिजे. त्या समस्येच्या कारणांचा सर्वांगीण विचार करुन त्यावर परिणाम करणाऱ्या अप्रत्यक्ष घटकांचाही शोध घेतला पाहिजे. विश्वात अशी कोणतीही समस्या नाही जी सोडविता येणार नाही. कोणत्याही समस्येवर यशस्वी मात करण्याचे सामर्थ्य मानवी बुद्धी व कर्तृत्व यांच्यात असते. निसर्गनिर्मित समस्या सोडविताना मानवी बुद्धी अधिक मुक्तपणे कार्यान्वित होत असते. तर मानव निर्मित समस्या सोडविताना त्या बुद्धीवर बंधने लादली जातात. तिचे सामर्थ्य कुंठीत केले जाते. श्रद्धा ही मानवी बुद्धीला मानवाने

घातलेले बंधन आहे. एखाद्या गोष्टीच्या सत्यतेबद्दल खात्री पटत नसतानाही तिच्यावर विश्वास ठेवण्यास लावते आणि जेव्हा त्या गोष्टीची सत्यता पटत असते परंतु त्याबद्दल बुद्धीने दाखविलेल्या धोक्याच्या सूचनेपेक्षाही त्या गोष्टीच्या सत्यतेवर अधिक विश्वास ठेवण्यास लावते ती श्रद्धा होय.

बुद्धीचे सामर्थ्य एखादी समस्या सोडविताना जेव्हा अयशस्वी ठरु लागते तेव्हा तो बुद्धीचा कमकुवतपणा नसतो तर तिच्यावर लादण्यात आलेल्या बंधनांचा तो परिणाम असतो. श्रद्धांसारख्या इतर विविध घटकांचा खोलवर परिणाम कळत नकळत मानवावर झालेला असतो. कांही समस्या ज्या त्या घटकांशी संबंधीत झालेल्या असतात. त्या समस्या सोडविताना बुद्धी त्या समस्येच्या कारणांचा वेध घेऊ लागते तेव्हा तिच्यावर बंधने लादून तिला मर्यादा घातल्या जातात. तेव्हा बुद्धीवर घातलेल्या मर्यादेमुळे ती त्या घटकांच्या पलिकडे असलेल्या तिच्या कारणांपर्यंत पोहोचण्यास असमर्थ ठरते आणि मग समस्या सुटणे अशक्य होऊन बसते. पुढे अशा समस्यानाच तो तोडगा समजू लागतो. तेव्हा त्या अनुरोधाने येणारी प्रत्येक समस्या हीच तोडगा असल्याचे तो मानून त्याप्रमाणे तिचा उपयोग तो इतर समस्या सोडविताना करु लागतो. तेव्हा अनर्थाची नांदी सुरु झालेली असते.

ज्ञातकालाच्या उपलब्ध मानवी इतिहासाची दोन कालखंडात विभागणी करता येते. पहिला कालखंड हा धर्म निर्माण होण्यापर्यंतचा. दुसरा कालखंड धर्म निर्माण झाल्यापासूनचा असे मानता येते. पहिल्या कालखंडात मानवास निसर्ग निर्मित समस्या व संकटे यांनाच अधिक सामोरे जावे लागत होते. त्यामुळे त्याचे प्रयत्न हे निसर्गाला जाणून घेण्याचेच अधिक असत. निसर्ग शक्तींना जाणून घेण्यासाठी त्यांची पूजा करीत होता. त्यातून न पूजा करताही त्या शक्तीमध्ये कोणताही फरक दिसून येत नाही. याचे ज्ञान त्याला होऊ

लागले होते. तेव्हा ज्या निसर्गशक्ती त्याला समस्या वाटत होत्या त्यांचा उपयोग स्वत:साठी मुक्तपणाने करून घेऊ लागला होता. त्यामुळे निसर्ग समस्या सोडविण्याचत त्याने स्वत:ला गुंतवून घेतले होते. त्याची वाटचाल निकाप व जलद प्रगतिच्या मार्गाने सुरु झाली होती. धर्म निर्माण झाल्यानंतरच्या कालखंडात धर्माने मानवावर आपला प्रभाव निर्माण केला. धर्म मानवापुढे दैवी दिव्य शक्तीचा शोध घेण्याची समस्या उभी करतो. अस्तित्वात नसलेल्या दैवी शक्तिचा शोध घेण्यात तो आपले लक्ष केंद्रीत करतो. जेव्हा त्या दैवी शक्तीचा ठाव त्याला लागत नाही तेव्हा तिला जाणून घेण्यासाठी श्रद्धेचं सहाय्य घेण्यास धर्म त्याला सांगतो. फक्त श्रद्धेनेच तो त्या दैवी शक्तीचा शोध घेऊ शकतो व त्या दिव्य शक्तीचा उपयोग त्याच्या समस्या सोडविण्यासाठी करून घेऊ लागतो. न सुटणाऱ्या समस्यांचे रुपांतर तोडग्यात करणे ही श्रद्धेची किमया आहे. धर्माने मानवात श्रद्धेचे प्रस्थ वाढविले. समस्या सोडविण्यासाठी तो श्रद्धेकडे धाव घेऊ लागला. त्यामुळे समस्या सुटल्या तर नाहीतच उलट त्यातून त्याने अनेक नवीन समस्या निर्माण करून ठेवल्या. आज तो असंख्य समस्यांनी स्वत: गुरफटून गेलेला आहे. त्यातच तो त्याची वाट चुकला आहे. त्या वाटेने त्याला विनाशाकडे आणून पोहोचविले आहे. आणि आज तर तो त्याच्या सर्वनाशाच्या संकटासमोर उभा आहे. ते संकट सोडविण्यासाठी त्याने यावेळीही श्रद्धेचा धावा करण्याचा प्रयत्न केल्यास त्यातून त्याची सुटका होणे कदापी शक्य नाही.

समस्या व संकटे केवळ बुद्धीनेच सोडवता येतात.

धर्मानंतरच्या कालखंडात धर्माने त्याच्या वाटचालीची दिशाच बदलून टाकली आहे. धर्म त्याने समस्या मानली नाही ती त्याला सर्व समस्येवरील तोडगा वाटत आली आहे. दैवी शक्तीच्या सहाय्याने कोणतीही समस्या सुटते. हे श्रद्धेतून समस्यांचे तोडग्यात रुपांतर करून सिद्ध करण्याचा प्रयत्न केला जातो.

पहिल्या कालखंडात मानवाने निसर्ग शक्तीची पूजा केली होती. दुसऱ्या कालखंडात त्याची जागा धर्माने कल्पिलेल्या दिव्य शक्तीने घेतली. धर्म संस्थापकही त्याच दिव्य शक्तीचा अंश असल्याचे मानण्यात येऊ लागले. धर्म संस्थापकाचीही पूजा करण्यात येऊ लागली. नंतर निर्माण केलेल्या मानवी रूपातील देवामध्ये त्या दैवी शक्तीचा अविष्कार दाखविण्यात आला. निसर्ग शक्तीच्या ऐवजी आता त्याने मानवी रुपातील दिव्य शक्ती असलेल्या देवाला जाणून घेण्यास व त्याची पूजा करण्याचे आरंभिले. एवढ्यावरच तो थांबला नाही तर त्याने त्याच्या देवाला निसर्गापेक्षाही श्रेष्ठ ठरविले. निसर्गावरही त्या देवाचे नियंत्रण आहे असे तो समजू लागला. त्यामुळे निसर्ग समस्या जाणून घेऊन सोडविण्याची आवश्यकता आता त्याला वाटत नव्हती. कारण आता तो निसर्गापेक्षाही शक्तीमान ठरविलेल्या देवाची पूजा करून त्याच्या सहाय्याने निसर्ग समस्याही सोडवू शकत होता. त्याच ठिकाणी मानवाची प्रगती अडून पडली व त्याच्या विनाशाला सुरुवात झाली. देव हा मानवी रुपात असल्यामुळे तो त्याला अधिक परिचयाचा होता. म्हणून निसर्गापेक्षा तो अधिक जवळचा व ज्ञात होता. त्याला वश करून घेण्याचे अधिक सोपे वाटत होते. म्हणून देवाला अनेक आमिषे दाखवून त्याला वश करून घेण्यास सुरुवात झाली. अजूनही तो त्या देवावरच विसंबून राहिलेला आहे

धर्म या समस्येला तो तोडगा समजू लागला. त्याचा परिणाम इतरत्रही दिसू लागला. इतर समस्याही त्याला तोडगा असल्याचे वाटू लागले. अनिर्बंध राजेशाहीचा जुलूमही त्याला समस्या वाटली नाही. तो प्रजेचे वाढलेले पाप नष्ट करण्याचा दैवी तोडगा समजू लागला. प्रचंड प्राणहानी घडवून आणणारी रोगाची साथ हा देखील समाजातील पापाचे परिमार्जन घडवून आणणारा दैवी तोडगा वाटू लागला. आणि निमुटपणे जुलूम सहन केला व प्राणहानी घडून येऊं

दिली. त्यातूनच त्याला समाजातील दारिद्र्य नष्ट करण्याचे महत्त्व त्या दृष्टिकोनातून वाटेनासे झाले.

धर्मानंतरचा हा कालखंड मानवाची प्रगती तर घडवून आणू शकला तर नाहीच उलट त्याच्या अधोगतीस कारणीभूत झालेला आहे. अशा या व्यापक ठरलेल्या धर्म समस्येला तो तोडगा समजून त्याचा उपयोग समस्या सोडवून घेण्याचा प्रयत्न करीत असता अशा ह्या मानवाचे भवितव्य नाशाशिवाय दुसरे असणे शक्य तरी आहे काय ?

'भेद' हे एक मोठे मानव निर्मित संकट मानव जातीच्या अधोगतीस कारणीभूत झाले आहे. बहुतेक सर्व मानवनिर्मित समस्येची सुरुवात भेदातून केली गेलेली आहे. मानव जातीला असंख्य भेदांनी पाखरले आहे. धर्मामधील भेद जाती मधील भेद, वर्गामधील भेद, वंशामधील भेद, दर्जामधील भेद देशामधील भेद अशा असंख्य भेदाने मानवास विपरीत करून ठेवले आहे. हे सर्व भेद मानवाने केलेले आहेत. या भेदांतून असंतोष फैलावलेला आहे. व मानव मानवाविरुद्ध उभा राहिला आहे. मानवानेच स्वतःचे अपरिमित नुकसान व हत्याकांड घडवून आणले आहे. भेद मानवी प्रगतीमधील एक मोठा अडसर ठरला आहे. भेद हे ही मानवासमोरील मोठी समस्या आहे. तिलाही तो त्याची प्रगती घडवून आणण्यासाठी योजलेला तोडगा समजतो आहे. म्हणून भेद नष्ट करण्याची त्याला जरुरी वाटत नाही.

पहिल्या कालखंडात जेव्हा धर्म अस्तित्वात नव्हता, तेव्हा मानवामधील भेद हे अत्यंत अल्प प्रमाणात मानण्यात येत होते. त्या भेदांचे स्वरुप समस्या म्हणून नव्हते. तर त्यात सोय हा अर्थ सामावलेला होता. म्हणून त्या काळातील संघर्ष हा मानवा मानवातील नव्हता, ते मानव व निसर्ग यातील संघर्ष होता. मानव व निसर्गामधील संघर्षातून प्रगती घडून येत असते. मानवाची ती दिशा ही प्रगतीची असते व तिचा वेगही तुलनेने अधिक ठरतो. मोहंजोदडो व हडप्पा या सारख्या संकृती त्याचो साक्ष देतील. मानवामध्ये भेद नसल्याने

प्रगतीची प्रक्रिया जोरात घडून येत होती. मोठचा प्रमाणात स्थलांतर होत होते. ज्ञात संस्कृतीची अनिर्बंधपणे संक्रमणे होत होती. म्हणून त्या काळी प्रगती द्रुतगतीने होऊ शकली. त्यानंतर जेव्हा धर्म निर्माण करण्यात आला तेव्हापासून मानवी भेदांचे हे स्वरुप नष्ट होऊन त्यांना समस्येचे स्वरुप प्राप्त होऊ लागले. भेदांना ताठरपणा आला. पुढे भेदांना साधन म्हणून उपयोगात आणण्यात येऊ लागले. धर्म संस्थापक सर्व शक्तीमान ठरला. त्यानंतर धर्मोपदेशकाचे श्रेष्ठत्व मान्य करण्यात येऊ लागले. धर्म जाणणारा त्याच्यापेक्षा कमी दर्जाचा समजला जाऊ लागला. धर्म न जाणणाऱ्याला त्या दोघांपेक्षाही खालचा दर्जा दिला. तर दुसऱ्या धर्माचा सर्वात नीच ठरवला जाऊ लागला. त्यांना धर्माच्या आधाराने ताठर स्वरूप प्राप्त झाले त्या भेदांतून द्वेषाची निर्मिती होऊ लागली. व तिची परिणती संघर्ष पेटण्यात झाली. त्या संघर्षात अनेक मानवी हत्त्या घडून येऊ लागल्या. जोपर्यंत हे भेद आपला प्रभाव अबाधित ठेवून आहेत तोपर्यंत संघर्ष होत राहातील व मानवी हत्त्याकांड घडून येतच रहातील.

निसर्ग निर्मित समस्या व मानव निर्मित समस्या यातील निसर्ग निर्मित समस्या मानवास निकोप विकासाच्या दिशेने घेऊन जात आहेत. तर मानव निर्मित समस्या त्याच्या विनाशाच्या दिशेने वाटचाल करण्यास भाग पाडीत आहेत. आज मानवाने जी प्रगती घडवून आणली आहे ती केवळ निसर्ग निर्मित समस्या सोडवित गेल्यामुळे झालेली आहे.

मानव जात नष्ट होण्याचा धोका मानवानेच निर्माण करून ठेवला आहे. मानवाने आपली हत्त्या प्रत्येक कालखंडात घडवून आणली आहे, मानवी हत्त्या थांबवण्याचे आजपर्यंत जे काही प्रयत्न करण्यात आले ते सर्व निरर्थक ठरले आहेत. आणि जेव्हा तो विनाशाच्या कडचावर येऊन उभा आहे, त्याच्या समोर त्याची त्यातून सुटका करणारा एकही निश्चित मार्ग दृष्टीपंथात नाही. गुन्हेगार जेव्हा खून करतो

तेव्हा त्याच्या मनात केवळ भीति असते. परंतु त्याची कोर्टातून सुटका होण्याचा मार्ग त्याला फाशी ठोठावली गेल्यामुळे बंद होऊन त्याचा अंत निश्चित होतो. तेव्हा तो जी भयंकर स्थिती अनुभवू लागतो तशीच काहीशी स्थिती आज त्याने त्याच्या विनाशाची निश्चिती सुटकेचा मार्ग दिसत नसल्याने करून ठेवलेली आहे, परंतु मानवाने त्याची अद्याप दखल घेतलेली नाही.

मानवा समोर आज सर्वात महाभयंकर असे सर्वनाशाचे संकट उभे आहे. ते सोडविण्याचा प्रयत्न जागतिक पातळीवर होणे आवश्यक आहे. तसा प्रयत्न झाल्याशिवाय त्याची सुटका होणार नाही. संकट निवारण्याचे जुजबी व तात्पुरते स्वरुपाचे प्रयत्न करुन चालणार नाही. जागतिक पातळीवर त्या अनुरोधाने संपूर्ण, सखोल व सर्वांगीण प्रयत्न करुन त्याच्यावर असा परिणामकारक तोडगा शोधून काढला पाहिजे, की त्यातून मानव निर्मित संकटे परत त्याच्यापुढे येणार नाहीत सर्व मानवी निर्मित संकटे व समस्यांना कायमची मुठमाती दिली जाईल. मानव सामर्थ्य व कर्तृत्व याचा संपूर्ण विकास घडवून आणता येईल व त्या सामर्थ्य व कर्तृत्वाच्या सहाय्याने तो विश्वातील त्याच्या विकासाच्या असंख्य साधनांचा उपयोग त्याच्या प्रगतीसाठी करुन घेईल व त्याचे जीवन सुख, समृद्धी व सुरक्षितता या दिशेने मार्गक्रमण करु लागेल.

मानवाला अशक्य असे कांहीही नाही.

* * *

॥ धर्म ॥

मानवी जीवनात सतत धडपड चाललेली दिसते, ती त्याचे जीवन सुखी व सुरळीत व्हावे यासाठी. सकाळी उठल्यापासून त्याला ज्या समस्यांचा सामना करावयाचा असतो त्या सोडवून तो सुखी होणार असतो व ती समस्या परत उभी रहाणार नाही याची जेव्हा तो तजवीज करून ठेवतो, तेव्हा ते सुरळीत झाल्याचे समाधान त्याला लाभत असते. भरपूर मोबदल्याची नोकरी अथवा व्यवसाय, प्रशस्त अद्ययावत सुखसोयींच्या साधनांनी युक्त असे घर, जमल्यास एखादे वसण्यापैकी वहान आणि सुंदर बायको अथवा नवरा याच चौकटीत मानवी जीवनाची सुखाची कल्पना सिमित झालेली असते.ते मिळवण्याचा व मिळाल्यावर टिकवण्याचा त्याचे सतत प्रयत्न चाललेले असतात. ते मिळवण्यासाठी तो अथक परिश्रम करीत असतो त्यात काही यशस्वी होतात काही त्यात अयशस्वी ठरत असतात. दोघांचंही संबंध शेवटी ईश्वरी कृपेशी जोडला जातो. नशिबात होते म्हणून ईश्वराने दिले, तर दुसरा म्हणतो, की नशिबात नव्हते म्हणून ईश्वराने दिले नाही.

परंतु असे आढळून येण्याचेच प्रसंग अधिक असतात, की जे ईश्वराच्या नावाखाली नीतिमूल्ये, दयाळूपणा, पापपुण्याची कल्पना व्यवहारात मानत नाहीत त्यांना सुखाची साधने मिळवण्यात लवकर यश येते व ईश्वराच्या नावाखाली त्या कल्पना उराशी बाळगून व्यवहारात काटेकोरपणे त्या अंमलात आणीत असतात. त्यांच्यावरच तो ईश्वर रूसतो व त्यांना सुखाची साधने मिळवणे कठीण करून ठेवतो व सोबतीला दुःखांची मालिका उभी करतो. कोणीही न बघितलेल्या त्या विचित्र ईश्वराचे स्तोम धर्मात माजवलेले असते. आणि हा धर्म लहानपणापासूनच 'बाळ देव-बाप्पाला नमस्कार कर हं!' हे सांगून त्याच्यावर बिंबवण्यास सुरुवात करून त्या धर्मातूनच तुला मुक्ती मिळणार आहे असे अमिष दाखवून त्याला धर्माखाली पुर्ण जायबंद करून टाकले जाते. इतके की, त्या धर्माचाच श्वासोच्छ्वास करून त्याला जीवन जगण्याशिवाय पर्याय ठेवला जात नाही. असा हा धर्म व त्याच्यातील तो ईश्वर गरीबाला अधिक गरीब व श्रीमंतांना अधिक श्रीमंत करण्यातच अधिक व्यग्र असतो असे दिसून येते.

धर्मात अशी कोणती क्लृप्ती योजलेली असते, की ज्यामुळे धर्म व त्यातील ईश्वर मानवावर आपला प्रभाव इतक्या खोलवर ठेवू शकतात की, ज्यामुळे त्यातून त्याची एवढी हानी होऊनही, तो त्याच्याच नादी लागलेला असतो. धर्माचा निःपक्षपातीपणे विचार करण्यासाठी थोडावेळ जरी मनातील ईश्वर बाजूला ठेवला तरी त्यातील महत्त्व समजण्यास मदत होईल.

धार्मिक विचार मानवी जीवनावर सर्वात जास्त प्रभावी व दिर्घकाळ ठरलेले आहे. त्याचा प्रभाव जीवनाच्या इतर अंगावरही दिसून येतो. किंबहूना त्या विचारांच्याच अनुषंगाने इतर अंगांची वाढ झालेली आहे. इतर विचारांपेक्षा धार्मिक विचारांचा प्रभाव

मनुष्य जीवनावर इतक्या खोलवर व दुरोगामी असण्याची कारणे शोधण्याचा प्रयत्न केला पाहीजे. बहुतेक सर्व धर्मांचा विचार करीत गेल्यास आपणास प्रकर्षाने जाणवते ते हे की, राजकीय, विचार, आर्थिक विचार, तत्वज्ञानात्मक विचार इत्यादींना एक स्वतःचा वारसा असतो. ज्याला त्यांचा इतिहास म्हणता येईल. जीवनातील विविध अंगांच्या क्षेत्रांतील विचारांची निर्मिती ही त्यांच्या पुर्वीच्या विचारांच्या अनुरोधाने झालेली असते. कालमानानुसार व परिस्थितीनुसार बदलत जाणाऱ्या विचारांमध्ये त्या निर्माण करणाऱ्या विचारवंतांचा स्वतःचा एक स्वतंत्र ठसा उमटलेला असतो. धार्मिक विचार मात्र त्याला अपवाद ठरतात. एक विचारवंत पुढे येतो तो आपले धार्मिक विचार लोकांपुढे मांडतो. हे विचार ग्रंथीत केले जातात, ते निर्माण झाल्यापासून त्याच्यात कोणीही बदल घडवून आणीत नाही. तरीही त्यांचा प्रभाव वाढतानाच दिसून येतो. ते निर्माण झाल्यापासून त्यांना त्याज्य ठरवून त्या ऐवजी दुसऱ्या एखाद्या निचारवंताचा विचार ग्राहच मानला गेला आहे असे कधिही झालेले नाही. त्या विचारांमधील एखादा शब्ददेखिल त्याज्य ठरवू शकले नाही. या क्षणालाही जगात अधिक प्रभावी ठरणारा विचार हा धार्मिकच आहे. धार्मिक विचारांचा मानवी जीवनावर येवढा प्रभाव असण्याच्या दृष्टीने काही विश्लेषण करता येईल का ते पाहू या. प्रथम हा प्रश्न विचारात घेऊ, की इतर सर्व विषयांसंबंधीच्या विचारात कालामानानुसार व परिस्थितीनुसार बदल घडत आलेले आहेत. मग धार्मिक विचारांमध्ये असे कोणते गमक आहे, की ते निर्माण झाल्यापासून त्यात बदल घडवू शकला नाही व तरीही त्याचा सर्वात जास्त प्रभाव मानवावर राहीलेला आहे. धार्मिक विचारांच्या निर्मात्याने ईश्वरासंबंधी असे विचार मांडले की, ज्याने मनुष्याच्या बुद्धीची व मनाची संपूर्ण दिशाभूल होईल. बुद्धी व मन यांची एकमेकांपासून फारकत करून मनाचा

दर्जा अनुभूतीचा हुद्याने उंचावून ठेवला आहे. म्हणजे बुद्धीचा निकष लाऊन विचारांचे महत्व सिद्ध करण्याला महत्व न देता केवळ मनाला अनुभव आला याचेच महत्व अधिक असल्याचे सांगण्यात आले. परिस्थिती बदलली की ते विचार त्याज्य ठरू लागतात तेव्हा त्यांना काढून टाकून नवीन विचार अमलात आणले जातात. असे धर्माशिवाय इतर विचारांचा होणाऱ्या बदलात घडून येत असते, परिस्थिती बदलली, की बुद्धी नव्या परिस्थितीत जुने विचार उपयुक्त आहेत का नाही याची कठोर परिक्षा घेत असते. जे निरुपयोगी ठरत असते ते त्याज्य ठरवून काढून टाकले जाते, व, त्याऐवजी ती जागा नव्या विचारांनी, जे उपयुक्त वाटतात, भरली जाते. प्रथम मन विचार ग्रहण करते व त्यानंतर त्या विचारांची परिक्षा बुद्धी घेऊ लागते. मनाचाच प्रभाव इतर अंगावर असतो. मन सांगेल त्या प्रमाणे कृती घडत असतात. धार्मिक विचारांचा संबंध त्याने अशा मानसिक प्रक्रियेशी जोडला की, त्याचा ठाव मन व बुद्धी दोघांनाही घेता येणार नाही. त्या विचारांचा संबंध निसर्गाने कधिही अस्तित्वात नसणाऱ्या काल्पनिक ईश्वरी शक्तीशी जोडला, त्यामुळे बुद्धी अस्तित्वात नसलेले शक्तीचा शोध घेण्याच्या प्रयत्नात स्वतःला हरवून बसला आहे. तर त्या अस्तित्वात नसलेल्या शक्तीला जाणून घेण्याच्या प्रयत्नात मनाने अनाकलनीय मानसिक प्रक्रियेत स्वतःला गुंतवून घेतले. त्यामुळे तो अस्तित्वात नसलेल्या शक्तीची अनुभूती येते असे म्हणून त्याचा प्रभावाखाली वावरु लागतो.

एका प्रोफेसराने विद्यार्थ्यांवर एक प्रयोग करून पाहीला होता. तो प्रयोग मानसिक प्रक्रियेचा प्रभाव मानवावर कसा व किती असू शकतो याचे एक उत्तम उदाहरण आहे. त्यावरून वरील मुद्दा खरा असल्याचा दावा मान्य करण्यास भाग पडते.

प्रथम प्रोफेसराने विद्यार्थ्यांसमोर इतर प्रयोग करून दाखविले. नंतर ते विद्यार्थ्यांना म्हणाले की, मी तुमच्यासमोर असा प्रयोग कर-

फार आहे त्यामुळे वास पसरण्याचा वेग मोजता येईल. असे म्हणून त्यांनी कापसात गुंडाळलेली बाटली टेबलावर ठेवली व ते विद्यार्थ्यांना म्हणाले, हया बाटलीत असे मिश्रण आहे की, त्याचा वास तुम्ही कधीही घेतलेला नाही. त्या बाटलीतील द्रव बाहेर ओतल्यावर त्याचा वास येऊ लागेल. ज्याला तो वास येईल त्याने त्वरीत आपला हात वर करावयाचा असे म्हणून त्यांनी त्या बाटलीचे बूच उघडून आर्त.ल द्रव कापसावर ओतण्यास सुरुवात केली. असे करीत असताना त्यांनी आपले तोंड झटकन दुसरीकडे फिरवले व एका हाताने वेळ मोजण्याचे घडयाळ सुरु केले. पहिले काही सेकंद असेच गेलेत. नंतर मात्र समोरच्या बेंचवरील विद्यार्थ्यांनी आपले हात वर केलेत. त्यानंतर त्यांच्या मागच्या बेंचवरील विद्यार्थ्यांनी आपले हात वर केले. ४० सेकंदात वर्गातील ३।४ विद्यार्थ्यांनी आपले हात वर केलेत व समोरचे विद्यार्थी तर वास असहय होत असल्याने बाहेर जाण्याची इच्छा प्रदर्शीत करू लागले. या प्रयोगातील विचित्र गोष्ट ही की, त्या बाटलीत शुद्ध पाणी (डिस्टिल वॉटर) होते तरी त्या विद्यार्थ्यांनी वास येत असल्याची तीव्र प्रतिक्रिया व्यक्त करून तिच्या प्रभावाने भारीत झाल्याने त्यांच्या कृतीवरही त्यांचा परिणाम दिसून आला..

वरील प्रयोगात प्रथम विद्यार्थ्यांचा विश्वास निर्माण करण्यात आला की, प्रोफेसर हे सत्य बोलतात. नंतर वास येणाऱ्या बाटलीला जसे कापसात गुंडाळून ठेवलेले असते तसे त्या बाटलीला ठेवून विश्वास वाढविण्यात आला. बाटलीतील द्रव ओतताना झटकन फिरवलेलं तोंड हे तीव्र वास येत असल्याची अनुभूती आल्याचे सुचवले गेले. हे सर्व बुद्धीला चकवून मनाला तसा अनुभव आल्याने भासवण्यात आल्याने त्याचा परिणाम घडून घेऊन मानसिक प्रक्रिया घडून आली व त्यानुसार त्याचा कृतीवर परिणाम होऊन गेला.

— Prop. Glosson, Published in the Revew Scintifique October 25, 1899.

याच पद्धतीने धर्म ईश्वराची अनुभूती बुद्धीची दिशाभुल करून मनावर बिंबवीत असतो व त्यामुळे मनाला ईश्वराचे अस्तीत्व जाणवू लागते. तेव्हा तो त्या अनुरोधाने त्याची कृती घडवून आणीत असतो. बुद्धीचा पुर्ण बंदोबस्त करून टाकल्यामुळे धर्म त्याचे काम मनामार्फत बिनबोभाट चालवितो.

काहीना ईश्वराचे अस्तित्व क्रॉसमधून जाणवू लागते, तर काहीना ते दगडाला शेंदूर लावून त्यातून जाणवू लागते, तर काहीना पांढऱ्या भिंतीसमोर बसून जाणवून घ्यावे लागते. ज्यांना क्रॉसमधून त्यांची जाणीव होत असते त्यांना इतर दोन प्रकारे तशी जाणीव निर्माण करून घेण्यास विचित्रता वाटत असते. हे केवळ त्यांच्या धर्मातील योजलेल्या क्लृप्तीमुळे घडून येत असते.

एखादा विचार आकलन झाल्याशिवाय तो मूर्त स्वरुप धारण करीत नाही व त्याने मूर्त स्वरुप धारण केल्याशिवाय तो क्रियाशिल होऊ शकत नाही. त्यामुळे त्याचे चांगले वाईटपण ठरविणे शक्य होत नाही. धार्मिक विचारांच्या संदर्भात असे दिसते, जे अनाकलनीय आहेत त्या संबंधीचे विचार ते मांडतात. ते विचार आकलन करण्याच्याच प्रयत्नात तो गुरफटला जातो. त्यामुळे ते विचार मूर्त स्वरूप धारण करु शकत नाहीत. त्यांची सत्यता पारखण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. त्यामुळे ते निरोपयोगी ठरवणे अशक्य होऊन बसते.

धर्म ही एक फसवणूक आहे. ते मनुष्याला चिरंतन स्वर्गीय सुखाचे आमिष दाखवते. त्याचा अनाकलनीय मानसिक प्रक्रियेचा उपयोग त्याकरीता करून घेत असते. त्यांच्यात सुखाचा भ्रम निर्माण करते. मानवाचा हेतू सुखप्राप्ती करुन घेणे हा असतो. त्यामुळे तो त्या सुखाची प्राप्ती करून घेण्याच्या आमिषाने आकर्षित होतो परंतु प्रत्यक्ष गरजेची पुर्तता करणाऱ्या साधनांच्या उपभोगातूनच सुख प्राप्ती होऊ

शकते. जेव्हा जेव्हा गरजेची पुर्तता होते तेव्हा तेव्हा सुखाची प्राप्ती होत गेलेली आहे. परंतु अशी किती उदाहरणे देता येतील की, ज्यांना धर्मामुळे चिरंतन सुखाची प्राप्ती झाली आहे. जे कोणी चिरंतन सुखाच्या प्राप्तीचा दावा करणारे असतील त्यांना सुखाच्या प्राप्तीचा शोध घेण्यास ती केवळ भ्रम किंवा अनाकलनीय मानसिक प्रक्रियेतून उमटलेला ठसा असल्याचे सिध्द होईल. ते वरील मानसशास्त्राच्या प्रयोगाच्या आधारे सिध्द करता येते.

धर्म बुध्दीची दिशाभुल करतो, तिला अस्तित्वात नसलेल्या शक्तीचा शोध घेण्यात गुंतवून ठेवतो. त्यामुळे मनुष्याला त्याचा उपयोग समस्या सोडविण्यासाठी करून घेता येत नाही.

धर्म मानवाला त्याची दुःखे निवारण करण्यासाठी म्हणजेच दुसऱ्या अर्थाने सुखाची प्राप्ती करून घेण्यासाठी दिव्य शक्ती असणाऱ्या ईश्वरावर संपूर्ण विश्वास ठेवण्यास सांगतो. ईश्वर प्रसन्न झाला म्हणजे दुःखातून मुक्ती मिळणार असते व सुखाची प्राप्ती होणार असते. अशी श्रध्दा त्याच्यात निर्माण करतो. ईश्वराला प्रसन्न करण्यासाठी त्याची भक्ती करावी लागते असे धर्म म्हणतो. म्हणून तो ईश्वराची भक्ती करू लागतो. ईश्वरी कृपेने सुख प्राप्ती होते या श्रध्देतून तो गरजांच्या पुर्ततेतून मिळणाऱ्या सुखाकडे दुर्लक्ष करू लागतो. त्यामुळे त्याचा जीवनाचा सुखप्राप्ती करून घेण्याच्या हेतूमध्ये व्यत्यय आणतो.

गरजेच्या पुर्ततेतून प्राप्त होणाऱ्या सुखाकडे दुर्लक्ष करण्यास सुरूवात केल्यामुळे गरजेची पुर्तता करणाऱ्या साधनांच्या निर्मितीकडे त्याचे आपोआप दुर्लक्ष होते. त्यामुळे त्याची श्रम करण्याची प्रवृत्ती कमी होत जाते. पुढे ती इतकी कमी होत जाते की, मुलभूत गरजांची पुर्तता करणाऱ्या साधनांच्या निर्मितीस लागणारे श्रमही तो करीनासा होतो. त्याच्या मुलभूत गरजा भागवल्या गेल्या नाहीत तर त्याचा ईश्वरही त्याला

जीवंत ठेवू शकत नाही. जीवंत रहाण्यासाठी त्याला त्याच्या मुलभूत गरजा भागवायलाच लागतात. परंतु त्याला जीवंत ठेवणाऱ्या गरजांची पुर्तता करणारी साधने निर्माण करण्यासाठी लागणारे श्रम तो करीत नाही. अशा वेळी दुसऱ्याने त्याच्या श्रमातून निर्माण केलेल्या साधनांचा उपभोग घेण्यास तो प्रवृत्त होतो. दुसऱ्याने निर्माण केलेल्या साधनांच्या मोबदल्यात त्याच्या श्रमाने निर्माण केलेली साधने त्याच्याकडे नसतात. तेव्हा तो दुसऱ्याने केलेल्या श्रमातून निर्माण केलेल्या साधनांचा उपभोग घेण्याचा त्याचा हक्क डावलून त्याच्याकडून ती साधने काढून घेतो. म्हणजे तो दुसऱ्याने निर्माण केलेली साधने पिळवणूकीच्या तत्वाने काढून घेत असतो. हे केवळ धर्माने सांगितलेल्या ईश्वराकडून मिळणाऱ्या काल्पनिक स्वर्गिय सुखाची प्राप्तीसाठी करीत असतो. या सदराखाली त्यात त्याला कोणतीही अनिष्ठता वाटत नाही. काल्पनिक स्वर्गीय सुखाची प्राप्ती तर त्याला कधीही होत नाही. परंतु गरजा भागवण्यासाठी मिळवलेल्या साधनातून होणारी सुख प्राप्ती त्याला पिळवणूक करण्यास प्रवृत्त करते.

धर्म मानवावर आपला प्रभाव निर्माण करण्याचे धोरण एका विशिष्ट तंत्राने अमलात आणतो व त्यातून तो मानवाच्या मनावर खोल बिंबवला जातो. त्यासाठी तो मानसशास्त्रीय खुब्या उपयोगात आणीत असतो. धर्म मनावर खोल बिंबवून त्याला नष्ट करण्याचे मार्ग तो बंद करुन ठेवतो. प्रत्येक धर्माचे परिक्षण करीत गेल्यास तेच तंत्र अवलंबिले आहे असेच आढळून येऊ लागते.

धार्मिक विचार हे तीन विभागात कल्पिता येतात. पहिल्या विभागात धर्म विश्वास संपादन करण्याच्या दृष्टीने विचार मांडतो. ते विचार मानवाच्या जीवनाशी निगडीत असतात. त्या विचारांचे महत्व त्याला पटलेले असते, परंतु ते विचार अमलात आणणे कठीण वाटते. धर्म अशा विचारांचे महत्व सांगून त्यातून त्याचा विश्वास

संपादन करते. ' दुःखी व्यक्तीचे दुःख निवारण करा ' 'सचोटीने वागा ' 'सत्य बोला ' ' गरीबांना मदत करा ' 'बंधूभावाने रहा ' शेजाऱ्यावर प्रेम करा.' ' दुर्बलास सहाय्य करा.' इत्यादी स्वरुपाचे विचार अत्यंत सोप्या भाषेत व सुलभतेने मांडतो त्यामुळे हे विचार त्याला धर्मावर विश्वास ठेवण्यास लावतात दुसऱ्या विभागात ईश्वर किंवा ईश्वरीय शक्तीचे महात्म्य वर्णिलेले असते. ईश्वरीय शक्तीचे दाखले दिले जातात. त्याच्या सामर्थ्याचे वर्णन केलेले असते. ईश्वरीय शक्ती सर्व शक्तीपेक्षा श्रेष्ठ व अद्भूत ठरविली जाते. हे सिध्द करण्यासाठी ज्या घटनांचा त्याला आचंबा व आश्चर्य वाटत असते, ज्या घटना त्यास आकलन करुन घेणे हे त्याच्या मर्यादेबाहेर असल्यासारखे वाटत असते, त्या घटनांचे कारण ईश्वरीय शक्ती असल्याचे सांगितले जाते. ' लहानशा बी पासून मोठे झाड कसे तयार होते ?' ' मनुष्याची निर्मिती कोणी केली ?' 'विश्वाची उत्पत्ती कोणी केली ?' 'विश्वाचे नियंत्रण कोण करते ?' वगैरे घटना ईश्वरीय शक्ती घडवून आणतात असे सांगून मानवाच्या समस्या सहजगत्या सोडविण्याचे सामर्थ्य त्याच्यात आहे. याची खात्री मनात बिंबविली जात असते. पहिल्या भागातून विश्वास संपादन केलेल्या पार्श्वभूमीवर हे ईश्वरीय शक्तीचे महात्म्य सहजगत्या खोलवर बिंबले जाते. ज्या घटनांचे त्याला नेहमी कुतूहल वाटत असते त्याची कारणमीमांसा सापडलेल्यानेही तो त्यांच्यावर विश्वास ठेवण्यास ताबडतोब तयार होतो. अज्ञात घटनांची कारणमिमांसा अद्भूत शक्तीतच असली पाहिजे ही त्याच्यातील सुप्त भावना असते तीला बळकटी येते. या पद्धतीने धर्म विश्वासाचे रुपांतर श्रद्धेत करून घेतो. श्रद्धा ही धर्माची शक्ती आहे. तिच्या बळावरच तो मानवावर आपला प्रभाव कायम ठेवू शकतो. तिसऱ्या विभागात मानवाची निर्मिती ईश्वर शक्तीनेच केली आहे व मृत्यू ही याच ईश्वर शक्तीने घडवून येतात. मानवाच्या जन्म व मृत्यूवर ईश्वर

शक्तीचे संपूर्ण नियंत्रण असते. त्याच्या इच्छेप्रमाणे जन्म व मृत्यू घडत असतात असे प्रतिपादन केलेले असते. त्यामुळे जन्म दिल्याबद्दल त्यांच्या मनात अपार कृतज्ञता निर्माण होते तर मृत्यू घडवून आणतो म्हणून त्याच्या मनात त्या शक्तीबद्दल जबरदस्त भीती निर्माण झालेली असते. कृतज्ञतेतून लाचारी निर्माण होते तर भीतीतून संपूर्ण शरणागती. कृतज्ञतेपेक्षा भीती ही अत्यंत प्रभावी भावना आहे. दुसऱ्या भागातील निर्माण झालेल्या श्रद्धेतून हे त्यांच्या मनावर कोणत्याही प्रकारची शंका न घेऊ देता खोलवर बिंबविले जाते. म्हणून धर्मासमोर तो कृतज्ञतेतून निर्माण झालेली लाचारी व जबरदस्त भीतीमुळे संपूर्ण शरणागती पत्करतो. त्यातूनच धर्म हा त्याचा अविभाज्य घटक म्हणून त्याच्यात वास्तव्य करू लागतो. भीतीच्या खोलवर रूजलेल्या जबरदस्त प्रभावामुळे तो ईश्वरीय कल्पनेबद्दल शंकाही घेऊ शकत नाही. एवढेच नव्हे तर त्याबद्दल कोणी शंका घेतलेली त्याला चालत नाही. धर्म हा ईश्वरीय शक्तीचे दर्शन घडविते. म्हणून धर्म हा त्या ईश्वरीय शक्ती इतकाच महत्वपूर्ण ठरलेला असतो.

धर्माच्या या तीन्ही भागांकडे पाहिल्यास असे दिसते की पहिल्या भागातून जो विश्वास संपादन केला जातो, त्याचे दुसऱ्या भागात मोठ्या खुबीने श्रद्धेत रुपांतर केले जाते व श्रध्देच्या साहाय्याने कृतज्ञता व भीतीची भावना खोलवर रुजविली जाते. ईश्वरीय शक्तीच्या अस्तित्वाची शंका घेण्याचा मार्ग भीतीने बंद करून टाकलेला असतो. ईश्वरीय अवकृपा झाल्यास सर्वनाश किंवा मृत्यू अटळ आहे हे त्याच्या मनात खोलवर बिंबलेले असते. त्यामुळे तो सतत ईश्वरीय शक्तीच्या दडपणाखाली वावरत असतो. धर्माला कोणत्याही प्रकारची बाधा होणार नाही यासाठी कसोशीने जीवापाड प्रयत्न करीत असतो त्याचाच परिणाम धर्म निर्माण झाल्यापासून त्यात कधीही बदल होऊ शकणार नाही.

धर्माचे उच्चाटन करण्याचा मार्ग हा धर्म ज्या पद्धतीने आपले वर्चस्व प्रस्थापित करतो त्याच्या अनुषंगाने झाला पाहिजे. धर्माचे उच्चाटन होण्यासाठी प्रथम ईश्वराबद्दलची भीती व कृतज्ञता नष्ट होणे आवश्यक असते. ईश्वरीय शक्तीवरील त्यांची गाढ श्रद्धा नष्ट झाल्याशिवाय तो धर्म झुगारू शकणार नाही. श्रद्धा नष्ट होण्यासाठी प्रथम भीती नष्ट होणे, अत्यावश्यक ठरते. श्रद्धेवर भीती हे कुलूप आहे. भीतीचे कुलूप उघडल्याशिवाय श्रद्धा काढून नष्ट करता येत नाही. भीती अनेक स्वरूपाने त्याच्यापुढे उभी करण्यात आली आहे. भूत पिश्याच्च, जादूटोणा याची त्याला सतत भीती वाटत असते. भूत म्हणजे मृत्यू हे समीकरण त्याच्या मनात रूजविले गेलेले असते. त्यातून सुटकेचा मार्ग ईश्वरीय शक्ती. भूताचे अस्तित्व तो जेव्हा जाणून घेऊ लागतो तेव्हा त्याला ईश्वरीय अस्तित्व मानणे अपरिहार्य असते. तेव्हा ईश्वरीय शक्ती न मानणे म्हणजे मृत्यूला कवटाळणे. अशी भीती त्याच्या मनात ठाण मांडून बसते. अशाच विविध प्रकारे त्याच्यावरील भीतीचा प्रभाव त्याला ईश्वरीय शक्ती समोर संपूर्ण शरणागती पत्करण्यास भाग पाडतो. भूत पिश्याच्च् या सारखा कपोल-कल्पित आणि मानसिक भ्रमातून निर्माण झालेल्या कल्पना त्याच्या मनातून नष्ट केल्यास त्यातून ईश्वरीय भीति नष्ट होऊन, ईश्वराच्या अस्तित्वाचा प्रश्न त्याला विचारात घेण्यात येईल आणि जेव्हा तो ईश्वरीय अस्तित्व शोधण्याचा प्रयत्न करू लागेल, तसतसे त्यातून विज्ञानाच्या साहाय्याने त्याच्या श्रद्धेला तडे जाऊ लागतील व ईश्वर ही कल्पना किती मुर्खपणाची आहे याचे त्याला आकलन होऊ लागेल. शेकडो वर्षांपासून असाहचपणे व आत्मघातकी दडपणाखाली ईश्वरी शक्तीमुळे स्वतःला भरडून घेत होता, त्यातून तो मुक्त होईल.

धर्म ईश्वरी कृपा संपादन करून सुखाची प्राप्ती होते, असे सांगत असतो व ऐहिक सुख म्हणजे गरजेच्या तुलनेतून मिळणारे सुख हे अधोगतीस कारणीभूत आहे असे सांगून निःषिद्ध ठरविते. परंतु

मानवाच्या जीवनाचा हेतू–सुख प्राप्ती–ही गरजेची पुर्तता करणाऱ्या उपभोगातूनच मिळू शकते. म्हणजे धर्म हे मानवी जीवनाच्या हेतू विरोधी आहे. ते गरजेच्या पूर्ततेची साधने निर्माण करण्यास अटकाव करते. प्रगती म्हणजे मानवी सुखाच्या साधनांची अधिक निर्मिती होय. धर्म हे त्या प्रगतीत अडथळे निर्माण करते. एकीकडून धर्म उघड उघड प्रगतीला विरोध करतो, तर दुसरीकडून अप्रत्यक्षरित्या गरजांची पूर्तता करणाऱ्या साधनांची पिळवणूक करण्यासाठी प्रवृत्त करीत असतो.

धर्म मानवाने गरज म्हणून स्वीकारलेला नाही. तर तो फसवणूकीतून त्याच्यावर लादण्यात आलेला आहे.

प्रगतीविरोधी व पिळवणूकीस प्रवृत्त करणाऱ्या धर्माने फार मोठा प्रभाव मानवी जीवनाच्या सर्व क्षेत्रावर निर्माण करुन ठेवला आहे. ते प्रभाव मानवी जीवनाच्या सर्व क्षेत्रात त्याच प्रवृत्ती जोपासित आल्या आहेत. अशा ह्या मानवाला घातक ठरलेल्या धर्माचा पगडा नष्ट करण्यासाठी युद्ध पातळीवर जागतिक प्रयत्न झाले पाहिजेत. हे प्रयत्न करताना बुद्धी व मानसिक प्रक्रिया यांचा मानस शास्त्रीय दृष्टीकोनातून, धर्माचे पितळ उघडे पाडण्यासाठी उपयोग करून घेतला पाहिजे व त्याचे महाभयंकर स्वरुप मानवासमोर स्पष्ट करुन त्यातून मानवाची सुटका करुन घेतली पाहिजे.

धार्मिक विचारांचा पगडा नाहीसा झाला तरी या धार्मिक विचारांचा पगडा त्याच्या इतर क्षेत्रात आहे तो शोधून काढून त्याचाही नायनाट केल्यावरच त्याची धार्मिक विचारांच्या घातकी पणातून संपूर्ण सुटका होईल. राजकीय क्षेत्र, सामाजिक क्षेत्र, संस्कृती नीतिमुल्ये शिक्षण इत्यादीवर धार्मिक विचारांचा बिशेष प्रभाव दिसून येतो.

समाजवादी व साम्यवादी विचारसरणीने धर्मविरोधी प्रसार केला तो धर्माचे संपूर्ण उच्चाटन करण्याच्या हेतुने नव्हे तर त्यांच्या त्यांच्या ध्येयाच्या मध्ये उभी असलेला अडसर म्हणून. जरी काही साम्यवादी राष्ट्रांनी आपल्या राष्ट्रात धर्माचे महत्व नष्ट केलेले असले तरी ते हे विसरलेत की त्यांची समाजरचना, संस्कृती, नीति मुल्ये इत्यादी जे धार्मिक विचारांनी प्रभावीत झालेल्या अवस्थेतून विकसित झालेली आहेत, ती त्यांची अपेक्षित वाढ कधी होऊ देणार नाहीत व तीच पुढे साम्यवादी विचारसरणीलाही बदलून व ऊखडून टाकण्यास कारणीभूत ठरतील. धार्मिक विचारांच्या प्रभावाखाली विकसित झालेली संस्कृती, सामाजिक संबंध, समाजरचना नीति मुल्ये यांचा अर्थशास्त्रावर आधारित असलेल्या साम्यवादी विचार-सरणीशीं मेळ बसणे शक्य होणार नाही. सामाजिक संबंधाना धार्मिक विचारांचा आधार दिलेला असतो. सामाजिक संबंध म्हणजे व्यक्ति-व्यक्तिचा, व्यक्ति व कुटुंबाचा, व्यक्ती व समूहाचा, समूह समूहाचा यांच्यातील परस्परातील बंधने होय असे ढोबळ मानाने म्हणता येईल. वैवाहिक संबंध हे धार्मिक विधीने ग्राह्य ठरविले जातात. व्यक्ति व कुटुंब यांच्यातील जे पावित्र्य या स्वरुपातील बंधने आहेत. त्यातील पावित्र्य ही कल्पना धार्मिक विचारातून आलेली असते व्यक्तिचा समूहाशी व एका समूहाचे दुसऱ्या समुहाशी असलेले संबंध हे बहुतांशी धार्मिक विचारांच्या आधारा-वरच उभे असतात. अशी ही धार्मिक विचारांच्या आधारावर उभी असलेली सामाजिक संबंधांची चौकट धार्मिक विचारांचा लोप झाला तरी तशीच राहाणार आहे. अशा या चौकटीची फेररचना करणे धर्माच्या प्रभावातून मानवाची संपूर्ण सुटका होण्यासाठी अपरिहार्य ठरते.

धार्मिक विचारांचा सर्वात अधिक प्रभाव संस्कृतीवर असल्याचे दिसून येते. संस्कृती ही मानवाच्या सामाजिकरणाचे सर्वात महत्वाचे

माध्यम आहे. जसा प्राणी प्राणवायूशिवाय जगू शकत नाही तसा समाज हा संस्कृतीशिवाय जगू शकत नाही. मानवी जीवनाचा क्षणन्‌क्षण संस्कृतीशी निगडीत झालेला असतो. अनेक प्रकारच्या संस्कृत्या अस्तित्वात आहेत. संपूर्ण जगाची एक संस्कृती तर प्रत्येक देशाची स्वतंत्र संस्कृती. तर प्रत्येक वर्गाची, जातीची, वंशाची, धर्माची वेगवेगळी संस्कृती विकसित झालेली असते. या संस्कृतीवर धर्माचा जबरदस्त पगडा असतो व मनुष्य जीवन हे संस्कृतीच्या वर्चस्वाचा परिणाम असतो. तो जन्माला आल्या क्षणापासून त्याच्यावर ही संस्कृती कबजा करून असते व आपला प्रभाव याच्यावर गाजवू लागते. तो मेल्यावरही अंत्यविधीच्या नावाखाली ही संस्कृती आपला प्रभाव गाजवत राहते. जणू तो मेल्याचे सोंग घेऊन तीच्या कचाट्यातून सुटण्याचा तर तो प्रयत्न नाही ना याची खातरजमा करून घेत असते. धर्माचे अनेक असे प्रभाव आहेत की, ते सुप्त रितीने संस्कृतीतून आपले अस्तित्व टिकवून आहेत.

संस्कृतीच्या माध्यमातून धर्माने मानवी जीवनावर आपली जबरदस्त पकड बसविली आहे. धर्माचे रूपांतर व्यवहारी स्वरूपात आणण्याचे कार्य संस्कृतीने केले आहे. मानवाचे व्यक्तीमहत्त्व संस्कृती तयार करीत असते व मनाची घडण ही संस्कृतीच घडवित असते. त्यातून घडलेले मन आपल्या सर्व कृती धर्माच्या अनुषंगाने करीत असते. धर्माची अनिष्ठता संस्कृतीमार्फत मानवी मनात बिंबवून त्याच्या व्यवहारात उतरविली गेली आहे. धर्म हा पिळवणूकीस प्रवृत्त करतो व प्रगतीला अडथळा निर्माण करतो. त्याप्रमाणे संस्कृतीने घडविला जाणारा मानवही आपल्या कृतीमध्ये त्याचप्रवृती जोपासित असतो. धर्माचा पगडा जितका अधिक असतो तितक्या त्याच्या अनुयायामध्ये अनिष्ट व प्रगती विरोधी प्रवृत्ती अधिक दिसून येत असते. सर्वत्र दिसणारा प्रचंड भ्रष्टाचार, लाच लुचपत, वशिलेबाजी फसवणूक, गुन्हेगारी प्रवृत्ती ही सर्व धर्माच्या प्रभावाखाली,

निर्माण करून जोपसली गेलेली आहे. मानवाच्या नैसर्गिक प्रवृतींशी ते विसंगत आहे.

धर्माचे जगातून उच्चाटन करणे अवघड नाही, परंतु संस्कृती व इतर क्षेत्रात त्याचा असलेला प्रभाव शोधून काढून तो नाहीसा करणे हे फारच जिकीरीचे व कौशल्याचे ठरणार आहे. त्यात मानवी बुध्दी पणाला लागणार आहे. मानवा समोरील ते एक आव्हान ठरणार आहे.

* * *

॥ अर्थ ॥

आर्थिक क्षेत्र हे मानवास सर्वांत जवळचे व महत्वाचे वाटत असते. त्याच्या आर्थिक मिळकतीवर त्याचे जीवन सुखी आहे की नाही याचा अंदाज बांधला जातो. त्याची मिळकत जितकी अधिक तितके त्याचे सुख अधिक असते. आर्थिक मिळकत अधिकाधिक मिळवण्याच्याच प्रयत्नात प्रत्येकजण गुंतलेला असतो. त्याच्या प्रयत्नाचा प्रभाव आर्थिक क्षेत्रावर पाडून त्यातून अधिकाधिक मिळकत मिळवाना त्याच्यावरील आर्थिक क्षेत्राचा प्रभाव त्याला कोणत्या दिशेला घेवून जात आहे हे जाणून घेण्याची आवश्यकता त्याला वाटत नाही. ते त्याच्या लेखीही नसते. समाजाची, राष्ट्राची, सर्व जगाची आर्थिक क्षेत्रांवर उभारणी झालेली असते. त्यांचे आर्थिक हितसंबंध अबाधित राखण्याचे त्यांना ते चिलखते वाटत असतात त्या सर्वांचा ओढा आर्थिक मिळकत वाढविण्याकडे असतो. जग हे आर्थिक प्रभावाखाली वावरत आले आहे.

आपली मिळकत वाढविण्यासाठी आर्थिक क्षेत्रावर प्रभाव निर्माण केला जात असतो. तर आर्थिक क्षेत्रही मानवावर आपला प्रभाव

निर्माण करुन त्याच्या जीवनाची दिशा निश्चित करीत असते मिळकत वाढविण्यासाठी तो जितका अयोग्य मार्गांचा अवलंब करीत असतो. तितकी त्याची दिशा त्याला विनाशाकडे द्रुतगतीने घेवून जात असते.

अनेक समस्या व संकटे हे मानवाच्या मिळकत वाढविण्याच्या चालविलेल्या अयोग्य प्रयत्नांतून निर्माण झालेली आहे. त्या समस्या व संकटे यांच्या कारणांचा शोध घेण्याचा प्रयत्न येथे चाललेला आहे.

आर्थिक क्षेत्र हे अत्यंत प्रभावी क्षेत्र आहे. जे मानवातून आपला सतत प्रभाव जागवित असते, धर्माचा पगडा जरी मोठा मानला जातो तरी तो विशिष्ट वेळेतच आपला प्रभाव दर्शवित असतो परंतु आर्थिक प्रभाव त्याच्यावर सर्वकाळ अंकुश ठेवून असतात. त्याचा सर्व वेळ अर्थजनासाठी खर्ची पाडीत असतो. त्यातून वेळ काढून तो धर्मासाठी खर्च करतो. धर्म हा अनाकलनीय गूढ स्वरुपात असतो. त्याचा ठाव घेणे त्याला शक्य नसते. म्हणून तो त्याच्याबद्दल भिती बाळगून असतो व न कळत धर्माकडून नियंत्रित होत असतो. आर्थिक घटकांचे स्वरुप हे मूर्त असते. म्हणून त्यावर त्याचे नियंत्रण असते त्यावरून धार्मिक प्रभाव हा आर्थिक प्रभावापेक्षा अधिक ठरतो.

परंतु धार्मिक प्रभावाला शह दिला तो आर्थिक प्रभावाने. धार्मिक प्रभाव पिळवणूक घडवून आणतो याची स्पष्ट जाणिव झाल्यावरून त्याला पहिल्यांदाच झुगारून देण्याचे कार्य फ्रेंच राज्य क्रांतीत घडून आले. राजा हा ईश्वरी अंश आहे हा धार्मिक विचारांचा प्रभाव नष्ट करण्याचा पहिला यशस्वी प्रयत्न फ्रेंच राज्य क्रांतीने केला.

आर्थिक प्रभावामुळेच धर्म नष्ट होणार आहे. धर्म हा आर्थिक हितसंबध धोक्यात आणतो याची जसजशी जाणीव होत जाऊन त्याचे घातक स्वरूप उघडे पडू लागेल, तसतसे त्याला तडे जातील व शवटी त्याला मुठमाती दिली जाईल. धार्मिक प्रभावापेक्षा आर्थिक प्रभाव हे मानवावर अधिक परिणामकारक ठरतात हे फ्रेंच राज्य-क्रांतीने सिद्ध केले आहे. व धार्मिक प्रभाव हा मानवावर सर्वात अधिक प्रभावी असतो या समजुतीला तडा दिला आहे.

मानवी जीवनाचा हेतू सुख प्राप्त करून घेणे हा आहे. सुख प्राप्ती ही गरजेची पूर्तता करणाऱ्या साधनांच्या उपभोगातून मिळत असते. आर्थिक क्षेत्र हे गरजांची पूर्तता करणाऱ्या साधनाच्या निर्मितीचा व देवाण घेवाण करण्याचा विचार करीत असते. मानवी जीवनाचा हेतू सफल करण्याचे ते क्षेत्र असल्याने त्याला ते सर्वात जवळचे व महत्वाचे वाटत असते.

प्रत्येक क्षेत्राचा कणा हा आर्थिक घटकांनी बनलेला असतो. प्रत्येक क्षेत्राचा हेतू प्रत्यक्ष अप्रत्यक्षरित्या त्याच्या सुखाची प्राप्ती या हेतूशी निगडीत झालेला असतो. प्रत्येक क्षेत्रात आर्थिक प्रभावांचा मोठा परिणाम दिसून येत असतो. त्याची वाढ आर्थिक प्रभावाच्या अनुषंगाने होत गेलेली दिसते. आर्थिक क्षेत्राची वाढ जशी होत जाते. त्याचप्रमाणे इतर क्षेत्रांचीही वाढ होत असते परंतु त्याचे स्वरुप आर्थिक क्षेत्रापेक्षा सौम्य प्रमाणात असते. इतर क्षेत्रात विचारांचा जो बदलाचा क्रम दिसून येतो तो आर्थिक प्रभावामुळेच घडून येत असतो असे आढळून येते.

अनेक विचारवंतांनी आपआपल्या दृष्टीकोनातून मानवाची निकोप प्रगती होण्यासाठी विविध विचार मांडले आहेत. त्यातील जे विचार जास्त परिपूर्ण वाटले ते अंमलात आणून पाहीलेत ते ही मानवाची निकोप प्रगती करण्यास असमर्थ ठरलेत. ते विचार अंमलात आणूनही त्यातून मानवाच्या प्रगती पेक्षा विनाशच जास्त घडून आला आहे. प्रगतीसाठी मांडण्यात आलेले विचार. शेवटी विनाशकारक कसे ठरतात याचा गंभीरपणे विचार केला गेला पाहिजे. विचार त्याज्य ठरविणे हा विचारांचा दोष म्हणता येईल काय ? परंतु हा विचारांचा दोष वाटत नाही 'प्रगतीच्या विचारांमध्ये तिच्या ऱ्हासांची बीजे दडून बसलेली असतात' असे म्हटले जात असते. हे विधान नीट विचार केल्यास संयुक्तिक वाटत नाही. तलवारीचा उपयोग संरक्षणासाठी असतो किंवा शत्रूवर

मात करण्यासाठी असतो परंतु तिचा उपयोग आत्महत्त्येसाठी करुन घेतल्यास, तलवारीने विजयश्री मिळते परंतु तिच्यात आत्मनाशाची बीजे दडलेली आहेत, असे म्हणणे जेवढे वेडगळपणाचे ठरेल. तसेच वरील विधानाबद्दल म्हणता येईल. म्हणजे दोष विचारांचा नसून त्यांचा उपयोग करुन घेणाऱ्या प्रवृत्तीमध्ये असला पाहिजे असे म्हणता येईल.

कोणताही नवविचार प्रगतीचा हेतू ठेवून अंमलात आणला जात असतो. सुरुवातीला त्याच्या पासून फायदे मिळतात. परंतु जसजसा काळ पुढे सरकत जातो तसतसे त्यातून हळूहळू तोटे दिसून येऊ लागतात. काही काळानंतर त्या पासून मिळणारे फायदे थांबतात व तोटे मात्र वाढताना दिसतात. असे हे प्रत्येक विचाराच्या बाबतीत जे अमलात आणले गेले ते दिसून येतो. हे जवळ जवळ सर्व क्षेत्रात घडून येत असते. आर्थिक विचार व राजकीय विचार या बाबत मात्र ते प्रकर्षाने जाणवत आले आहे.

नव विचार अमलात आणताना तो अशा रितीने अमलात आणतात की, त्यापासून अमलात आणणाऱ्या गटाला त्याचा जास्तीत जास्त फायदा व्हावा. किंवा तो अमलात आणल्यावर धूर्त लोक किंवा शक्तिमान गट त्याच्यातील असा भाग हे देतात की, त्यामुळे त्यांच्या गटाला त्याच्या उपयोगातून जास्तीत जास्त फायदा होईल. त्यामुळे निकोप वाढीचा समतोल ढासाळतो व त्याच्या ऱ्हासाला सुरवात होते ज्या गटाला जास्त फायदा झाल्यामुळे तो इतरांपेक्षा शक्तिमान ठरतो. तेव्हा तो आपल्याला फायदा मिळणाऱ्या नवविचारांच्या भागालाच ज्यातून त्या गटाचा जास्त फायदा होत असतो जास्त महत्व निर्माण करून देतो. त्यातून नवविचारांचा समतोल संपूर्ण ढासळतो. त्यातून तोटे अधिक होवू लागतात, तेव्हा तो विचार त्याज्य ठरवून त्याच्या ऐवजी दुसरा नवविचार अमलात आणला जातो. त्याचीही अमलबजावणी पहिल्या विचाराप्रमाणेच घडवून

आणली जाते व शेवटी त्यालाही त्याज्य ठरवून तिसरा नवविचार अमलात आणला जातो. असा हा क्रम चालत जातो.

राजकीय क्षेत्रात व आर्थिक क्षेत्रात कालमानानुसार व परिस्थितीनुसार नवी विचारप्रणाली अमलात आणली गेलेली आहेत. प्रत्येक नवविचार प्रणालीही विशिष्ट काळात व विशिष्ट परिस्थितीतच लागू पडत आलेली आहे. विचार अमलात आणित असताना परिस्थितीत बदल घडवून येवू लागतो. ती बदलत जाणारी परिस्थिती पुढे प्रगतीपेक्षा विनाशास अधिक कारणीभूत ठरवू लागते. तेव्हा त्यावरील उपाय म्हणून ती विचार प्रणाली त्याज्य ठरवून तिला काढून टाकले जाते व नव विचारप्रणाली अमलात आणली जाते. राजेशाही, सरंजामशाही, भांडवलशाही, लोकशाही, समाजवादी व साम्यवादी अशा विविध प्रकारच्या नव नवीन विचारप्रणाल्या अमलात आणून पाहिल्या परंतु एकही विचार प्रणाली मानवाची निकोपवाढ घडवून आणू शकली नाही. विचार बदलांचा जो हा क्रम सतत चालू असतो. त्यात विचार प्रणाली त्याज्य ठरते म्हणजे निश्चित काय होते ? ती कशावरून निरूपयोगी झाली असे म्हटले जाते.

प्रथम राजेशाही प्रस्थापित करण्यात आली तेव्हा तिच्या मागील हेतू हा होता की. राजाने त्याच्या प्रजेस संरक्षण व सुखसोयी उपलब्ध करून द्याव्यात. त्या करीता प्रजेच्या श्रमातून निर्माण होणाऱ्या पैशातून राजाला कर देण्यात येत असे व त्याच पैशातून राजाने प्रजेचे संरक्षण करावे. व सुखसोयी उपलब्ध करून द्याव्यात. सुरवातीला हे कार्य राजाने व्यवस्थित पार पाडले होते. परंतू पुढे राजा त्या पैशाच्या उपयोग स्वताची चैन करण्याकडे व स्वतःची महत्वाकांक्षा पूर्ण करण्याकडे म्हणजे युद्ध करुन परकीय मूलुख जिंकण्यासाठी करुन घेऊ लागला. राजाच्या चैनबाजी व महत्वाकांक्षा यामुळे प्रजेने श्रमातून मिळविलेल्या पैश्याचा अपव्यय होवू लागला. युद्ध करुन

मिळवलेल्या नवीन प्रदेशाचा तसा कोणताही फायदा प्रजेला होत नव्हता. परंतु या दोन्हीसाठी जो भरमसाठ पैसा लागत असे तो प्रजेकडून वसूल करुन घेतला जात असे. जेव्हा पैसे देणे प्रजेच्या आवाक्या बाहेर होवू लागले तेव्हा प्रजेकडून राजशाहीला विरोध होवू लागला. हा पैसा सक्तीने वसूल करण्यात येवू लागला तेव्हा राजा जुल्मूम करीत आहे असंतोष पसरु लागला. पुढे त्यातून राजेशाही नष्ट होण्यात त्याचे परिणाम दिसून आले.

राजेशाहीचा हेतू राजाने प्रजेच्या जीवाचे व वीत्ताचे रक्षण करावे व सार्वजनिक सुख सोयी उपलब्ध करुन द्याव्यात हा होता. हा हेतू सुख प्राप्ती हा मानवी हेतूशी संबधीत होता. राजा चैनबाजी करीत होता तेव्हा प्रजेने त्याची दखल घेतली नाही राजा युद्ध करुन त्याची महत्वाकांक्षा पूर्ण करुन घेत होता. तेव्हाही प्रजेने त्याच्या विरुद्ध प्रतिक्रिया दाखविली नाही. परंतू जेव्हा त्यासाठी प्रजेची आर्थिक पिळवणूक होवू लागली तेव्हा राजा विरुद्ध प्रजेने तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली व राजेशाही नष्ट करुन टाकली.

पैशाची सक्तीने वसूली म्हणजे आर्थिकतेत प्रत्यक्ष ढवळाढवळ झाल्याने म्हणजे दुसऱ्या शब्दात पिळवणूक होवू लागल्यामुळे राजेशाही हि विचार प्रणाली त्याज्य ठरविण्यात आली याच पद्धतीने संरजामशाहीत ही संरजामदारानी रयतेची पिळवणूक करण्यास सुरुवात केली तेव्हा संरजामशाही त्याज्य ठरविण्यात येवून तिलाही काढून टाकण्यात आले. भांडवलशाहीत भांडवलदारानी कामगाराची पिळवणूक घडवून आणली म्हणून ती त्याज्य ठरवून समाजवादी विचार प्रणाली आमलात आणण्यात आल्या.

राजेशाही, संरजामशाही, भांडवलशाही, समाजवाद, व साम्यवाद ह्या राजकिय व आर्थिक विचारप्रणाल्या मांडण्यात आल्यात व त्याज्य ठरविल्या गेल्यात. त्या मांडताना योजलेले हेतू व त्याज्य ठरविताना दाखविलेली कारणे ही आर्थिक क्षेत्राशी संबधीत होती.

त्यावरून आर्थिक क्षेत्राचा प्रभाव राजकीय क्षेत्रात वर्चस्व गाजवित असतो व फक्त आर्थिक प्रभावामुळेच विचारप्रणाली त्याज ठरविली जाते असे दिसून येते.

राजकीय क्षेत्र व आर्थिक क्षेत्र प्रत्यक्ष आर्थिक हितसंबध जोपासण्याचे कार्य करीत असते. राजकीय क्षेत्रातून आर्थिक क्षेत्रावर प्रभाव निर्माण होत असताना आर्थिक क्षेत्र हे त्याच्या भूमिकेतून राजकीय क्षेत्रावर आपला प्रभाव कळत नकळत गाजवित असते. जेव्हा राजकीय क्षेत्र व आर्थिक क्षेत्र यांचा संघर्ष घडवून येतो तेव्हा राजकीय क्षेत्रात बदल होवू लागतात.

त्याचप्रमाणे आर्थिक क्षेत्र हे इतर क्षेत्राशी ही वरील भूमिकेतून प्रभाव गाजवित असते. जेव्हा इतर क्षेत्राचा आर्थिक क्षेत्राशी संघर्ष झडू लागतो तेव्हा त्या क्षेत्रात बदल घडू लागतात.

जेव्हा आर्थिक पिळवणूक घडू लागते तेव्हा ती विचार प्रणाली त्याज्य ठरविली जाऊ लागते व त्यावर प्रक्रिया होत जावून शेवटी त्याला काढून टाकण्यात येते व तीची जागा दुसऱ्या विचार प्रणालीने भरून काढण्यांत येते. असा निष्कर्ष वरील विवेचनातून निघतो.

आर्थिक क्षेत्रात आर्थिक विचार प्रणाली ही फक्त आर्थिक घटकांचा विचार करीत असते. म्हणून आर्थिक क्षेत्रातील बदल सर्वांत अधिक संवेदनशील असतात. भांडवलशाही विचारप्रणालीचे साम्यवादी विचारप्रणालीत झालेले स्थित्यंतर हे तुलनात्मक दृष्टचा जलद घडून आलेले दिसून येते.

राजकीय व आर्थिक क्षेत्रात पिळवणूक घडवून येवू लागल्यामुळे त्याच्या विचारप्रणालीत बदल घडवून आणले जातात. म्हणजे पिळवणूक ही राजकिय व आर्थिक क्षेत्राची निकोप वाढ होऊ देत नाही असे दिसून येते.

आर्थिक पिळवणूक हा आर्थिक क्षेत्राचा प्रभाव. हा मानवी जिवनाच्या विविध अंगाचा विचार करणाऱ्या क्षेत्राची निकोप वाढ होवू

देत नाही. या निष्कर्षापर्यंत वरील विवेचनातून पोहचता येते.

शिक्षण मानवाचे सुबुद्ध व सुशिल घडण करण्यास असमर्थ ठरले आहे. इतिहास मानवाला घातक ठरत आहे. सर्व भौतिक शास्त्रांची वाढ ही त्याच्या प्रगतीपेक्षा त्याच्या ऱ्हासास अधिक कारणीभूत ठरते. अणुशक्तिचा उपयोग प्रगतीपेक्षा त्याच्या विनाशासाठी अधिक करण्यांत आलेला आहे. असे कोणते क्षेत्र आहे की, ज्याची वाढ निकोप घडून आल्याचे छातीठोकपणे सांगता येईल ? हे सर्व त्याच्यावर आर्थिक क्षेत्राच्या पिळवणूकीच्या प्रभावामुळे घडवून आलेले आहे.

जो आर्थिक प्रभाव म्हणजे पिळवणूक विचारप्रणाली बदलण्यास कारणीभूत ठरतो तोच आर्थिक प्रभाव त्याची निकोप प्रगती होवू देत नाही. त्यानी सर्वत्र हाहःकार माजविला आहे. तो प्रभाव मानवास त्याच्या विनाशाकडे घेवून चालला आहे.

आर्थिक पिळवणूक नष्ट झाल्याशिवाय मानवाची निकोप प्रगती होवू शकणार नाही. आर्थिक क्षेत्रात प्रभावी असलेली ही पिळवणूक त्याच्यात विकृती घडवून आणते. त्या विकृत आर्थिक क्षेत्राच्या प्रभावामुळे इतर सर्व क्षेत्रामध्यें विकृत स्वरूप धारण केले जाते. पिळवणूक नष्ट झाल्यास आर्थिक क्षेत्रात विकृती निर्माण होणार नाही. व त्यामुळे सर्व क्षेत्रांची वाढ निकोप होवू शकेल.

पिळवणूक नष्ट करण्यासाठी तिचा पूर्ण छडा लावला पाहिजे. तिची मुळे कुठे रुतलेली आहेत. ती शोधून काढून नष्ट केल्याशिवाय पिळवणूकीचे संपूर्ण उच्चाटन होणार नाही.

पिळवणूक घडून येत असताना तिचे एक वैशिष्ट्य स्पष्ट दिसत असते ते हे कि पिळवणूक ही क्रिया घडून येण्यासाठी दोन गट आवश्यक असतात. एक गट पिळवणूक करणारा असतो, व दुसरा गट पिळवणूक होणारांचा असतो. पिळवणूक क्रियेतून पिळवणूक करणाऱ्या गटाकडे संपत्तीचा ओघ वहात असतो, संपत्तीचे केंद्रीकरण होत गेल्याने तो संघटित परंतु अल्पसंख्यांक होत असतो. तर

पिळवणूक होणारा गट संपत्तीच्या अभावामुळे असंघटित व बहुसंख्यांक असतो, पिळवणूक करणाऱ्या गटाकडे संपत्तीचे केंद्रीकरण झाल्याने व तो संघटीत होत गेल्याने अल्पसंख्यांक असूनही प्रबळ होत जातो. पिळवणूक होणारा गट संपत्तीच्या अभावामुळे असंघटित होत गेल्याने बहुसंख्यांक असूनही दुर्बल होत जातो.

पिळवणूक करणारा हा गट प्रबळ असल्याने तो वरच्या थरांतील असतो. समाज प्रबोधनाची सर्व साधने त्याच्याच हातात एकवटलेली असतात. विचारप्रणाली अमलात आणण्याचे कार्य तोच हाताळीत असतो. त्या विचारप्रणाली अमलात आणित असताना तो आपले आर्थिक हितसंबंध जोपासण्याच्या प्रयत्नात असतो. त्याच्या हातात अमलबजावणीची सर्व सूत्रे एकवटलेली असल्याने त्याला त्याचे आर्थिक हितसंबंध जोपासणे शक्य होते; त्यातून त्याला अधिक लाभ करुन घण्याचा कळत न कळत मोह पडतो, त्या अधिक लाभामुळे तो शक्तिमान होत जातो व त्या शक्तिचा उपयोग तो अधिक लाभ करुन घेण्यासाठी करु लागतो आणि हे त्याच्या हातात सर्व सूत्र असल्याने शक्य होत जाते. पुढे हे प्रमाण इतके वाढत जाते की, पिळवणूक होणाऱ्या गटाला त्यांच्या जीवनावश्यक गरजा भागविणे शक्य होईनासे होते.

नव विचारप्रणाली अमलात आणताना प्रगतीची स्वप्ने दाखविलेली असतात त्या स्वप्नाने पिळवणूक होणारा गट विशेष आर्थिक लाभ होईल या विचाराने भारावलेला असतो. त्या भारावलेल्या स्थितीत तो नवीन कार्यात मग्न होऊन जातो. या गाफिलपणाचा फायदा पिळवणूक करणाऱ्या गटाला होत असतो. पिळवणूक होणाऱ्या गटाची पिळवणूक करणे, त्याचमुळे सुलभ होवून बसते. पिळवणुकीने पिळवणूक होणाऱ्या गटाची आर्थिक हानी होवू लागते पुढे त्याच्या जिवनावश्यक गरजाही भागविणे त्याला शक्य होत नाही. तो असंघटीत व दुर्बल झाल्यामुळ असाहाय्य होतो आणि जेव्हा तो संघटित केला जातो.

त्यातून तो पिळवणूक करणाऱ्या गटाला पिळवणूक करण्यास प्रतीबंध करतो.

पिळवणूक क्रिया घडून येणाऱ्या दोन गटात होणाऱ्या प्रक्रियांचा सांराश रूपाने आढावा वर घेतला आहे दोन गटात घडून येणाऱ्या पिळवणूकीच्या प्रक्रियेचे परिक्षण करून त्यातून त्याचे काही महत्वाचे मुद्दे बाजूला काढून त्याचे विश्लेषण केले पाहिजे.

पिळवणूक करणारा गट विचारप्रणालीची अमलबजावणी करताना आपले आर्थिक हितसबंध जोपासण्याचे प्रयत्न करीत असतो. आर्थिक हितसंबंध जोपासणे म्हणजे आर्थिक लाभ मिळवण्याचा त्याचा प्रयत्न असतो. तो आर्थिक लाभ मिळून त्यातून निर्माण होणाऱ्या शक्तिचा उपयोग परत अधिक आर्थिक लाभ करून घेण्यासाठी करून घेत असतो. म्हणजे अधिक आर्थिक लाभ करुन घेणे याकरिता तो पिळवणूक करीत असतो असे दिसते.

पिळवणूक होणाऱ्या गटाच्या जेव्हा जिवनावश्यक गरजाही भागविल्या जात नाहीत. तेव्हा त्याचे आर्थिक हितसंबंध धोक्यात येतात. तेव्हा तो पिळवणूकी विरूद्ध आवाज उठवितो. पिळवणूक करणाऱ्या गटाचा प्रतिकार करण्यास प्रवृत्त होतो. आर्थिक हितसंबंध धोक्यात येतात म्हणजे त्याच्या जिवनावश्यक गरजाही भागविल्या जात नसतात तेव्हाच तो प्रतिकारास तयार होत असतो.

पिळवणूक करणाऱ्या गटाला पिळवणूक करण्यास प्रवृत्त करण्याला हा आर्थिक हितसंबंध कारणीभूत असतो त्याचप्रमाणे पिळवणूक होणाऱ्या गटाला पिळवणूकीविरोधी आवाज उठवण्यास आर्थिक हितसंबंध प्रवृत्त करीत असतात. म्हणजे दोन्ही गटांची पिळवणूक प्रक्रिया घडवून आणणारा प्रेरक त्यांचे आर्थिक हितसंबंधहि असतात.

आर्थिक हितसंबंधांतून पिळवणूक घडून येत असते म्हणून आर्थिक हितसंबंधाचे विश्लेषण केले गेल्यास पिळवणूकीची पाळेमुळे शोधण्यास मदत होईल.

आर्थिक हितसंबंध जोपासणे म्हणजे आर्थिक लाभ होत राहील असे बघणे व आर्थिक हितसंबंधास धोका होणे म्हणजे आर्थिक हानी घडून येणे असे ढोबळ मानाने म्हणता येईल. आर्थिक लाभ होणे म्हणजे गरजापूर्तता करणाऱ्या साधनांची प्राप्ती होणे, तर आर्थिक हानी म्हणजे त्या साधनांची अपेक्षित प्राप्ती न होणे होय. साधारण असे आर्थिक लाभ व आर्थिक हानी यांचे विश्लेषण करता येते.

साधनांच्या उपभोगातून गरजेची पूर्तता होवून मानवी जीवनाचा सुखप्राप्ती हा हेतू सफल केला जात असतो. म्हणजे साधनांच्या अधिक संपादनातून तो सुखप्राप्ती अधिकाधिक करुन घेत असतो दुसऱ्या शब्दात असे म्हणता येईल की मानवी जीवनाचा हेतू सुखप्राप्ती सफल करून घेण्यासाठी आर्थिक हितसंबंध जोपासले जातात. म्हणजे पिळवणूक ही मानवी जीवनाचा सुखप्राप्ती हा हेतू सफल करण्यासाठी घडून येत असते. मानव त्याच्या जिवनाचा हेतू सफल करण्यासाठी पिळवणूक करण्यास प्रवृत्त होतो असे स्पष्ट होते.

सुखप्राप्ती ही जैविक प्रक्रिया आहे. पिळवणूकीची मुळे त्या सुख प्राप्तीपर्यंत पोंहचतात. म्हणजेच पिळवणूकीची मुळे जैविक प्रक्रियेत रूतून बसलेली आहेत, मानवी जीवनाचा हेतू सुखप्राप्ती जी गरजांच्या पूर्तता करणाऱ्या साधनातून मिळत असते. त्या गरजांची पूर्तता करणाऱ्या साधनांचे संपादन पिळवणूकीने केले जाते. सुखप्राप्ती या जैविक प्रक्रियेपासून पिळवणूक घडून येते. या पिळवणूकीच्या मूळाचा शोध जैविक प्रक्रियेच्या विश्लेषणातून घेतला पाहिजे.

* * *

॥ पिळवणूक ॥

मानवी जीवनाच्या अंगाचा विकास घडवून आणणारी जी विविध क्षेत्रे आहेत त्याची निकोप वाढ घडवून येत नाही. प्रत्येक क्षेत्र हे आपली निकोप वाढ करुन घेण्यास असमर्थता दर्शवित आहे. प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष आर्थिक प्रभाव त्यांची निकोप वाढ घडवून येऊ देत नाही. ते प्रभाव कार्यान्वीत झालेले असतांना त्यांचे स्वरुप उघडे होवू नये म्हणून कसोशीने प्रयत्न करीत असतात. कारण तशी ती उघड स्वरुप धारण करु लागली की, तिचे उच्चाटन करण्याचा प्रयत्न केला जातो. परंतु जेव्हा तसे ते नष्ट करण्याचे प्रयत्न केले जातात. तेव्हा ती नष्ट न होता तिचे बाह्य रुप बदलून नवीन रुपाने आपला प्रभाव निर्माण करीतच असतात. भांडवलदारांच्या पिळवणूकीतून मुक्त झाल्याने त्यांची पिळवणूक होण्याचे थांबलेले नाही. आता साम्यवादी त्यांची पिळवणूक घडवून आणित आहेत. मानवी अंगाचा विचार करणाऱ्या क्षेत्रातच पिळवणूक चालत असते असे नव्हे तर मानवाच्या प्रत्येक कृतीमध्ये या ना त्या स्वरूपांत ती आढळून येत असते. भांडवलदार

पिळवणूक करतो, अशी ओरड करणारा कामगार त्याच्या घरी काम करणाऱ्या मोलकरणीला योग्य मोबदला देतो काय ?

सौदेबाजी, हे एक पिळवणूकीला मानवाने दिलेले मान्यताप्राप्त स्वरूप आहे. ते मानवावरील असलेला पिळवणूकीचा प्रभाव दर्शविते. एखाद्या वस्तूची किंमत ठरविणे म्हणजे सौदेबाजी असे म्हणता येईल. वस्तू विकणारा अगोदर एक किंमत सांगतो, वस्तू घेणारा त्याच्या पेक्षा कमी किंमतीला ती वस्तू खरेदी करण्याची इच्छा प्रदर्शित करतो. नंतर ती किंमत सौदा पूर्ण न झाल्याने कमी करुन सांगितली जाते. त्यातून घेणारा त्या वस्तूची किंमत वाढवून सांगतो. त्या प्रक्रियेतून भाव निश्चित केला जातो. अगोदर वस्तू विकणारा किंमत सांगताना त्या वस्तूची मनात एक किंमत निश्चित करून ठेवतो. तिच्यापेक्षा ती वस्तू कमी किंमतीला ती वस्तू विकावयाची नाही असे त्याने अगोदरच ठरविलेले असते. म्हणजे अगोदर सांगितलेली किंमत हि प्रत्यक्ष किंमतीपेक्षा त्याला अधिक किंमत मिळाल्यास घ्यावी ही त्याची इच्छा दर्शविते. वाजवीपेक्षा जास्त किंमत घेण्याच्या त्याच्या इच्छेत पिळवणूकीचा प्रभाव दिसून येतो. तर ती वस्तू घेणाऱ्याच्या मनात अगोदरच त्या वस्तूची खरेदी करण्याची किंमत ठरलेली असते. परंतु ती जर कमी किंमतीत मिळाली तर घ्यावी, या त्याच्या इच्छेत पिळवणूकीचाच प्रभाव दिसून येतो. सौदेबाजीतील विक्री करणारा किंवा विकत घेणारा यापैकी जर एखादा जादा गरजवंत निघाल्यास किंवा अधिक वरचढ निघाल्यास जो वरचढ ठरेल तो आपली सौदेबाजीतील इच्छा सफल करून घेतो व दुसऱ्याची पिळवणूक घडवून आणतो असे हे चित्र मानवी जीवनाच्या सर्व व्यवहारांमध्ये दिसून येत आहे.

पिळवणूकीने जगात अनर्थ ओढवला आहे. त्यानेच मानवी जीवन विस्कटून टाकले आहे व जगात असंतोष पेटता ठेवला आहे. मानवी अंगाची सर्व क्षेत्रे विकृत करून ठेवली आहेत. प्रत्येक शास्त्राचा

उपयोग त्याच्या प्रगतीपेक्षा नाशासाठी आधिक केला जात आहे. मानवातील दर्जा व भेद त्यातूनच निर्माण झालेले आहेत. दोन व्यक्ति समूह, दोन समाज, दोन धर्म, दोन राष्ट्रे यांच्यातील संघर्षाचे कारण पिळवणूकीतूनच निर्माण होत असते, त्यातूनच युद्धे होतात व प्रचंड हत्याकांड घडून येते. ही त्याची वाटचाल त्याला त्याच्या सर्वनाशाकडे घेवून जात आहे आणि ती अशीच चालू ठेवल्यास परिणाम स्पष्ट आहेत.

पिळवणूकीचा दृश्य भयानक परिणाम म्हणजे मानवातील दारिद्रय. जगात जे दारिद्रय पसरलेले दिसून येत आहे त्यात मानवाला त्याच्या जिवनावश्यक गरजाही भागविणेही अशक्य होवून बसले आहे. पिळवणूकीने जे गरजांच्या पुर्तता करणाऱ्या साधनाचे जे केंद्रिकरण घडून येत असते, त्यामुळे दारिद्रय निर्माण होवू लागते आणि त्या दारिद्रयामुळे मानवाला निसर्गाने दिलेल्या हक्कांची पायमल्ली होत असते. जगात घडून आलेल्या युद्धांचे कारण हे पिळवणूकच आहे. पिळवणूक करणारा गट व पिळवणूक होणारा गट यांच्यातील तीव्र संघर्ष म्हणजे युद्ध होय. बाह्य स्वरुप व कारणे कोणतीही दर्शविली असली तरी युद्धाच्या मुलांशी पिळवणूकच दडलेली असते. युद्धात घडून येणारी मानवी हत्या व साधनसामुग्रीची होणारी अपरिमित हानी यानी मानवाला दैन्यावस्थेत नेले आहे.

राष्ट्र ही कल्पनाही पिळवणूकीचेच फलित आहे. तिने मानवाचा मोठ्या प्रमाणात नाश घडवून आणला आहे. राष्ट्र या सिमेरेषेतील जनतेची पिळवणूक घडवून आपल्यास अंतर्गत पिळवणूक करणाऱ्या गटाला ते मिळालेले संरक्षण आहे. तर पिळवणूकीसाठी घडून येणाऱ्या मानवी हत्येचे ते निमित आहे. राष्ट्र या कल्पनेने मानवामानवामध्ये खोल दरी निर्माण करुन ठेवली आहे. त्याने मानवी जीवन विकृत व विनाशाभिमुख झालेले आहे.

अशा या मानवी विनाश घडवून आणित असलेल्या पिळवणूकीचे संपूर्ण उच्चाटन केल्याशिवाय मानवाची त्याच्या सर्वनाशाच्या संकटा-

पासून सुटका करून घेता येणार नाही व समस्त मानवजातीचे जीवन सुखी व समृद्ध होणार नाही. पिळवणूकीचे संपूर्ण उच्चाटन करण्या. साठी तिची पालेमुळे शोधून काढून ते नष्ट करणे हे सर्वात महत्वाचे ठरते.

मानवाच्या जैविक प्रक्रियेत पिळवणूकीची मुळे रुतलेली आहेत हे मागच्या प्रकरणांत निदर्शनास येते त्यांचा पूर्ण शोध घेण्यासाठी जैविक प्रक्रियेचे विश्लेषण करावे लागले.

मानवी जीवनाचा हेतू सुख प्राप्ती करून घेणे हा आहे. सुख प्राप्ती ही त्याच्या गरजेच्या पूर्तता करणाऱ्या साधनांच्या उपयोगातून मिळते. जितकी गरजा पूर्ततेची साधने विविध तितकी सुखाची प्राप्ती आधिक होत असते. म्हणून विविध साधने संपादन करण्यांकडे नैसर्गिक ओढ असते. त्याची ही जी साधने संपादन करण्याची ओढ असते तिला स्वार्थ या नांवाने ओळखले जाते. ही ओढ किंवा स्वार्थ विविध साधने संपादन करून घेण्याच्या प्रयत्नात असतात. त्या अनुरोधाने स्वार्थ मानवाच्या कृतीवर परिणाम घडवून आणित असतो. काही साधने तो स्वतः निर्माण करीत असतो. त्याच्या साधनांच्या निर्मिती क्षमतेवर मर्यादा असतात. त्यामुळे तो विविध प्रकारची साधने स्वतः निर्माण करू शकत नाही. तेव्हा स्वतः निर्माण केलेली साधने देऊन त्या मोबदल्यांत इतरांकडून तो विविध साधने घेत असतो. या प्रकारे तो विविध साधने संपादन करून सुखाची प्राप्ती अधिकाधिक करून घेत असतो.

साधने संपादन करण्याची जी ओढ जीला आपण स्वार्थ म्हणतो त्याला ती विविध साधने संपादन करण्यास प्रवृत्त करीत असतो साधने संपादन करण्यास स्वार्थ दोन मार्गाने ती संपादन करीत असतो. त्यातील एका मार्गाला सहकार्य प्रवृत्ती व दुसऱ्याला पिळवणूक प्रवृत्ती असे म्हणतात. त्या दोन मार्गाने स्वार्थ सुख प्राप्ती करून घेण्यासाठी लागणारी साधने संपादन करुन घेत असते.

सहकार्य प्रवृत्तीचे विश्लेषण पुढील प्रमाणे होते. एकाने निर्माण केलेल्या साधनावर ती साधने उपभोगण्याचा त्याचा पूर्ण हक्क मान्य करणे व त्या साधनांच्या समान मोबदल्यात दुसऱ्याने निर्माण केलेल्या साधनांची देवाण घेवाण करणे.

पिळवणूक प्रवृत्तीचे विश्लेषण पूढील प्रमाणे आहे. एकाने निर्माण केलेल्या साधनावर ती साधने उपभोगण्याचा त्याचा पूर्ण हक्क मान्य न करणे व त्या साधनांच्या असमान मोबदल्यात दुसऱ्याशी देवाण घेवाण घडून येणे.

मानवी जीवनाचा सुखप्राप्तीचा हेतु साध्य करण्यासाठी स्वार्थ गरजेची पूर्तता करणाऱ्या साधनांची उपभोगण्यासाठी सहकार्य प्रवृत्तीने अथवा पिळवणूकीच्या प्रवृत्तीने ती साधने संपादन करून घेऊ शकत असतो, परंतु स्वार्थ हा पिळवणूक प्रवृत्तीचाच मार्ग जास्त अवलंबित असतो त्याचे कारण त्याचा असा समज करुन दिला जातो की, पिळवणूक प्रवृत्तीने साधनांचे संपादन त्वरीत व जादा होत असते.

पिळवणूक प्रवृत्ती आर्थिक क्षेत्रात प्रकर्षाने झालेली दिसून येते. कारण आर्थिक क्षेत्रात साधनांची निर्मिती व विनिमय घडून येत असतो. पिळवणूक प्रवृत्ती साधनांचे संपादन करीत असते. म्हणून पिळवणूक प्रवृत्ती आर्थिक क्षेत्रात अधिक स्पष्ट स्वरुपात प्रकट होत असतो आणि इतर क्षेत्रात त्याच्यावर असलेल्या आर्थिक प्रभावाच्या अनुषंगाने ती कमी जास्त प्रमाणात दिसून येत असते.

सहकार्य प्रवृत्ती व पिळवणूक प्रवृत्ती या दोघांचाही उपयोग होत असतो. पिळवणूक प्रवृत्तीचा उपयोग अधिक होतो. त्या मानाने सहकार्य प्रवृत्ती अल्प प्रमाणात उपयोगात आणली जाते. प्रगती ही सहकार्य प्रवृत्तीतून घडून येत असते. साधनांचे विनिमय हे समान मोबदल्यात होते, त्यामुळे अधिक सुखाच्या प्राप्तीसाठी जी विविध साधने लागतात. ती मिळविण्यासाठी त्याची निर्मिती करणे अपरिहार्य ठरते. आधिक साधनाची निर्मिती म्हणजे प्रगती होय. त्याने

निर्माण केलेल्या साधनावर त्याचा पूर्ण हक्क मान्य केलेला असतो. त्या साधनांचा उपभोग पूर्ण घेता येतो. व त्याची सुखप्राप्ती त्यातूनच सफल होते, त्यामुळे त्याच्यात आधिक सुखाची प्राप्ती करुन घेण्यासाठी प्रयत्न सुरू होतात. त्यासाठी त्याला अधिक साधनांची निर्मितो करणे आवश्यक ठरते. त्यातून अधिक साधनांची निर्मिती घडून येऊ लागते. हा क्रम वाढत जातो. आधिकाधिक साधनांची निर्मिती करण्यासाठी तो त्याची बुद्धी व शक्ती यांचा अधिकाधिक उपयोग करु लागतो आणि तो प्रगतीच्या दिशेन द्रुत गतीने जाऊं लागतो व त्यातूनच त्याच्या बुद्धीचा व शक्तीचा विकास घडून येऊ लागतो व त्याचे जीवन समृद्ध होऊ लागते.

पिळवणूक प्रवृत्ती ही प्रगती विरोधी व विनाशास कारणीभूत ठरते. पिळवणूक प्रवृतीत साधनांचा विनिमय हा असमान मोबदल्यात घडून येत असतो. त्याने निर्माण केलेल्या साधनांच्या मोबदल्यात त्याला कमी साधने मिळतात. त्याची सुखाची प्राप्ती करुन घेण्यासाठी त्याला ती अपूरो पडतात. त्यामुळे त्याला सुखाची प्राप्ती पूर्ण न झाल्याने अधिक सुखाची प्राप्ती करुन घेण्यासाठी विविध साधनांचे संपादन करण्याची ओढ रहात नाही. त्यामुळे अधिक साधनांच्या निर्मितीस खिळ बसते. म्हणजेच प्रगतीला अडथळा निर्माण होतो तर त्याने निर्माण केलेल्या साधनांचा पूर्ण उपभोग घेण्याचा हक्क डावलला गेल्यामुळे त्याच्या जीवनाचा हेतू सुखप्राप्ती याच्यात अडथळा निर्माण होतो. त्यामुळे त्याच्यात असंतोष निर्माण होतो व त्याचे रूपांतर संघर्षात होते. सुरक्षितता धोक्यात येते.

सहकार्य प्रवृत्ती समानता निर्माण करते बंधुभाव बाळगते व स्वतंत्र्य अबाधित राखते.

पिळवणूक प्रवृत्ती केंद्रिकरण घडवून आणते, वैमनस्य निर्माण करते व गुलामी वाणवते.

पिळवणूक प्रवृत्तीतूनच मानवाचा मानवाविरूद्ध संघर्ष पेटला आहे. मानवी जीवनाच्या सुख प्राप्तीच्या हेतूमध्ये अडथळा निर्माण करण्यात आल्यामुळे जगात प्रचंड असंतोष निर्माण झाला आहे.

एक गट दुसऱ्या गटाची पिळवणूक करू लागतो तेव्हा पिळवणूक करणाऱ्या गटाकडे गरजेपेक्षा अधिक साधने निर्माण होत जातात. पिळवणूक होणाऱ्या गटाची गरजांची पूर्तता होणे कमी होत जाते. पिळवणूक करणाऱ्या गटाकडे अधिक साधने असल्याने तो बलवान होऊ लागतो. त्याचा उपभोग तो इतर क्षेत्रांत आपले वर्चस्व निर्माण करण्यासाठी करून घेऊ लागतो.

पिळवणूक करणाऱ्या गटातील वरचा थर त्याच्या खालच्या थरातील लोकांची पिळवणूक करीत असतो. वरच्या थरातील जी सर्वश्रेष्ठ व्यक्ति असते ती वरच्या थरातील लोकांची पिळवणूक करीत असते. लहान माशाला त्याच्यापेक्षा मोठा मासा गिळतो. मोठ्या माशाला त्याच्या पेक्षाही मोठा मासा गिळतो. त्याप्रमाणे पिळवणूक घडून येत असते

सर्वात वरच्या थरात जी सर्वात श्रेष्ठ व्यक्ति असते तिच्या दिशेने साधनांचा ओघ सुरु होतो त्यामुळे ती सर्वात बलवान होत असते. पिळवणूक होणाऱ्या गटातील सर्वात खालचा थर हा सर्वात अधिक दुर्बल होत जातो.

पिळवणूकीमुळे मानवाची बुद्धी व शक्ती, वेळ व साधने यांचा अपव्यय घडून येत असतो. इतिहास मानवी बुद्धी, शक्ती, वेळ व साधने यांचा मानवाने आजपर्यंत केलेला नाश यांचे दर्शन घडवतो व पूढील नाश घडून आणण्याची नांदी ठरतो. इतिहासातील कोणत्याही काळातील व कोणत्याही स्थानावरील कोणतीही घटना ही पिळवणूक करणारा व पिळवणूक होणारा या दोन गटातील संघर्षातून निर्माण झालेली आहेत. जो त्यात विजयी होतो तो पिळवणूक करणारा होतो. जो पराजित होतो तो पिळवणुक होणारा ठरतो. त्या संघर्षात

मानवी हत्त्या घडून येते. त्यामुळे मानवी बुद्धी व मानवी शक्ति यांचा नाश घडवून येतो. त्या बुद्धीचा व शक्तिचा उपयोग साधनांच्या निर्मितिसाठी करून घेतला असता तर संघर्षातून संपादन केलेल्या साधनांपेक्षा त्याच्याकडे विविध साधनांची अधिक उपलब्धता झाली असती व त्याचे जीवन अधिक सुखी व सुरक्षित झाले असते. पिळवणूकच मानवी हत्याकांड घडवून आणते. सुखाची प्राप्ती करणारी साधने संपादन करण्याकरीता पिळवणूक केली जाते. सुखप्राप्ती ही मानवी हत्त्यांतून होत नाही. त्याकरीता मानवाने निर्माण केलेल्या साधनांची आवश्यकता असते. तरी ही तो सुखाच्या प्राप्तीसाठी मानवी हत्याकांड करीत असतो. म्हणजे पिळवणूकीने त्याचे भान हरपले आहे व त्या बेभान झालेल्या स्थितीत स्वतःचा नाश घडवून आणीत आहे.

पिळवणूक प्रवृत्तीखाली मानवावर त्याच्या स्वभावातील इतर घटक आपला प्रभाव निर्माण करून त्या अनुरोधाने त्याच्या त्या कृती घडवून आणण्यास भाग पाडीत असतो. मानवातील शौर्य, महत्त्वाकांक्षा व स्वार्थ, त्याग इ. त्याच्या विकासास कारणीभूत ठरतात असे सांगितले जाते. परंतु नीट विचार केल्यास असे आढळून येते कि, ते पिळवणूक प्रवृती खालील धारण केलेले स्वरुप असते. जे मानवी जीवनाचा हेतू सुख प्राप्ती करुन घेण्यासाठी कार्यान्वीत झालेले असते. साहस हे पिळवणूक प्रवृत्ती खाली शौर्य हे स्वरुप धारण करते. साहसाचा उपयोग मुलतः सुखाच्या साधनांचा शोध घेण्यासाठी करून घ्यावयाचा असतो. पर्वताच्या शिखरावर जाण्याचे साहस व समुद्राच्या तळाशी जाण्याचे साहस यातून साहसाचा आनंद मिळतो. असे साहस करून त्याला विविध सुखाची साधने यांचा शोध घेता येतो. त्यामुळे त्याचे जीवन सुखी होत असते, त्या साहसाला पिळवणूकीने शौर्य हे नाव देऊन मानवाने त्याचा हत्त्याकांड आरंभला आहे.

महत्वाकांक्षा म्हणजे एखादी गोष्ट साध्य करण्याची तीव्र इच्छा होय. महत्वाकांक्षेतून विविध व अधिक साधने मिळवण्याची ती इच्छा असते. 'मी राजा होणार' ही महत्वाकांक्षा राजा मानवी हत्या करू शकतो म्हणून ती बाळगली जात नाही. राजा उपभोगित असलेली सुखे, त्याचे सर्व साधनांवर असलेले नियंत्रण यातून त्याची राजा होण्याची महत्वाकांक्षा बाळगली जाते, म्हणजे महत्वाकांक्षा ही त्याच्या सुखाची प्राप्ती होण्याच्या हेतूशी सलंग्न असते परंतु बऱ्याच वेळा तीचा उपयोग मानवी हत्या घडवून आणण्यास कारणीभूत ठरतो. स्वार्थ त्याग ही कल्पना पिळवणूक प्रवृत्तीने मांडलेली आहे. दुसऱ्यांने स्वार्थ त्याग करावा असाच तीचा रोख असतो. स्वार्थ त्याग म्हणजे सुख प्राप्ती करणाऱ्या साधनांचा त्याग होय. पुरुषांनी स्त्रीयाना स्वार्थ त्यागी म्हणून संबोधून आपल्या सुखाचा हेतू साध्य करून घेतला आहे. स्वार्थत्याग ही कल्पना मानवी जीवनाचा हेतू सुख प्राप्ती याच्याशी ती विसंगत आहे. ती मानवास हितकारक ठरत नाही. ही कल्पना धर्माने निर्माण केली व राष्ट्राने ती उचलून धरली आहे.

स्वार्थ पिळवणूक प्रवृत्तीने साधने संपादन करतो तेव्हा त्याच्या इतर प्रवृत्तीवरही पिळवणूकीचा प्रभाव निर्माण होत जातो. त्याच्या सर्व प्रवृत्तींना पिळवणूकीचे स्वरूप प्राप्त होवू लागते. ते स्वरूप सार्वत्रिक झाले म्हणजे त्याला मान्यता मिळू लागते. त्यातुनच ती नैसर्गिक स्वरूपात असल्याचे ग्राह्य धरले जावू लागते.

पिळवणूक प्रवृत्तीतून साधनांचे केंद्रिकरण होते व त्याच्यातून निर्माण होणाऱ्या शक्तिचा उपयोग पुन्हा साधनाचे केंद्रिकरण करण्यासाठी करून घेतला जातो.

शक्ति निर्माण करण्यासाठी साधनांचे केंद्रिकरण केले जाते. व त्या शक्तिचा उपयोग पिळवणूक करण्यासाठी केला जातो.

मानवी जीवनाचा हेतू प्रजोत्पादन आहे असे म्हटले जाते परंतु ते चूकीचे ठरते प्रजोत्पादन हे लैंगिक क्रियेतुन होत असते. लैंगिक

क्रियेतून उत्कट सुखाची प्राप्ती होत असते. लैंगिक क्रियेमागे त्या उत्कट सुखाची प्राप्ती करुन घेणे ही प्रबळ इच्छा असते. लैंगिक क्रिया ही प्रजोत्पादन घडवून आणण्यापेक्षा सुखाची प्राप्ती करुन घेणे या प्रबळ इच्छेशीच अधिक संलग्न असल्याचे आढळून येत असते. लग्न करण्यामागे प्रजोत्पादन करणे हा हेतू नसतो तर ती लैंगिक क्रियेतून होणाऱ्या सुखाची प्राप्तीची ओढ असते. लग्न हे लैंगिक क्रियेतून मिळणाऱ्या प्राप्तीसाठीच केले जाते. त्यात प्रजोत्पादनाचा हेतू चिटकवला जातो, प्रजोत्पादन ही एक जैविक प्रक्रिया आहे. ही प्रजोत्पादनाची जैविक प्रक्रिया फक्त स्त्रीमध्येच घडून येत असते.

लैंगिक क्रियेतुन सुखाची प्राप्ती होत असते. ती सुखाची प्राप्ती करुन देणारी साधने म्हणजे स्त्री व पुरुष. स्त्रीचा उपयोग पुरुष साधन म्हणून करुन घेतो. तर पुरूषाचा उपयोग स्त्री साधन म्हणून करुन घेत असते. प्रजाउत्पादनातुन स्त्री व पुरुष निर्माण होत असतात. स्त्री व पुरुष हे सुखाची साधने आहेत. म्हणजे प्रजोत्पादन हा मानवी जीवनाचा हेतु नाही. तर मानवी जीवनाचा सुखप्राप्ती हा हेतु साध्य होण्यासाठी निसर्गाने निर्माण केलेली साधने आहेत. लैंगिक क्रिया ही प्रजाउत्पादनासाठी केली जात नाही ती सुखप्राप्तीची क्रिया आहे. त्यातून निसर्ग प्रजोत्पादन घडून आणित असतो.

लग्न हे पुरुषाने निर्माण केलेले स्त्रीवरील बंधन आहे. त्यात पुरुषाने लैंगिक क्रियेतुन मिळणाऱ्या सुखासाठी स्त्रीची केलेल्या पिळवणूकीचे दर्शन घडते. पुरुषाला त्याच्या इच्छेप्रमाणे हवे तेव्हा सुखाची प्राप्ती घेता यावी म्हणून स्त्रियांचा विरोध मोडून काढण्याचा तो यशस्वी प्रयत्न आहे. त्यात स्त्रिला नको असतानाही लैंगिक क्रियेत सहभागी व्हावे लागते. पुरुष लैंगिक क्रियेतून सुखाची प्राप्ती करुन घेण्यासाठी इतरस्त्रियांचा उपयोग घेण्यास स्वतःवरील बंधन मान्य करीत नाही. परंतु स्त्रिला इतर पुरुषांचा लैंगिक क्रियेत साधन म्हणून उपयोग करून घेण्यास बंधन लादून तिच्या सुखाच्या प्राप्तीच्या हेतु

मध्ये अडथळा करतो, त्यातून संघर्ष निर्माण होवू नये म्हणून तिच्या बुद्धीचे, शक्तिचे, मनाचे खच्ची करण करण्यात आले आहे. तिचे अशा रितीने खच्चीकरण करून त्याने अखिल मानव जातीचे अपरिमित नुकसान करून ठेवले आहे. लग्न या लादलेल्या बंधनातून स्त्रिची भयंकर पिळवणूक घडवून आणली जात आहे.

स्त्रिलाही आपला जीवनाचा हेतू सुख प्राप्ती हा सफल करून घेण्यासाठी गरजांची पुर्तता करणाऱ्या साधनाचा उपयोग घ्यावा लागतो. परंतु ती साधने संपादन करण्यासांठी त्यांना पुरुषावर अवलंबून रहावे लागते. त्यामुळे स्त्रियाची साधने निर्माण करण्याची क्षमता निरुपयोगी ठरते. मानवाची निम्मी संख्या स्त्रीयांनीयुक्त आहे. स्त्रीयांची साधने निर्माण करण्याची क्षमता निरुपयोगी केल्यामुळे त्याच्या होणाऱ्या मोठ्या प्रगतीला त्याला वंचित रहावे लागले आहे. हे केवळ पिळवणूक प्रवृत्तीतून पुरुषांना स्त्रियांचा उपयोग लैंगिक क्रियेत हवा तेव्हां करुन घेता यावा म्हणून घडवून आलेले आहे.

कुटुंब हे पिळवणूक प्रवृत्तीतून निर्माण झालेले आहे. त्यातील पती व पत्नीचे सहकार्य हे पत्नीचा विरोध मोडून काढून निर्माण केलेले आहे. धार्मिक बंधने आर्थिक परावलंबीत्व, सामाजिक दडपण त्या खाली तीचा विरोध मोडून काढून तिला पुरुषाची गुलाम बनविण्यात आले आहे. प्राण्यामध्य नर व मादी यांचे संबंध हे सहकार्य प्रवृत्तीतून प्रस्थापित झालेले असते. मादी स्वतंत्र असल्याचे दिसते. कुटुंबात मुलांवर जे संस्कार होतात ते पिळवणूक प्रवृत्तीच्या वातावरणाखाली होतात. पत्नी गुलाम व पती तिचा मालक हे स्वरुप त्यांच्यातील पिळवणूक प्रवृत्ती जोपासण्यास पती व पत्नी याच्यातील गुलाम व मालक यासंबंधाचा प्रभाव कळत न कळत मुलांवर घडून येत असतो. कुटुंबातुन मोठा होवून बाहेर निघणारा स्वतःमध्ये पिळवणुकीचीच प्रवृत्ती घेऊन बाहेर वावरू लागतो.

हो पिळवणूक प्रवृत्ती जोपासत असलेली व्यक्ति तिच्या संस्था, व्यवसाय, समाज, राष्ट्र व जग यांच्याशी आलेल्या संबंधात आपल्या त्या प्रवृत्तीचा प्रभाव निर्माण करण्याचा प्रयत्न करीत असतो.

कुटुंबात मानवाच्या बुद्धीची वाढ खुंटविली जाते व शक्ति निरुपयोगी करून टाकण्यात येते.

वैमनस्य भेदातून निर्माण होते व भेद हे पिळवणूकीची निमिती आहे. भेद हे एक मानवाकडून पिळवणुकीला दिलेले मान्यतेचे स्वरुप आहे. भेद व दर्जा यांच्यातील फरक प्रमाणात आहे. मोठ्या प्रमाणातून होणारी पिळवणूक भेदातून व्यक्त केलेली आहे. तर लहान प्रमाणात होणारी पिळवणूक दर्जा या नावाखाली चालविली जाते. दोन गटातील पिळवणुक क्रियेला भेद हे नाव देण्यात आलेले आहे पिळवणूक करणारा गट व पिळवणूक होणारा गट यांचे वर्गिकरण भेदाने दर्शविले जाते. दोन जातीतील भेद, दोन समाजातील भेद, दोन धर्मातील भेद, दोन वर्गातील भेद, दोन राष्ट्रातील भेद हे त्यांच्या मधिल पिळवणूकीचा भेद दर्शवित असते. दर्जा हे एकाच गटातील होणारी पिळवणूक दर्शवित असते. पिळवणूक करणारा गट किंवा पिळवणूक होणारा गट यांच्यातील पिळवणूक दर्जाच्या नावाखाली चालविली जात असते.

भेदा मध्ये निच व उच्च असे दोन भाग असतात निच गट हा पिळवणूक होणारा गट असतो. उच्च गट हा पिळवणूक करणारा गट असतो. निच गटाकडून उच्च गटाकडे साधनांचा ओघ वहात असतो. सर्वात उच्च गटाकडे ही साधने केंद्रित होत असतात. गटात होणारी पिळवणूक खालच्या दर्जाकडून वरच्या दर्जाकडे होत असते. भेदाना व दर्जाना निरनिराळे स्वरुप देवून पिळवणूक चालविली जाते. भेदाची निर्मिती पिळवणूक प्रवृत्तीतून झालेली असते. साधनाच्या असमान मोबदल्यात होणाऱ्या देवाण घेवाणीतून विरोध

निर्माण होवू नय म्हणून तो विरोध भेद व दर्जा या सदराखाली नाहीसा करण्यात आलेला आहे.

दर्जातून विरोध होण्याची शक्यता कमी असते. भेदात पिळवणूक होणाऱ्या गटाकडून विरोध होण्याची शक्यता असते. त्या निर्माण झालेल्या विरोधाचा अयशस्वी प्रतिकार द्वेष निर्माण करतो. द्वेषाचे तीव्र स्वरूप त्याचे वैमन्यस्यात रूपांतर घडून आणते. वैमनस्यातून संघर्ष पेट घेवू लागतो. दोन व्यक्तिच्या वैमनस्यातून द्वंद्व होते. दोन समाजातील वैमनस्यातून संघर्ष घडून येतो. तर दोन राष्ट्रातील वैमनस्याचे परिवर्तन युद्धात होते. धर्मातील भेद पंथ व जात या नावाने असतात. समाजातील भेद वंश व वर्ग या नावाने ओळखले जातात. तर राष्ट्रातील भेद धर्म व प्रादेशिक स्वरुपाखाली वावरत असतात. तर दोन राष्ट्रातील भेद राष्ट्रीयत्व या नावाने जोपासली आहेत. जगात आजपर्यंत घडून आलेली द्वंद्वे, संघर्ष व युद्धे याची सुरवात भेदातुन झालेली आहे.

एकाच गटात पिळवणूक घडवुन आणली जाते. तेव्हा तिचे दर्जा या सदराखाली नामकरण केले जाते. दर्जातील पिळवणूकीचे स्वरूप भेदात होणाऱ्या पिळवणूकीच्या मानाने अल्प प्रमाणात असते. त्यामुळे त्यातून संघर्ष होण्याची शक्यता कमी असते. एकाच गटातील जो आधिक साधनाचा उपभोग घेवू शकतो तो वरच्या दर्जाचा समजला जातो. व जो त्यापेक्षा कमी साधनाचा उपभोग घेवू शकतो तो खालच्या दर्जाचा समजला जातो.

मानवाला भेडसावणाऱ्या सर्व अरिष्टांचे व संकटाचे कारण पिळवणूक आहे. बेकारी, दारिद्र्य, गुन्हेगारी, असंतोष, संघर्ष, युद्ध, यांची मूळे मानवी जीवनाचा हेतु सुख प्राप्ती सफल करून घेण्यासाठी कार्यान्वीत झालेली त्याच्या पिळवणूक प्रवृत्तीत रुतलेली आहेत. त्या अरिष्टाना व संकटाना नष्ट करण्यासाठी मानवाने चालविलेले प्रयत्न अयशस्वी ठरत आहेत. त्याचे प्रमुख कारण त्याने

त्या अरिष्टांच्या व संकटाच्या कारणाचा मागोवा घेण्यात केलेली चूक होय. कारणीमिमांसा चूकीची करण्यात आल्यामुळे त्यावरील योजण्यात आलेले तोडगे देखिल कुचकामी ठरले आहेत. राजेशाहीचे अरिष्ट राजात झालेल्या सर्व शक्तिचे केंद्रिकरण ठरविण्यात आले. भांडवल शाहीचे अरिष्ट भांडवलदाराने निर्माण केलेल्या साधनाच्या केंद्रिकरणांतून निष्पन्न झाले असे मानले गेले तर दारिद्र्याचे अरिष्ट नैसर्गिक साधनाच्या मर्यादेतून उत्पन्न होते असे समजण्यात येवू लागले आहे. म्हणजे एक परिणाम दुसऱ्या परिणामाचे कारण समजण्यांत आले. त्यामुळे अरिष्टे नष्ट होवू शकली नाहीत.

आजची अरिष्टे व संकटे मानवी विनाश घडवून आणण्याच्या शेवटच्या टप्यात येवून ठेपली आहेत. ही सुटकेची शेवटची संधी आहे. त्याचा गंभीरपणे विचार झाला पाहीजे.

* * *

॥ सहकार्य ॥

प्रगती म्हणजे गरजेची पूर्तता करणाऱ्या साधनाची विपुलता निर्माण करणे होय. साधनाच्या निर्मितित आवश्यकता असते ती मानवी बुद्धी व शक्ति यांची. निसर्ग निर्मित साधनावर प्रक्रिया करुन बुद्धी व शक्ती गरजेची पूर्तता करणाऱ्या साधनांची निर्मिती करीत असते. निसर्ग निर्मित साधनांचा सरळ उपयोग करून घेणे, काही अपवाद सोडल्यास शक्य होत नाही. त्या साधनावर मानवी बुद्धी व शक्ति प्रक्रिया करतात. व त्यातून त्या साधनामध्ये उपयोग्यता निर्माण करतात. प्रगतीत मानवी बुद्धी व शक्तिचा उपयोग करून निसर्ग निर्मित साधनाची परिणीती उपभोग्य युक्त साधनात केली जाते. व त्याची विपूलता निर्माण करण्यांत येते.

स्वार्थ सहकाऱ्याच्या प्रवृत्तीतून सुखाची प्राप्ति करणारी साधने संपादन करीत असतो. तेव्हा प्रगतीला चालना मिळते. प्रगती ही सहकार्यातूनच घडून येत असते. मानवी जिवनाचा हेतु सुख प्राप्ति करुन घेणे हा आहे. व सुखाची प्राप्ति गरजेची पूर्तता करणाऱ्या

साधनाच्या उपभोगातून मिळते. परंतु साधने निर्माण करण्याची प्रवृत्ती सहकार्य ही आहे. म्हणजे मानवी जीवनाचा हेतू सुख प्राप्ती हा सफल करण्याचा मार्ग सहकार्य प्रवृत्तीत असली पाहिजे. परंतु सहकार्याकडे दुर्लक्ष करून पिळवणूकीच्या प्रवृत्तीतून साधने मिळविण्याचे प्रयत्न केले जातात. अशी फसगत होण्याचे कारण त्याचा असा समज करून दिला जातो की, पिळवणूकीतून त्वरीत व जादा सुखाची साधने संपादन करता येतात, त्याला तो बळी पडतो. व पिळवणूक प्रवृत्तीचा उपयोग साधने संपादन करण्यासाठी करू लागतो. सहकार्य प्रवृत्तीने साधने संपादनासाठी साधनांच्या निर्मितीला जो वेळ द्यावा लागतो व जे श्रम करावे लागतात तेव्हढे पिळवणूकीतून न करता साधने संपादन करता येतात. असे त्याला वाटू लागते. येथेच त्याची फसगत होते. पिळवणूक करीत असताना संघर्ष, स्वतःचीही पिळवणूक, व साधनाच्या निर्मितिवर पडणाऱ्या मर्यादा यातून निर्माण होणाऱ्या भयंकर परिस्थितीची तो जाणिव ठेवित नाही संघर्ष शमविण्यासाठी होणारी मानवी हत्त्या व साधनांचा विनाश, सुखाच्या प्राप्तीत होणारा अडथळा व अपुऱ्या साधानामुळे सुखाच्या प्राप्तिला पडणाऱ्या मर्यादा यांनी त्याचेही जीवन अधोगतीकडे जाते व असुरक्षित होते. त्यातूनच संकटे निर्माण होतात.

सहकार्य प्रवृत्ती मानवी जिवनाचा हेतू सफल करण्याचा मार्ग आहे. पिळवणूक प्रवृत्तीतून मानवी जिवनाचा हेतु सफल होण्यास अडथळा निर्माण होतो. त्याच्या अस्तित्वाला धोका निर्माण होतो. मानवाने सहकाऱ्याच्या प्रवृत्तीनेच त्याच्या जीवनाचा हेतु सफल करण्याचा प्रयत्न केल्यास अरिष्टांची व संकटाची निर्मिती होणार नाही.

मानव सहकाऱ्याचाही उपयोग करीत असतो. परंतु त्याच्या मागे पिळवणूक प्रवृत्ती दडलेली असते. राष्ट्रात राष्ट्रहिताच्या नावाखाली

सहकार्य केले जात असते. परंतु त्यात दुसऱ्या राष्ट्राची पिळवणूक करण्याची प्रत्यक्ष अप्रत्यक्ष कारणे रूजलेली असतात. पिळवणूक करणाऱ्या गटात जो सहकार्याचा भाग असतो. त्यावरच तो गट उभा असतो. परंतु त्याच्या मुळाशी पिळवणूक घडवून आणणे हे तत्व दडलेले असते राष्ट्रीय पातळीवरील सहकार्य किंवा पिळवणूक करणाऱ्या गटामधील सहकार्य का टिकविले जाते ? कारण सहकार्यातून आधिक साधनाची निर्मिति घडून येत असते. ते आधिक साधनाची परिणिती शक्तीत केली जाते. व ती शक्ति पिळवणूक करण्यासाठी उपयोगात आणली जाते. दिसून येणारी सहकार्य प्रवृत्ती ही मानवी हेतु सफल करण्यासाठी साधनाचा उपभोग घेण्याच्या उद्देशाने साधने निर्माण करून घेण्यापेक्षा तिने निर्माण केलेल्या त्या साधनाचा उपयोग पिळवणूक प्रवृत्ती करीता लागणाऱ्या शक्तिची निर्मितीकडे करून घेतली जाते. त्यामुळे प्रवृत्तीतून होणाऱ्या विनाशा बरोबर विकासही घडत आलेला शाहे

पति व पत्नी यांच्यातील सहकार्य मालक व नोकर यांच्यातील सहकार्य, एकाचगटातील दोन व्यक्तिचे सहकार्य यांच्या मुळाशी शेवटी पिळवणूक प्रवृत्ती असते.

सहकाऱ्याच्या प्रवृत्तीने निर्माण होणारी साधनांचा उपयोग शक्ति म्हणून करून घेवून त्या शक्तिचा उपयोग साधने निर्माण करण्यासाठी करून घेतल्यास मानवाची प्रगती विलक्षण गतीने घडून येईल. त्यासाठी सहकार्याची प्रवृत्ती जोपासली गेली पाहीजे. व पिळवणूक प्रवृत्तीचा संपूर्ण नायनाट झाला पाहीजे. साधनाचे केंद्रिकरण, भेदातील वैमनस्य, व दारिद्र्यातून निर्माण झालेली गुलामी यांचे संपूर्ण उच्चाटन झाले पाहिजे त्या शिवाय प्रगती साठी आवश्यक सहकार्य प्रवृत्ती जोपासली जाणे शक्य नाही. वरील पैकी एका पिळवणूकीच्या प्रवृत्तीचे अवशेष अरिष्टाची नांदी ठरू शकेल. व संकटाना आमंत्रण. वरिल तिघांचा संपूर्ण नायनाट

होणे हे सहकार्य प्रवृत्तीने प्रगती घडवून आणण्यासाठी आवश्यक ठरते.

प्रगती घडवून आणण्यासाठी त्या तिघांचा नायनाट करून त्यांची रिकामी झालेली जागा परत त्यानीच भरून काढू नये. ती जागा समता, बंधूभाव, व स्वातंत्र्य यानी भरून काढली पाहिजेत. केंद्रिकरण परत आपली जागा पटकावण्याचा प्रयत्न करू लागल्यास समता त्याला तसे करू देणार नाही. वैमनस्य निर्माण होण्याचे धाडस बंधुभावामळे लुळे पडेल. गुलामीला स्वातंत्र्य अशा रितीने दडपून टाकील की, त्याचा परत कधीही उद्‌भव होणार नाही, समता बंधु-भाव व स्वातंत्र्य यांच्या वातावरणातच सहकार्य प्रवृत्तीतून प्रगती घडवून मानवी जिवनाचा हेतु सफल करण्याचे कार्य अत्यंत जलद गतीने घडवून आणता येईल.

सहकार्य प्रवृत्तीतून मानवी बुद्धी शक्ति व कर्तृत्व यांचा विकास घडवून येतो.

सहकार्य प्रवृत्तीही पिळवणूक प्रवृत्तीपेक्षा अधिक प्रबळ आहे. सहकर्य प्रवृत्ती एकदा प्रस्थापित झाल्यास ती पिळवणूक प्रवृत्तीला पुन्हा कधीही शिरकाव करू देणार नाही. कारण मानवी जिवनाचा हेतुत पिळवणूक प्रवृत्ती अडथळा निर्माण करीत असते व त्याचे अस्थित्वाला धोका निर्माण करते. मानवाच्या नैसर्गिक प्रवाह त्याच्या जिवनाचा सुख प्राप्ती हा हेतु सफल करणे या दिशेने वहात असतो. त्याच्यामध्ये येणारी ही पिळवणूक प्रवृत्ती प्रवाहाला विरोध निर्माण करते. त्या प्रवाहाला विरोध करण्यासाठी त्याच्या अज्ञानाचा फायदा घेवून तिने जे पाय रोवले आहेत. ते एकदा का सटकले की, त्या प्रवा-हाच्या जोशाने गटागळचा खावू लागतील व त्यातच तिचा अंत घडून येईल.

प्राचिन काळीच्या संस्कृती त्याच्यात सहकार्याचीच प्रवृत्ती प्रबळ होती. असे उपलब्ध माहितीच्या आधारे म्हणता येईल. नाईल

नदीच्या कांठची संस्कृती मोहोजदडो व हडप्पा या संसकृतीचा जो विकास घडून आला होता तो त्यांच्यातील संस्कृतीची देवाण घेवाण व अनिर्बंध स्थलांतर या सहकार्याच्या प्रवृत्ती दर्शविणाऱ्या घटनावरुन असे म्हणता येईल. धर्माच्या अगोदरच्या काल खंडात सहकार्याच्या प्रवृत्तीतून विकास घडून आला असे दिसते. धर्म, राष्ट्र या सारख्या कल्पना निर्माण झाल्यात त्यानी मानवाची दिशाभूल करण्यास सुरवात केली. अज्ञान व असंघटितपणा यांचा गैर वाजवी फायदा घेण्यांत आला मानवात भ्रामक सुखाची अभिलाषा निर्माण करण्यात आली. व खोटी अमिशे दाखविण्यात आली. त्याचा परिणाम सहकार्य प्रवृत्ती नाहीशी होण्यांत घडवून आला. आजही त्याच्यावर त्या भ्रामक सुखाच्या कल्पनेचा व खोट्या अमिषांचा जबरदस्त परभाव दिसून येत आहे. तो परभाव जोपर्यंत नाहीसा होत नाही. तोपर्यंत त्याला सहकार्य परवृतीचे पुनरूज्जीवन करता येणार नाही व जोपर्यंत सहकार्य प्रवृत्ती कार्यान्वीत होत नाही तोपर्यंत त्याची दृतगतीने निकोप प्रगती घडून येणार नाही.

सहकार्याचे महत्व सर्वानाच मान्य आहे. परंतु त्याचा उपयोग अत्यंत मर्यादित स्वरुपात केला जात असतो. सहकार्यही सुख प्राप्तिची खात्री असते. म्हणूनच तिला महत्व देण्यात आलेले आहे. आज दिसून येणारे सहकार्य हे मर्यादित असण्याचे कारण त्या मर्यादे बाहेर सहकार्य पिळवणूकीच्या कल्पनेने मर्यादित केले आहे. ते त्याला मर्यादे बाहेर जाण्यास प्रतिबंध करीत असते.

प्रेम याला मानवी जीवनात फार महत्व आहे. म्हणून प्रेमाची महती सर्वत्र गाईली जाते. प्रेम ही सुख कारक कल्पना आहे. प्रेम म्हणजेच सुख हे समिकरण आहे. प्रेम निर्माण होण्याची पहिली पायरी सहकार्य आसते. सहकार्याशिवाय प्रेम राहू शकत नाही. सहकार्यातून सुख ची निरधोक प्राप्ती घडून येते. सहकार्याच्या सातत्या-

तून सहानूभूती निर्माण होते. सहानूभूतीचे परिवर्तन प्रेमात घडून येते. प्रेम म्हणजे सहकार्याची संपूर्ण हमी होय.

समाज निर्मितीचा पाया सहकार्य आहे. सहकार्यावरच समाज जिवन चालु असते. कुटूंब हे सहकार्यावरच अवलंबुन असते कुटूंबात अति सहकार्य असल्यांमुळे त्यांच्यात प्रेम निर्माण झालेले असते. कुटुंबात पती व पत्नी यांच्यातील प्रेम सर्वात आधिक असते. कारण त्यात पराकोटीचा सहभाग असतो. ज्या कुटूंबातील पती, पत्नी याच्यात सहकार्य नसते. त्याच्यात प्रेम निर्माण होत नाही. कधी कधी एखाद्या व्यक्तिला पहिल्या भेटीत पाहील्या बरोबर प्रेम निर्माण होते. असे आपण म्हणतो. त्या मागे ती व्यक्ति सहकार्य करेल अशी तीव्र आपेक्षा असते. तसे नसते तर त्या व्यक्तिने सहकार्य केले नाही तर त्या व्यक्ति बद्दल वाटणारे प्रेम नाहीसे झाले नसते.

प्रेम ही मानवातील सर्व श्रेष्ट भावना आहे. प्रेम हे उत्कट जाणिव निर्माण करून देते. मानवी जिवनाचा हेतू सुख प्राप्ती आहे. तिच्याशी ते सलंग्न आहे. प्रेम म्हणजे उत्कट सुख प्रेम म्हणजे सर्व श्रेष्ट भावना सुख मानवी जिवनात सर्व श्रेष्ट आहे. हे सिद्ध करता येते. प्रेमातून पराकोटीचे सहकार्य केले जाते. व त्या सहकार्यातून सुखाची प्राप्ती होव् लागते. सुख प्राप्ती साठी सहकार्य प्रवृत्तीतून संपादन केलेली साधने कोणत्याही प्रकारचा अडथळा व धोका निर्माण न होता उपभोगता येतात प्रेमातून निर्माण होणारा मार्ग सहकार्य आहे व निर्भेळ सुख प्राप्तीसाठी सहकार्यांचा उपयोग होतो. म्हणजे सहकार्य प्रवृत्ती ही मानवी हेतु साध्य करणारी निसर्ग मान्य पद्धत आहे. असे सिद्ध करता येते.

जे मानवाला प्रेमाला संदेश देत आले आहेत. त्याच्या मागिल हेतू प्रेमा मधून होणारी निर्भेळ सुखाची प्राप्ती हा होता. सुखाची प्राप्ती हा मानवी जिवनाचा हेतू आहे. परंतु सुख प्राप्ती सहकार्यातुन संपादन केलेल्या साधनाच्या

उपभोगातून मिळेल याचे महत्व त्यांनी सांगितले नाही. तर कांहीनी प्रेमाचे संदेश देवून उपभोगातून मिळणाऱ्या सुखाला मात्र त्याज्य ठरविले आहे. म्हणजे सुखाचे महत्व त्यानी मान्य केले परंतु सुख मिळविण्यास प्रतिबंध केला. त्यातून प्रेम व मानवी हेतु सुखप्राप्ती याच्यात तटातुट करण्यात आली. मानवी हेतु सुख प्राप्ती डावलला गेला. म्हणून प्रेम ही एक निराधार कल्पना ठरली. तिचा आधार तोडण्यात आला होता. प्रेम ही उत्कट सुखाची भावना आहे व सुख हे गरजेची पूर्तता करण्याऱ्या साधनाच्या उपभोगातून मिळते. याचा अतुट संबध परखडपणे दाखविला गेला असता तर, प्रेम व सुख यांना साधणाऱ्या दुव्याला म्हणजे सहकार्याला मोठे महत्व प्राप्त झाले असते. यापार्श्व भूमिवर पिळवणूक प्रवृत्तीला जाणून घेण्याचा यशस्वी प्रयत्न करुन तिची हकालपट्टी करण्यात आली असती.

शेजाऱ्यावर प्रेमकरा. हा संदेश निरर्थक ठरला आहे. जर त्या संदेशा बरोबर त्याची पूर्ण निमांसा देण्यात आली असती तर, म्हणजे शेजाऱ्याशी सहकार्य करा त्यातून प्रेम निर्माण होवू लागले व निर्माण झालेल्या प्रेमातून अति सहकार्य घडून येईल. त्यामुळे दोघांचाही लाभ होईल.

भावा, भावांतील प्रेम, मुलगा वडिलांचे प्रेम, आई व मुलीचे प्रेम हे त्याच्यांतील सातत्याच्या सहकार्यातून मिळालेल्या सुखाच्या प्राप्तीने निर्माण झालेले असते.

बंधुभाव ही जगतमान्य कल्पना प्रेमाशीच संलग्न आहे. पूर्वी प्रेमाचे महत्व सांगण्यात येत असे. त्याचे रुपांतर आधुनिक काळात बंधुभाव यात झालेले आहे. परंतु प्रेम या कल्पनेपेक्षा बंधुभाव ही सहकार्य प्रवृत्तीला जवळची वाटते.

स्वातंत्र्य हे मानवी जिवनाच्या सुखप्राप्ती हेतूशी निगडीत असते. स्वातंत्र्यात सुखाची प्राप्ती निर्वेदपणे तरता येते. व त्यातूनच

स्वातंत्र्य अबाधित राखता येते. प्राचीन मानव मुक्त स्वातंत्र्यात वावरत होता. कारण त्याच्या गरजा भागविण्यासाठी त्याला कोणावरही अवलंबून रहावे लागत नव्हते. त्याने निर्माण केलेल्या साधनाचा उपयोग त्याला पूर्णपणे घेता येत होता. प्राणी व पक्षी हे मुक्त स्वातंत्र्यात रहात असतात. कारण त्यांना त्याच्या गरजा भागविण्यासाठी कोणावर अवलंबून रहावे लागत नाही. ते स्वातंत्र्यात रहावे म्हणून निसर्ग त्याना मुक्त व मुबलक गरजा पूर्तता करण्याचे साधने देत असतो व स्वतंत्र्य अबादित ठेवित असतो.

मानव समूह प्रिय आहे. म्हणून तो समुहाने रहातो. प्राण्यातही कळप करुन राहण्याची संवय दिसून येते. ते कळप करुन राहतात तेव्हा ही त्यांचे स्वातंत्र्य अबादित रहात असते. परंतु मानव समुहात आला व त्याचे स्वातंत्र्य हळूहळू मर्यादित होत गेले. मानव समुहाने रहात होता त्याचे प्रमुख कारण सुरक्षितता राखणे हे आहे. साधारणत: जे प्राणी कळपाने रहात असतात. त्यांच्या जिवाला इतर प्राण्यापासून धोका असतो. सुरक्षितता म्हणून कळप करुन राहणे त्याना अपरिहार्य वाटत असते. ज्या प्राण्याना इतर प्राण्यानपासून धोका वाटत नव्हता त्याना कळप करुन राहण्याची जरुरी वाटली नाही. म्हणून ते कळप करुन रहात नाहीत.

मानवाला समूह करुन राहण्यामागे दुसरा एक फायदा होता. तो म्हणजे गरजांची पूर्तता करणाऱ्या साधनाची देवाण घेवाण करुन सुखाची प्राप्ती आधिक करुन घेणे शक्य होत होते. एकास सर्व साधनाचे संपादन करणे शक्य नसते. साधनांची देवाण घेवाण सुरु झाली तेव्हापासून मानवी समुहाचे रुपांतर समाज जिवनांत होवू लागले. त्या अगोदर समूह व कळप यांच्यात विशेष फरक नव्हता.

सुरवातीला सहकार्य प्रवृत्तीतून साधनांचा उपभोग घेणे व साधनाची देवाण घेवाण केली जाणे, हे चालत होते. गरजा अत्यंत मर्यादित

व त्या गरजा पूर्तता करणारी साधने विपुल होती. स्वातंत्र्यही अबादित होते.

समुहाचे विकसीत स्वरुप समाज होय. समाज जिवन सुरळीत होण्यासाठी व मानवाची प्रगती होण्यासाठी नियम तयार करण्यात आले. त्यानियमा नुसार मानवाने स्वतःच्या स्वातंत्र्यावर काही मर्यादा घालून घेतल्या. परंतु त्या मर्यादा त्याच्या सहकार्य प्रवृत्तीच्या अनुरोधाने घातलेल्या होत्या. त्यामुळे त्याच्या सुख प्राप्तीमध्ये अडथळा निर्माण होत नव्हता. किंबहुना त्या मर्यादेमुळे सुख प्राप्ती अधिक होवू लागली होती. त्यातूनच स्वातंत्र्याला मर्यादा घालणाऱ्या तत्वाला मान्यता मिळाली. त्यातून पुढे कामाची विभागणी होवू लागली. काहीना समाजाच्या संरक्षणाचे काम दिले गेले. संरक्षणाला अधिक महत्व होते. त्यासुळे संरक्षणाचे कामकरणाऱ्याना अधिक महत्व आले. संरक्षणाच्या कामात कमतरता, हालगर्जीपणा किंवा दुर्लक्ष होवू नये म्हणून संरक्षणाचे कार्य करणाऱ्यांना काही विशेष अधिकार देण्यात आले. त्या विशेष अधिकाराचे रूपांतर पुढे सत्तेत झाले. संरक्षणासाठी तसे करणे आवश्यक वाटू लागले होते. नंतर जेव्हा संघर्ष जस जसे वाढू लागले तसतशी सत्तेत वाढ होत गेली. पुढे त्या सत्तेचा उपयोग साधने संपादन करण्यासाठी करून घेण्यात येवू लागला. त्यातून साधनावर नियंत्रण वाढले परंतु त्या साधनाच्या उपयोगाने समाज जिवन विकसीत होत होते.

धर्म निर्माण झाला. मानवी जीननाचे संपूर्ण नियंत्रण ईश्वरी शक्तिकडे सोपविण्यात आले. त्याचा जन्म, जीवन व मृत्यू त्याचा नियंत्रक व निर्माता ईश्वराला केले गेले. ईश्वर स्वर्गीय सुखाची प्राप्ति करून देतो असे सांगून साधनाच्या उपभोगातून मिळणारे सुख तुच्छ लेखण्यात आले. त्यामुळे त्याचा साधनाचा उपभोग घेण्याचा हक्क व देवाण घेवाणीतील समान मोबदला याला महत्व राहिले नाही. सहकार्य प्रवृत्तीला तडे गेले. ईश्वरी कल्पनेने मानवी जिवना-

नाचा हेतू सुख प्राप्ती हा डावलण्यात आला. मानवी जिवनाच्या सर्व कृती गरजेची पूर्तता करून सुखाच्या प्रातीसाठी चालत असतात. त्याची दिशा बदलली गेली. पिळवणूक प्रवृत्ती निर्माण होवून ती जोपासली गेली. ज्याच्या हातात सत्ता होती व ज्यांना विशेष अधिकार होते. त्यानी साधनाचे केंद्रिकरण करण्यास सुरवात केली. त्यामुळे ज्याना सुखप्राप्तीसाठी साधने संपादने अशक्य होवू लागले. त्याना ज्यानी साधनाचे केंद्रिकरण केले त्यांचेकडे जावे लागले. सुखासाठी आवश्यक असणाऱ्या साधनाच्या मोबदल्यात त्याना स्वतःच्या स्वातंत्र्यावर बंधने लादून घेण्यास तयारी दर्शविली. त्यामुळे त्यांचे स्वातंत्र्य ज्यानी साधनाचे केंद्रिकरण केले होते त्यांच्या हातात गेले. त्यांच्या गटात ठेवलेल्या स्वातंत्र्याचा उपयोग तो अधिक साधनाच्या केंद्रीकरण करण्याकरता करून घेवू लागला. त्यामुळे स्वातंत्र्य देवूनही सुख च्या प्राप्तीतील अडथळा दुर झाला नाही. उलट साधनाचे आधिकाधिक केंद्रिकरण होत गेल्याने त्याच्या सुखाच्या प्राप्तीत अधिकाआधिक अडथळा निर्माण होत गेला. अशा रितीने त्यांचे स्वातंत्र्य ही गेले. व सुखाची साधनेही मिळेनाशी झाली. त्यातून त्यांना शेवटी गुलामी मिळाली.

पिळवणूक प्रवृत्तीत स्वातंत्र्य टिकू शकत नाही. ते टिकण्यासाठी गरजाची पूर्तता करणाऱ्या साधनांची समान वितरण होणे आवश्यक असते. सहकार्य प्रवृत्तीतूनच साधनाचे समान वितरण होणे शक्य असते. सहकार्य प्रवृत्ती शिवाय स्वातंत्र्य अबादित राहू शकत नाही.

मानवाची साधने निर्माण करण्याची क्षमता सारखी असते. त्याच्या क्षमते पेक्षा जादा साधने निर्माण करण्यासाठी लागणारे श्रम करू शकत नाही. सहकार्य प्रवृत्तीमुळे त्याने निर्माण केलेल्या साधनांचा पूर्ण उपभोग घेण्याचा हक्क त्याला मिळत असतो. व साधनाच्या समान मोबदल्यात देवाणघेवाण केली जाते. त्यामुळे कोणाकडेही त्याच्यावर असलेल्या निर्मिती क्षमतेच्या मर्यादेमुळे जादा साधने

असणार नाही. त्यातुनच समता प्रस्थापित होईल.

समता असली म्हणजे भेद रहात नाहीत. व भेद नसल्याने संघर्ष होण्याची शक्यता नष्ट होते. व शांतता नांदते

समता, बंधुभाव, स्वातंत्र्य, शांतता, सुख, समृद्धी व सुरक्षितता हे सहकार्य प्रवृत्तीतून निर्माण होतात.

* * *

॥ सुटका ॥

असंख्य प्रयत्नानी त्याला त्याच्या विनाशाकडे न जाण्यास अयशस्वी ठरविले. परंतु त्याबद्दल त्याने विशेष दखल घेतली नाही. कारण होणारा नाश तो सामावून घेऊ शकला. यापुढे होणारा नाश हा सर्वनाश ठरणार आहे. म्हणून त्याला त्याची दखल घेणे हे अपरिहार्य आहे. परंतु अद्याप त्याने तश्या प्रक्रीयेला योग्य सुरुवात केलेली दिसत नाही. त्याला त्याच्या संपूर्ण विनाशाची जाणीव झाली आहे हे ही तो तीव्रतेने दर्शवित नाही. तो अजूनही समजतो की असा विनाश घडू देण्यास मानव कधीही धजविणार नाही. हा त्याचा विश्वास त्याला तश्या प्रक्रियेस सुरुवात करण्यास परावृत करित असावा. परंतु इतिहासाकडे बघितल्यास हा विश्वास किती फसवा आहे याची जाणीव होते. त्यामुळे विनाशाच्या संकटाची भयानकता अधिक तीव्रतेने जाणवू लागते. विसाव्या शतकातील दोन महायुद्ध म्हणजे मानवाला दिलेल्या शेवटच्या सुचना आहेत. पहिल्या सुचने पेक्षा दुसरी अधिक परखड होती. नागासाखी व हिरोशिमा येथे अणुबॉमने

घडवून आणलेला भयंकर विनाश त्यास त्याचा सर्वनाश घडवून आणणे सहज शक्य आहे याची चुणूक दाखवितो. अखिल मानव जात ती चुणूक बघुन थरारली. त्यातून तीचा बंदोबस्त करण्यासाठी जुजबी प्रयत्न करण्यात आले. युनो सारखी संघटना कार्यान्वीत करण्यात आली. मानवाने विनाश थांबवावा म्हणून केलेले प्रयत्न याचे समाधान एवढेच महत्व तिला आहे. न्युट्रॉन बॉम तयार झाल्यापासून सर्वनाश अधिक तिव्रतेने आपली भयानकता ओकतो आहे. कोणत्याही क्षणाला जग युद्धाच्या खाईत लोटले जाणे असंभव्य नाही. आणि आता युद्ध म्हणजे सर्वनाश. युगानयुगे मानवाने जोपासत आणलेल्या त्याच्या सह त्याच्या संस्कृतीचा अंत.

मानवासह त्याच्या संस्कृतीचा अंत त्याने जर निसर्गातील एखादी समस्या किंवा संकट याना झुंज देत असताना घडून आला असता तर त्याला निदान समाधान तरी लाभले असते. निसर्गाने त्याची नोंद सांहसी म्हणून त्याच्या चिरस्मृतीत करुन ठेवली असती. परंतु जेव्हा मानव स्वतःच्या वेडगळ कल्पनेतून स्वतःचाच विनाश घडवून आणतो, तेव्हा त्याची नोंद घेणे ही स्वतःची अवहेलना करुन घेणे असे निसर्गाला वाटेल. कारण त्या निसर्गाने त्याला विश्वातील सर्व श्रेष्ठ सामर्थ्य व कर्तृत्व बहाल केले आहे. त्या निसर्गाला मानवाने स्वतःचा विनाश इतक्या तुच्छपणे करुन द्यावा हे कधीही आवडणार नाही.

संकट निवारण करण्याचे कार्य पिळवणुकीचे संपूर्ण उच्चाटन या स्वरुपात असले पाहिजे. केवळ संहारक साधने नष्ट करुन युद्धे थांबवून किंवा दारिद्रय नष्ट करुन मानव संकटातून स्वतःची सुटका करुन घेऊ शकणार नाही. ते नष्ट झाले तरीही पुढे दुसऱ्या स्वरुपात उभे राहतील व त्यांचे ते स्वरुप आजच्यापेक्षा अधिक भयंकर असेल. हे इतिहासाचे अनुमान आहे. ताप नाहिसा झाल्यावर ही शरिरात त्याचे राहिलेले अवशेष पुन्हा उफळून येतात व पुढच्या वेळी त्यांची दाहकता अधिक असते. त्याप्रमाणे या संहारक साधनांचे, युद्धाचे व दारिद्रयाचे

पायामुळे नष्ट केल्याशिवाय त्यांचे संपूर्ण उच्चाटन होणार नाही. या संकटाचे मूळ जे पिळवणूक आहे तिचे संपूर्ण उच्चाटन केले पाहिजे.

पिळवणूक नष्ट करणे हे आव्हानात्मक परंतु एक महान कार्य आहे. पिळवणूक नष्ट करुन केवळ मानव त्याच्या सर्व नाशाच्या संकटापासून मुक्तच होणार नाही तर त्याच्या जीवनाची दिशा सुखाने तृप्त, समृद्धीने वैभव संपन्न व संपूर्ण सुरक्षित होऊन प्रगतीकडे विलक्षण गतिने झेपावत जाईल.

त्याच्या साहसाला नविन अर्थ निर्माण होईल. त्याची कल्पना शक्ति शृंखलातून मुक्त झाल्याने दाहीदिशांनी स्वैर संचार करू लागेल. बुद्धी कल्पनेच्या मागे जाताना क्षितिजांच्या सिमारेषाहि तिला अटकाव करण्यास धजविणार नाही. त्याच्या कर्तृत्वाच्या सामर्थ्याच्या नव्या अविष्काराने भारावून गेलेले विश्व त्याच्या विलोभनिय वैभवाचा नजराणा मोठ्या मानाने त्याला अर्पण करील.

पिळवणूक नष्ट करणे कठिण नाही. अडचण आहे ती मानवाने तशी दखल घेण्याची, मानवाने एकदा निर्धार केला कि पिळवणूक नष्ट होण्यास वेळ लागणार नाही. मानवाच्या संपूर्ण सामर्थ्याच्या एका फटकाऱ्याने ती नष्ट होऊन जाईल. मानवाने पिळवणूक नष्ट करण्यासाठी एक गगनभेदी ललकारी देण्याचा अवकाश की पिळवणूकीची पकड ढिली होऊन तिचे धैर्य गळून पडेल. आणि मग तिच्या भग्न अवस्थेसम झालेले अवशेष शोधून त्यांना मूठमाती देण्याचे कार्य औपचारिक ठरेल.

पिळवणूक नष्ट करित जाताना सहकार्याची प्रस्थापना करीत गेले पाहिजे. तरच त्याची संकटापासून सुटका होऊन निकोप प्रगतीच्या नव्यामार्गाला लागण्याच्या कार्याला पूर्ण स्वरूप प्राप्त होईल.

पिळवणूक नष्ट करण्याचे कार्य दोन विभागात करावे लागले.

पिळवणूक नष्ट करून सहकार्य प्रस्थापित करण्यासाठी सखोल, सर्वांगिण, सबळ अशी एक महायोजना तयार करून तिची अंमलबजावणी करणे हे एका विभागातील कार्य ठरेल. दुसऱ्या विभागातील कार्य मानव जातीला संघटित करणे या स्वरूपातील असेल.

पिळवणूक नष्ट करताना प्रत्येक क्षेत्रात जे तिचे अवशेष आहे ते नष्ट करणे आणि मानवातील पिळवणूक प्रवृत्ती नष्ट करून सहकार्य प्रवृत्ती निर्माण करणे या अनुसंगाने कार्य घडून आणले गेले पाहिजे.

प्रत्येक क्षेत्रात पिळवणुकीचे अवशेष खोलवर व विस्तृत पसरलेले आहेत. ते शोधताना त्यांची रचना त्यांचा हेतु, त्यामागील प्रेरणा यांचा विचार प्रामुख्याने करावा लागेल. मानवी मनाशी संबंधीत जी क्षेत्रे आहेत, त्याच्यातील पिळवणुकीचे अवशेष शोधून काढणे हे अधिक सुलभ आहे. परंतु त्यांचे उच्चाटन करणे हे अधिक कठिण ठरेल. त्या अवशेषांचे स्वरुप गुंतागुंतीचे आहे. म्हणून ते कठिण असणार नाही तर त्यांच्यातून जो प्रतिकार निर्माण होईल. तो यशस्वीपणे नष्ट करणे हा त्यातील कठिण भाग ठरेल.

धर्म हे सर्वात अधिक घातक क्षेत्र आहे. मानवावर त्याचा प्रभाव अधिक परिणामकारक ठरलेला आहे. त्याचा प्रभाव बहुतेक सर्व क्षेत्रावर कमी अधिक प्रमाणात वास्तव्य करीत असतो. मानवाच्या मनाशी त्याचा संबंध असतो. धर्म नष्ट करण्यासाठी मानसशास्त्राच्या साहाय्याने धर्म ज्या युक्तीने मनात भ्रम निर्माण करित असतो. तो भ्रम नाहिसा करण्यासाठी प्रयोगीक स्वरुपात त्याचे विश्लेषण करुन त्याच्या युक्त्यांचे पितळ उघडे पाडले पाहिजे. धर्म भीती या भावनेतून आपला प्रभाव मानवावर टिकून ठेवतो. त्या भीतीमुळे तो धर्माचे परिक्षण करण्याचा प्रयत्न करित नाही. ती भीती नाहिशी झाल्यावर तो धर्माचे परिक्षण करु लागेल. त्या परिक्षणातून धर्म किती वेडगळ कल्पना आहे. याचे आकलन होऊ लागेल. मानवावर ईश्वरी शक्ती मृत्यू घडवून आणू शकते व मृत्यूपासून सोडवू शकते, या कल्पनेने

सर्वात अधिक प्रभाव निर्माण करुन ठेवला आहे. ती विज्ञान युगातही टिकून आहे. याचे कारण भूत, पिशाच्च, जादुटोणा यांच्या उठविल्या जाणाऱ्या वावडया. त्यामुळे मानसिक भ्रमातून जाणवणारे त्यांचे अस्तित्व यानी ईश्वरीय शक्तीचे प्रभूत्व अबाधित ठेवले आहे. या सर्व खोटया, मनघडावू व आभासात्मक कल्पना आहेत. त्याचे ज्ञान करुन दिल्यास ईश्वरी शक्तीवरील त्यांचा विश्वास उडण्यास मदत होईल. त्याच वेळी धर्म ही एक वेडगळ कल्पना आहे, याचे आकलन होऊ लागेल आणि मग तो स्वतःवरच फसविलो गेलो म्हणून हसू लागेल. मानव जात धर्माच्या पगडयातून मूक्त झाल्यावर पिळवणूक नष्ट करण्याचे पुढील कार्य सुलभ होईल.

धर्म नष्ट होणे हि काळाची गरज आहे. आधुनिक धर्म धुरंधर धर्माचे महत्व सांगताना अनेक कारणे सांगतात. ती त्या धर्मांच्या प्रभावामुळे सांगत असतात. ती सर्व कारणे फसवी व घातक आहेत 'मानव धर्मामुळे सुसंस्कृत बनतो.' 'धर्मामुळे नितीमत्ता टिकून असते.' धर्मामुळे मानवी जीवन नियंत्रित होते त्यामूळे ते सुरळीत झालेले आहे.' अश्या प्रकारे धर्माचे महत्व व गरज असल्याचे दाखविले जाते. आणि धर्म नष्ट झाल्यास मानव अनाचारी, अनीतीमान, अनियंत्रित होऊन मानवी जीवन कोसळून पडेल अशी भीती दाखविली जाते. परंतु धर्म निर्माण होण्या आगोदरचे मानवी जीवन बघितल्यास हे सर्व निरर्थक असल्याचे स्पष्ट होते.

पिळवणूकीला प्रवृत्त करणाऱ्या धर्माचे वर्चस्व मानवी मनावर खोल बिंबविल्या गेल्यामुळे त्यांच्या पिळवणूक प्रवृत्तीला धर्म सतत आधार व प्रेरणा देत असतो. धर्म इतर क्षेत्रावरील त्याच्या प्रभावाने त्यांच्यातील पिळवणूक अवशेषाना अधिकाधिक घट्ट होण्यास व वर्चस्व गाजविण्यास कारणीभूत ठरत असतो. पिळवणूकीचे संपूर्ण उच्चाटन करतांना धर्म नष्ट करण्याला प्राधान्य द्यावे लागेल.

शिक्षण, इतिहास, संस्कृती नितीमुल्य, समाजरचना इत्यादींचा

फेर विचार करावा लागणार आहे. त्यात आढळणारे पिळवणूकीचे अवशेष नष्ट केले गेले पाहिजे. शिक्षणातून धर्माचे महत्व लहानपणापासूनच बिंबविले जात असते. व संस्कृतीचे संवर्धन होईल असे प्रयत्न केले जातात. त्यातून मनावर पिळवणूकीचा प्रभाव खोल रूजविला जातो. त्या घातकी अवशेषांचा जराही संशय येऊ नये म्हणून त्याच्या बुद्धीला स्वतंत्र्य विचार करण्यास बंदी घातलेली असते. 'विविध जातीनी युक्त असलेली ही संस्कृती महान आहे.' हे त्याला शिक्षणातून शिकावले जाते आणि जेव्हा त्याला त्या संस्कृतीच्या महानतेची शंका येऊ लागते तेव्हा त्याच्या बुद्धीने अशी शंका घेणे म्हणजे राष्ट्रीय ऐक्याला बाधा निर्माण करणे होय. तसे झाल्यास जातीय वैमण्यस्य पेटवून राष्ट्रीय ऐक्याला धोका निर्माण करण्याचा प्रयत्न केला, या गुन्हयाखाली कैदीची शिक्षा दिली जाईल याचीही तंबी त्याच शिक्षणाच्या माध्यमातून करुन दिली जाते व जातीभेदेला अबाधित ठेवून पिळवणूक जोपासण्याचे कार्य शिक्षणातून केले जाते.

इतिहासात पिळवणूक करणारा व पिळवणूक होणारा या दोन गटातील संघर्षातील संगतवार लावलेली घटनांची मालिका आहे इतिहास प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष पिळवणूक जोपासण्याचे कार्य करित असतो. छत्रपति शिवाजी महाराज हा शूर व मुत्सद्दीराजा होता, त्याने परकिय मोंगलांना सळो की पळोकरुन सोडले. अफ़ज़लखानाचा वध मोठ्या युक्तीने केला. गनिमी काव्याने लढून मोंगला सारख्या बलाढ्य शत्रुवर मात करून स्वतंत्र्य राज्याची स्थापना केली. असा इतिहास भारतात लिहीला जातो. भारतीयाला तो वाचतांना शिवाजी राजाबद्दल अभिमान वाटेल. व त्याचवेळी मोंगलाबद्दल शत्रुत्वाची भावना कळत न कळत त्याच्यात निर्माण होईल. पाकीस्तानात हाच इतिहास निराळ्या स्वरुपात मांडला जाईल. शिवाजी नावाचा एक लुटारू होता. त्याने मोगलाच्या साम्रज्यात खजिने लुटण्यासाठी लपूनछपून हल्ले केले. मोगल सैन्यासमोर येण्याचे धाडस तो करीत नसे.

दऱ्याखोऱ्यातून अफ्जल खानासारख्या शूर योद्धयाचा वध त्याने कपटाने केला. मोगलाच्या खजिन्यातून लुटून नेलेल्या संपत्तीवर त्याने स्वतःचे राज्य स्थापन केले. पाकीस्तानी नागरिकाला हा इतिहास वाचताना भारतीयांबद्दल त्याच्या मनात द्वेषाची भावना निर्माण होईल. त्याचे रूपांतर पुढे युद्ध करण्यासाठी करून घेता येतो. युद्धाचा मुळ हेतू पिळवणूक हा असतो. म्हणजे इतिहास पिळवणूक घडवून आणण्यास सहाय्यभूत ठरतो असे स्पष्ट होते. संस्कृती, नितिमुल्य, समाजरचना, इ यादीतून पिळवणूकीला प्रोत्साहन मिळत असते व जोपासली जाते.

पिळवणूक नष्ट होत असताना त्याची जागा सहकारी प्रवृत्तीतून भरून काढली गेली पाहिजे. इतिहासातून द्वेश व शत्रुत्व या भावना चेतावल्या न जाता त्याचा उपयोग संघर्षातून मानवाने चालविलेली स्वतःच निरर्थक हानी याची जाणीव निर्माण करून देऊन, बंधूभाव निर्माण होईल अशी त्याची रचना केली पाहीजे. मानवाची हत्या करणे हे शौर्याचे लक्षण आहे असे दाखविणे, दुसऱ्या राष्ट्रातील संपत्ती लुटून आणणे, हे भरभराट झाल्याचे दर्शविले जाणे अशी ही आजच्या इतिहासाची रचना आहे. हे सर्व अनर्थ ओढवणारे व पिळवणूकीला प्रोत्साहन देणारे इतिहासाचे स्वरूप नष्ट करून मानवामानवा मधील सहकार्य निर्माण होऊन जोपासले जाईल अशी त्याची मांडणी केली गेली पाहिजे.

प्रत्येक क्षेत्रातील होणारी फेर तपासणी व त्याची केली जाणारी नवरचना ही त्याचे संकटे नष्ट करण्याच्या व निकोप प्रगती घडवून आणण्याचा उद्देश समोर ठेवून करण्यात आली पाहिजे.

मानवाला भेडसावणारी भयानक संकटे नष्ट करून त्याची सर्वांगीण प्रगती घडवून आणण्यासाठी समस्त मानव जातीला संघटित व्हावे लागेल. मानव जातीचे संघटन भेद नष्ट केल्याशिवाय घडवून आणता येणार नाही. जातीजातीतील भेद धर्मातील भेद,

वर्गातील भेद, राष्ट्रीयत्वाच्या नावाखालील भेद यांना नाहिसे करावे लागेल. हे प्रमुख भेद आहेत. त्यांनी मानवाला असंघटित करून एकमेकांच्या विरुद्ध उभे केले आहे.

मानवामध्ये केवळ ऐक्याची भावना निर्माण करून चालणार नाही. त्याना संघटित होऊन एकाच वेळी पिळवणूक नष्ट करण्यासाठी लढा द्यावा लागेल. हा लढा पिळवणूक करणाऱ्या गटातील जे आपला हेका सोडणार नाही त्यांच्या विरुद्ध असेल. त्याच्यात ज्याच्या हातात साधनांचे व सत्तेचे केंद्रीकरण झालेले आहे, त्यातील बहुसंख्य असतील. परंतु त्याचा विरोध मानव जातीच्या संघटित शक्तीसमोर लुळा पडेल.

मानव जातीला संघटित करण्यासाठी त्याच्यांतील भेदाचे निर्मुलन करावे लागेल. भेदामुळे मानव एकमेकांसमोर लढाऊ पावित्र्यात उभा रहात असतो. ते भेद नष्ट झाल्यावर त्याला संघटित होणे सहज शक्य होईल. त्याप्रचंड संघटित मानव जातीच्या शक्तीत मानवामानवातील छोटेमोठे भेद विरून जातील. त्यासंघटित शक्तीच्या प्रवाहात तो विलीन होऊन जाईल. कारण त्यात त्याला जीवन सार्थक होण्याचे सुचिन्ह त्याच्या सुप्त जाणिवेतून प्रतित होऊ लागतील.

मानव संघटित होण्याच्या या कृतीत प्रथम त्याला त्याच्यातील पिळवणूक प्रवृत्ती नष्ट करावी लागेल. व सहकार्य प्रवृत्तीची प्रस्थापना करावी लागेल. त्या शिवाय मानवाचे संघटन यशस्वी होऊन त्याचे ध्येय त्याला गाठता येणार नाही.

मानव जातीत ऐक्य प्रस्तापित करण्यासाठी दारिद्र्याची समस्या मधे उभी रहाणार आहे. दारिद्र्य असेपर्यंत त्यांना संघटित करणे शक्य होणार नाही. त्याच्यातील दारिद्र्य नष्ट करण्याचे प्रयत्न करुन त्याच्यात जाणीवा व विश्वास निर्माण केला गेला पाहिजे. दारिद्र्य म्हणजे जीवनावश्यक गरजा भागवू शकत नाही अशी स्थिती. जीवनावश्यक गरजेच्या विवचंनेतून जेव्हा तो मुक्त होईल तेव्हा त्यांच्यात

परिस्थितीची जाणीव निर्माण करून देऊन सहकार्य प्रवृत्तीची प्रस्थापना करता येईल. पिढ्यान् पिढ्या होत आलेल्या पिळवणूकीचे परिणाम अज्ञान, अंधश्रद्धा व दारिद्र्य यामुळे जोपासले जातात. दारिद्र्य नष्ट करताना अज्ञान व अंधश्रद्धा यांनाही नष्ट करण्याचे प्रयत्न करुन ते तिन्ही एकाच वेळी नाहिसे होणे शक्य होईल. त्यातील एकही घटक प्रभाव ठेवून राहिल्यास पिळवणूकीच्या प्रवृत्तीतून तो मुक्त होणार नाही. त्यामुळे त्याला संघटित करून लढ्यास तयार करणे सुलभ होणार नाही व त्याच्यातील पिळवणूक प्रवृत्ती प्रत्येक वेळी उफाळून येण्याची शक्यता कायम राहिल.

मानवामध्ये ऐक्य निर्माण करुन त्यांना संघटित करण्याचे कार्य करताना प्रथम संघटित होणाऱ्यांची पिळवणूक प्रवृत्ती नष्ट करुन त्याच्यांत सहकार्य प्रवृत्तीचे पुनरुजीवन करणे हे महत्वाचे ठरणार आहे. संघटित करण्याचे स्वरुप हे सहकार्य प्रवृत्तीच्या तत्वाने झाले पाहिजे. संघटित होताना त्यांच्यातील विशेष अधिकाराच्या भागाचा सर्वांगिण विचार करुन तयार केला गेला पाहिजे. त्याच्यात कोणत्याही स्वरुपात पिळवणूक प्रवृत्तीचे अवशेष चुकूनही येता कामा नये. लोकशाही ही बहुमान्य पद्धतीही पिळवणूकीच्या अवशेषांनी युक्त आहे. निम्यापेक्षा अधिक संख्येचे वर्चस्व मान्य केले जाते. म्हणजे लोकशाही भेदाच्या निर्मितीच्या तत्वावर उभारण्यात आलेली आहे. म्हणजे अनर्थची नांदी लोकशाहीच्या मुळाशी आहे.

साधनांच्या निर्मात्याचा त्या साधनांचा पूर्ण उपभोग घेण्याचा हक्क मान्य करणे व समान मोबदल्यात साधनांची देवाणघेवाण करणे या सहकार्य प्रवृत्तीच्या तत्वावर नविन राजकीय विचार प्रणाली व आर्थिक पद्धती निर्माण करावी लागेल. त्यामुळे कोणाहीकडे साधनांचे केंद्रीकरण होणार नाही. पर्यायाने सत्तेचे केंद्रीकरण होण्याचा प्रश्नच उद्भवणार नाही. सहकार्य प्रवृत्तीच्या तत्वातूनच स्वातंत्र्यावर नियंत्रणे घातली गेली पाहिजेत. अज्ञानाचा

लवलेशही शिल्लक रहाणार नाही याची कसोशीने दखल घेतली गेली पाहिजे.

सहकार्य प्रवृत्तीच्या तत्त्वावर राजकीय विचार प्रणाली व आर्थिक विचार पद्धती केल्यामुळे कोणालाही विशेष महत्व निर्माण होणार नाही व कोणालाही कमी लेखले जाणार नाही. बंधूभाव प्रत्येकाच्या ठायी निर्माण झाल्याने प्रत्येक कार्य हे सहकार्य भावनेतून केले जाईल. त्याच्यात उपकाराचा भाग नावालाही राहाणार नाही.

साहसाचा उपयोग विश्वातील असंख्य आव्हाने स्वीकारून त्याचा वेध घेण्यासाठी होऊ लागेल. निसर्ग नियमाना शोधून काढून त्यांच्यावर हुकूमत गाजविण्याचा अतुलनिय आनंद त्याला त्याच्यातील सामर्थ्यामुळे मिळवता येईल. प्रगतीचे नवे विक्रम प्रस्थापित करण्याच्या रूपाने त्याच्यातील महत्त्वकांक्षा उफाळून येऊ लागेल.

पिळवणूक नष्ट करुन त्याचा विनाश टाळता येईल पिळवणूक नष्ट करायला पर्याय नाही. पिळवणूक नष्ट झाली नाहीतर ती मानव जातीला नष्ट केल्याशिवाय रहाणार नाही.

जगातील जी राष्ट्रे प्रबळ म्हणविली जातात, त्यांच्याजवळच सुखाची साधने व संहाराची शस्त्रे एकवटली आहेत. ती राष्ट्रे जर या कल्पनेत असतील की ते त्या शस्त्राच्या होणाऱ्या विनाशातून स्वत:ची सहीसलामत सुटका करून घेऊ शकतील तर ते अजूनही भ्रमात आहेत असे म्हणावे लागते. शस्त्रातून होणारा संहार सर्व मानव जातीला नष्ट करून टाकेल व त्यातून जे वाचतील त्यांच्यातील पिळवणूक प्रवृत्ती त्यांचा नाश घडवून आणल्या शिवाय रहाणार नाही आणि तो नाश अधिक भयानक स्वरुपात असण्याची शक्यता राहील.

पिळवणूक प्रवृत्ती नष्ट होऊन सहकार्य प्रवृत्तीच्या प्रस्थापनेमुळे मानवाला नव जीवन प्राप्त होईल. त्याचे जीवन तीन तत्वावर उभे राहील व त्या तत्वाच्या अनुसंगाने त्याच्या जीवनाचा प्रवाव वाहू

लागले. ती महान तत्वे मानवाला पूर्णत्वाला पाहचविण्यास समर्थ ठरतात. ती तीन तत्वे सुख, समृद्धी व सुरक्षितता. ती महान तत्वे मानवाला निसर्ग योजनेच्या मार्गाने घेवून जातील. तो मार्ग विश्वाच्या अस्तित्त्वापर्यंत त्याचे अस्तित्व टिकविण्याचे खात्री देतो. नदी उतारा कडे वाहत जाते हे पाण्याचे अस्तित्व आबाधित ठेवण्याचा निसर्ग योजनेतील मार्ग आहे. तो पाण्याच्या अंगभूत गुणानुसार आहे म्हणून शेवटी असंख्य अडथळचाना पार करून नदी समुद्राला जाऊन पोहचते. त्यानुसार मानवाच्या जीवनाचा मार्ग सुख, समृद्धी व सुरक्षितता यातून जाईल. तेव्हा त्यासमोर येणाऱ्या असंख्य अडथळचाना तो सहज पार करुन आपले अस्तित्व अबाधित ठेवण्यासाठी पुढेपुढे जातच राहिल व शेवटी विश्वाच्या अबाधित अस्तित्वतत्त्वापर्यंत जाऊन पोहचेल व आपले अस्तित्व अबाधित राखण्यास यशस्वि ठरेल.

***

॥ सुख ॥

ज्ञात विश्व दोन भागात विभागलेले आहे. निर्जिव विश्व आणि सजीव विश्व. निर्जिव विश्व हे अधिक व्यापक आहे. आज तरी पृथ्वीवरील सजीव भाग सोडल्यास हे अनंत विश्व निर्जिव असल्याचे दिसते. विश्वातील सजीव भाग फक्त पृथ्वीवरच आढळतो आहे. पृथ्वीवरही सजीव भाग हा निर्जिव भागापेक्षा लहान आहे. सजीव भाग हा निर्जिव भागातूनच निर्माण झालेला आहे. पृथ्वी हा तुकडा सूर्यापासून विभक्त झाला तेव्हा पासून त्या तुकड्याचे स्वरुप तो सूर्याचाभाग असे पर्यंत जे होते त्यापेक्षा बदलत जाऊ लागले. हे स्थित्यांतर काळ घडवून आणत आहे. काळाचे केवढे हे सामर्थ्य. निर्जिव पृथ्वीतून हळूहळू सजीव सृष्टी जन्म घेऊ लागली. निर्जिव विश्वातून सजीव विश्व निर्माण झाले. आणि त्या सजीव सृष्टीतील बदलातून मानव निर्माण झाला आहे.

आजची मानवी कल्पना शक्ति ज्याच्या सिमारेषाही आकलन करुन घेण्यास असमर्थ ठरत आहे. असेहे विश्व त्याच्या विशिष्ट नियमा-

नुसार चाललेले आहे. त्याच्या त्या नियमांचे ज्ञान करून घेणे मानवाला अद्याप शक्य झालेले नाही. परंतु त्या विश्वाची स्पष्ट जाणवणारी बाजु अशी दिसते की, या विश्वातील प्रत्येक घटक त्याचे अस्तित्व टिकविण्याच्या प्रयत्नात असतो. सूर्यमंडलात जे ग्रह सूर्याच्या भोवती फिरतात त्यातून त्याचे विभक्त झालेले अस्तित्व टिकविले जात आहे. विश्वातील असंख्य तारे हे आपले अस्तित्व टिकविण्याच्याच प्रयत्नात आहेत. सूर्याजवळून जाणारा तारा दोघांमध्ये प्रचंड गुरुत्वाकर्षण शक्ति असूनही तो सूर्यावर न आदळता निघून गेला. या मागील प्रेरणा दोघांचेही अस्तित्व अबाधित असावे हीच असावी. परंतु तरीही तो सूर्याजवळून जातो व सूर्यात बदल घडवून त्याचे सूर्यमंडलात स्थित्यांतर करतो त्याचे कारण विश्वातील रचनेत शोधावे लागेल.

पृथ्वीवरील निर्जिव व सजीव सृष्टीत आपले अस्तित्व अबाधित राखण्याचीच प्रवृत्ती दिसून येते. निर्जीव व सजीव सृष्टीतील हे वस्तू-रुपात घटक आहेत. त्यांच्यातील मूळ हेतू आस्तित्व टिकविणे हा असतो. तो हेतु साध्य करण्याच्या क्रियेतून बदल घडवून येत असतात पाणी आपले अस्तित्व टिकविण्यासाठी उताराकडे वाहत येऊन एकत्र होते या क्रियेत उताराकडे जातांना दगडाचे गाळात रुपांतर होणे हा बदल घडून आला असे म्हणता येईल. त्यात जो शक्तीमान असेल तो दुर्बलामध्ये अधिक बदल घडवून आणतो. ही क्रिया प्राण्यांमध्ये प्रकर्षणाने जाणवते. एक प्राणी दुसऱ्या प्राण्याला खातो त्यामाग खाणारा प्राणी आपले अस्तित्व टिकविण्याच्या हेतूने खात असतो त्यात भक्ष्य म्हणून ठरलेल्या प्राण्याचे अस्तित्व नष्ट होते. म्हणजे त्याच्यातील प्राण गेल्याने तो निर्जिव होऊन बदल घडून येण्याची क्रिया दिसून येते.

मानवही आपले आस्तित्व टिकविण्याला सर्वात अधिक महत्व देतो. मानवाच्या अस्तित्वाला बाधा निर्माण होण्याची शक्यता जेव्हा जाणवू लागते तेव्हा तो आपले अस्तित्व टिकविण्यासाठी सर्वस्वाचा

त्याग करण्यास तयार होतो. अस्तित्व टिकविणे हे मानवाचे अंतिम उद्दीष्ट आहे ते विश्वातील अस्तित्व टिकविणे याच्या अनुसंगानेच आहे. हे अस्तित्व टिकविण्यासाठीच त्याला त्याच्या गरजांची पूर्तता करणाऱ्या साधनांचा उपभोग घ्यावा लागतो. त्याने त्याच्या गरजांची पूर्तता केली नाहीतर त्याच्या अस्तित्वाला बाधा निर्माण होते. म्हणून तो कोणत्याही परिस्थितीत आपले अस्तित्व टिकविण्यास अत्यावश्यक असलेल्या गरजांची पूर्तता करित असतो. गरजांची पूर्तता झाली की त्याला आपले अस्तित्व अबाधित असल्याची जाणीव होते, ही जाणीव सुख या स्वरुपात असते. मानवातील सुखाची जाणीव त्याचे अस्तित्व अबाधित आहे. असे त्याला दर्शविते. म्हणून अस्तित्व टिकविण्यासाठी गरजाची पूर्तता करणाऱ्य साधनांच्या उपभोगातून सुखाची जाणीव करुन घेण्याचा त्याचे प्रयत्न सतत चाललेले असतात. त्यावरून मानवी जीवनाचा हेतू सुख प्राप्ती करुन होणे हे विश्वातील आस्तित्व अबाधित ठेवण्याच्या तत्वानुसारच असल्याचे दिसून येते.

मानवाची प्रत्येक कृती ही सुखाची प्राप्ती करुन घेण्याच्या हेतूनेच घडून येत असते. सुख ही गरजेच्या पूर्ततेतून निर्माण झालेली जाणीव आहे. जेव्हा जेव्हा गरजांची पूर्तता होते तेव्हा तेव्हा सुखाची प्राप्ति होतेच. त्याच्यात अपवाद होत नाही. गरजेच्या पूर्तते शिवाय सुखाची निर्मिती होऊ शकत नाही. गरजा ह्या वाढत्या स्वरुपात असतात. गरजांची पूर्तता करणाऱ्या विविध साधनाच्या उपभोगातून सुखाची प्राप्ती अधिकाधिक होत जाते. म्हणून मानवाच्या गरजा ह्या वाढत्या स्वरुपात असतात. त्यातून सुखाचा हेतू साध्य होत जाऊन अस्तित्वाची अधिकाधिक खात्री होत जाते. युद्धावर लढणाऱ्या सैन्यांचे अस्तित्वाला बाधा करणाऱ्या युद्धमय परिस्थितीत जाण्यामागील हेतू, त्याला त्याच्या मोबदल्यात मिळणाऱ्या साधनाच्या उपभोगाने सुखाची प्राप्ती करुन आपले अस्तित्व टिकविणे हा असतो. 'उपाशी राहून मरण्यापेक्षा लढून मरावे,' हे ज्या वेळी तो ठरवितो, त्यामागील मीमांसा अशी असते की, लढून मरण्याची शक्यता कमी असते,

परंतु उपाशी राहिला तर मृत्यू हमखास असतो. अविकसित राष्ट्रामध्ये सैन्य भरती मोठ्या प्रमाणात होत असल्याचे दिसून येते परंतु जी राष्ट्रे विकसित आहेत सुखाची मुबलक साधने उपलब्ध असतात तेथे सैन्य भरती सक्तीने करावी लागते. हे वरील कारणाला पुष्टी देते.

प्रेमातून मिळणारे सुख व धर्मातून मिळणारे स्वर्गीय सुख हे गरजेची पूर्तता करणाऱ्या साधनांच्या उपभोगातून मिळणाऱ्या सुखावर आधारलेल्या कल्पनेनी बनलेली असते. प्रेमाचे सुख हे उत्कट असते. ज्यावेळी सुखाचे उत्कट स्वरुप आनुभवतो, त्या जाणीवेची शाश्वती प्रेम या स्वरुपात व्यक्त झालेली असते. साधारणत: स्त्री व पुरुष यांच्यातील लैंगिक क्रियेवर आधारलेल्या संबंधाना प्रेम असे म्हटले जाते. लैंगिक क्रियेतून सुखाची उत्कट जाणीव होत असते. त्यावर आधारलेल्या प्रेमाचे संबंध म्हणजे सुखाची मिळणारी शाश्वती म्हणून त्याला मानवी जीवनात फार वरचे स्थान मिळालेले आहे. धर्मातून आलेली स्वर्गीय सुखाची कल्पना मानवाला प्रभावित करताना दिसत नाही. कारण त्या स्वर्गीय सुखाची जाणीव त्याला कधीही होत नाही. ती जाणीव सुखाच्या कल्पनेतून निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो. स्वर्गीय सुखाची कल्पनाही गरजेची पूर्तता करणाऱ्या ज्या साधनांतून त्याला उत्कट सुखाची जाणीव होते. त्यावर त्या आधारलेल्या असतात. 'स्वर्गात मीठ–भाकर मिळेल.' ही कल्पना कधीही नसते. ती त्याला मोहीत करू शकत नाही. 'स्वर्गात सुंदर अप्सरा सेवेला असतात.' ही कल्पना त्याला आगोदरच्या कल्पनेपेक्षा अधिक आकर्षक वाटत असते. हाच क्रम गरजेच्या पूर्तता करणाऱ्या साधनांच्या उपभोगातून निश्चित झालेला आहे. स्वर्गीय सुखाची कल्पना त्याच्यात प्रत्यक्ष सुखाची जाणीव निर्माण करू शकत नसल्याने त्या निरर्थक ठरून त्याच्यावर प्रभाव निर्माण करू न शकणाऱ्या ठरतात.

मानव ज्या सुखासाठी प्रयत्नशील असतो. ते त्याला फक्त त्याच्या गरजेच्या पूर्तता करणाऱ्या साधनांच्या उपभोगातूनच मिळत असते.

त्याशिवाय दुसरा कोणताही मार्ग सुखाची प्राप्ती करून देऊ शकत नाही. जे कपोलकल्पीत मार्ग सांगितले जातात ते निरर्थक आहेत. त्यातून त्याला कधीही सुखाची प्राप्ती होऊ शकणार नाही. अनाकलनिय मानसिक प्रक्रीयेतून बिंबविली जाणारी सुखाची अनुभूती ही त्याला प्रभावित करणार नाही.

मानवाच्या सर्व कृती त्याला सुख प्राप्ती करुन देण्याच्या दिशेने घडून येत असतात. गरजेच्या पूर्ततेसाठी कोणते साधन वापरले जाते यावर त्याच्या सुखाचे मुल्य मापन तो करुन घेत असतो. ज्या साधनांच्या उपभोगातून त्याला सुखाची अधिक प्राप्ती होते, ती साधने संपादन करण्याच्या दिशेने त्यांच्या प्रयत्नांचा रोख असतो. एकाच प्रकारच्या साधनाचा उपभोगातून मिळणारी सुखाची जाणीव कमी होते. विविध साधनांच्या उपयोगातून सुखाची जाणीव अधिकाधिक होत असते. या अनुरोधाने त्याच्या सुखप्राप्तीसाठी त्याच्या गरजेची पूर्तता करणाऱ्या साधनांचे संपादन करण्याचे प्रयत्न नियमित झालेले असतात.

मानवाच्या सुखप्राप्ती करून घेण्याच्या क्रियेवर त्याच्या जीवनाचा पाया आधारलेला आहे. त्यातूनच मानवाची प्रगती घडून येत असते. प्रगती म्हणजे गरजांची पूर्तता करणाऱ्या साधनाची अधिक निर्मिती होय. प्राण्यामध्ये व मानवामध्ये दिसून येणारा हा मोठा फरक आहे. प्राणी उपलब्ध साधनावर आपले अस्तित्व टिकवितात. त्यांना त्याच्या गरजापूर्तता करणाऱ्या साधनांची निर्मिती करता येत नाही. परंतु मानवाला त्याच्या गरजांची पूर्तता करणाऱ्या साधतांची निर्मिती करण्याचे सामर्थ्य मिळालेले आहे. ज्ञात विश्वातील कोणत्याही सजीव वस्तूमध्ये असे सामर्थ्य असल्याचे दिसत नाही. परंतु दुर्दवाने मानवाने त्याच्या त्या सामर्थ्याचा उपगोग साधनांचा निर्मितीसाठी करण्यापेक्षा स्वतःचा विनाश घडवून आणण्याकडे अधिक करून घेत असल्याचे दिसत आहे. त्याने जर त्याच्या त्या शक्तीचा उपयोग असाच करण्याचे

चालू ठेवला तर त्याचा विनाश घडून आल्याशिवाय राहणार नाही. आत्मनाश करणे विश्वातील तत्त्वाच्या विरुद्ध आहे.

त्याने साधनांच्या निर्मितीच्या क्षमतेचा उपयोग त्याच्या प्रगतीसाठी करुन घेतल्यास तो या विश्वात सर्वात सामर्थ्यशाली म्हणविला जाईल. ज्या अर्थी त्याच्यात निर्मिती करणारी क्षमता दिसून येते, त्या अर्थी विश्वाची निर्मिती करण्याची क्षमता धारण करण्याची मानव ही लहानशी प्रतीकृती असावी. विश्वाचे नियंत्रण तिच्या निर्मितीची क्षमता धारण करणाऱ्या कडून घडून येत आहे. मानवही त्यांच्यातील अमर्यादा निर्मिती क्षमतेच्या साहाय्याने या विश्वाचे नियंत्रण करू शकेल व विश्वाचा अधिपती ठरेल.

मानवाच्या साधन निर्मितीच्या क्षमतेची वाढ त्या साधनांच्या उपभोगातून मिळणाऱ्या सुखाच्या प्रयत्नातून घडून येत असते. मानवाच्या साधन निर्मितीच्या क्षमतेची वाढ विश्वावर नियंत्रण प्रस्थापित होण्याएवढी सामर्थ्यवान करून आपले अस्तित्व चिरतंन करून ठेवेल, तेव्हा मानवाला पूर्णावस्था प्राप्त झाली असे म्हणता येईल.

साधनांच्या उपभोगातून त्याची निर्मिती क्षमता वाढत जाते. व त्यातून साधनांची अधिक निर्मिती घडून येते. परंतु मानवात नेमक्या त्याच जाणीवेचा अभाव दिसून येतो. त्यामुळे त्याचे जीवन मर्यादित सुखातून विनाशाकडे नेण्यास कारणीभूत होत आहे. मानवाने साधनांचा उपभोग घेण्यावर प्रतिबंध निर्माण करून स्वतःचे फार मोठे नुकसान करून घेतले आहे.

राष्ट्र या सिमारेषांनी बद्ध भूभागावरील साधनाचा मुक्त उपभोग घेण्यास मानवाला प्रतिबंध करून स्वतःच्या सुखप्राप्तीला मर्यादा घालून घेतल्या आहेत. परिणामी त्यांना साधनाच्या उपभोगापासून सुखाची प्राप्ती मुक्त पणे होत नसल्याने त्या सुखाच्या प्रेरणेने त्याच्यातील साधनाच्या निर्मितीच्या क्षमतेची जी वाढ होणार

असते ती होत नाही. त्यामुळ अधिक साधनांची निर्मिती घडून येणे शक्य होत नाही. व त्यातून संपूर्ण मानव जातीची मोठी हानी होते.

प्रत्येक मानवात असलेली साधनाची निर्मिती क्षमता भिन्न प्रकाराने युक्त असते. त्या अनुरोधाने त्याच्या साधनाच्या उपभोगावर मर्यादा घालणे हे अनुचित ठरते. कारण त्यामुळे त्याच्यातील साधन निर्मितीच्या क्षमतेत वाढ होणे यात आडथळा निर्माण होऊ लागतो. व त्याप्रकारच्या साधनाची प्रगती घडून येत नाही. त्यातून मानवाला त्या प्रकारच्या साधनांच्या उपभोगातून मिळणाऱ्या सुखापासून वंचित व्हावे लागते. त्यामुळे मानवी जीवनाच्या सुख प्राप्तीच्या हेतु सफल करण्यासाठी मिळणाऱ्या प्रेरणेत खंड पडतो.

मानवात कोणत्या प्रकारची साधन निर्मिती करण्याची क्षमता आहे. हे समजणे सहज सुलभ नसते.

मानवाच्या क्षमतेची वर्गवारी करुन विविध साधनांचा उपयोगास प्रतिबंध करणे हे अयोग्य ठरते. कारण विविध साधनांचा उपभोग घेण्यास प्रतिबंध केल्याने त्याच्यालील निर्मिती क्षमता वाढत नाही. म्हणून साधनांच्या उपभोगावर प्रतिबंध होणार नाही व त्याचा उपयोग मुक्तपणे घेता यावा असे असणे मानवाला हितकारक ठरते.

साधनांच्या उपभोगाच्या मुक्त धोरणामुळे निर्मिती क्षमतेची प्रेरणा नाहिसी होईल, व साधनांचा निर्मितीवर परिणाम घडून येऊन प्रगतीला आडथळा निर्माण होईल, या आरोप विधानात तथ्यांश असल्याचे दिसत नाही. प्रत्येक मानवाची त्याच्यातील साधनांच्या निर्मितीक्षमतेच्या अनुसंगाने वाढ होत जाते. त्याच्यातील इच्छा हे त्याचे प्रतिक असते. महत्वकांक्षा हे त्याच इच्छेचे तीव्र स्वरुप आहे. त्या इच्छे अनुसार साधनांच्या निर्मिती क्षमतेचा उपयोग त्याच्या आवडत्या क्षेत्रात पूर्णपणे करीत असतो. एखाद्याची डॉक्टर होण्याची उपजत इच्छा असली म्हणजे डॉक्टर होण्यासाठी कराव्या लागणाऱ्या

परिश्रमाची व त्या बरोबर लागणाऱ्या बौधिक कुवत असल्याची सुप्त जाणीव त्याच्यात दडलेली असते. किंबहुना त्या जाणीवतूनच त्याची ती इच्छा बनलेली असते. त्याऐवजी एखाद्यात त्याप्रकारची बौधिक कुवत व परिश्रम करण्याची तयारी यांचा आभाव असल्यास तो डॉक्टर होण्याची इच्छा बाळगणार नाही. त्याला इंजिनिअरिंग क्षेत्रात जाण्याची इच्छा असेल तर बौधिक कुवत व परिश्रम करण्याची तयारी त्याच्या आधारावर इंजिनिअर होईल. तर दुसरा इंजिनिअरिंग क्षेत्रात जाऊ इच्छिणारा त्याच्यातील बौधिक कुवत व परिश्रम करण्याची तयारी यांच्या आधारावर त्याच्या इच्छेनुसार टर्नर होईल. दोघेही आपल्या इच्छेनुसार काम करु लागल्यामुळे त्यांच्यातील निर्मितीक्षमतेचा उपयोग करुन घेण्याचा प्रयत्न करतील. जितके इंजिनिअरचे सहाय साधनांच्या निर्मितीला आवश्यक असते तितकेच टर्नरचे सहाय्य साधनांच्या निर्मितीला आवश्यक ठरते. दोघांच्याही सहाय्याशिवाय एकाद्या विशिष्ट साधनांची निर्मिती होऊ शकणार नाही. प्रत्येकाच्या इच्छेनुसार काम मिळाल्यामुळे निर्मिती क्षमतेचा उपयोग पूर्णपणे करून साधनांची अधिकाधिक निर्मिती घडून येईल.

एकाद्यावर इंजिनिअर होण्याची इच्छा लादण्यात आली व त्याला सक्तीने इंजिनिअर करण्याचा प्रयत्न केल्यास त्याच्यात तशी क्षमता नसल्याने त्याच्यातील निर्मिती क्षमता वाढणे शक्य होणार नाही. त्याच्या क्षमतेचा अनाठायी उपयोग केला गेल्यामुळे त्या क्षमतेला खीळ बसेल. त्यातून मानवाच्या प्रगतीची गतीमध्ये अडथळा निर्माण होईल. आजच्या मानवावर इच्छा लादण्यात आल्यामुळे प्रगतीला मोठा आडथळा निर्माण झाला आहे.

मानवाने त्याच्या जीवनाचा हेतु प्रजोत्पादन करणे, मोक्ष प्राप्ती करुन घेणे, राष्ट्रासाठी बलीदान करणे असे विविध मानण्याचा प्रयत्न केला आहे. धार्मिक राजकिय, आर्थिक, सामाजिक इत्यादी क्षेत्रात

मानवी जीवनाचे हेतू निरनिराळे मानून त्या अनुसंगाने त्यांची वाढ-करण्यात आली आहे. त्या मानलेल्या हेतुच्याच अनुरोधाने मानवी जीवन नियमित करण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु त्या हेतूच्या अनुरोधाने मानवाने केलेली वाटचाल त्याला पोषक ठरलेली नाही. त्यातून त्याच्या प्रगतीपेक्षा अधोगतीसच ते कारणीभूत ठरलेले आहे. त्यावरून ते मानलेले हेतु चुकीचे असल्याचे सिद्ध होते.

मानवी जीवनाचा हेतु मान्य करताना त्याबद्दल अनेकांनी अनेक विश्लेषण करण्याचा प्रयत्न केला. व तो हेतुच सत्य असल्याचे दाखविण्यात आला. ते बहुतेक सर्व हेतु काल्पनिक स्वरुपात मांडण्यात आले. ज्यांना भौतिक कल्पनेचा आधार होता त्यांना शास्त्रीय आधार दिला गेला नाही. तरीही त्यांना सत्य मानून त्या अनुसंगाने वाटचाल केली गेली. परिणामी मानवाची दिशा चुकत जाऊन असंख्य चुकांकडे त्याला घेऊन गेली आहे.

'मानवाचा हेतु सुखप्राप्ती आहे.' हा शास्त्रीय पायावर उभा आहे. गरजांची पूर्तता करणाऱ्या साधनांच्या उपभोगातून तो हेतु सफल केला जातो. हे अर्थशास्त्रीय अधिष्ठान त्याला लाभते तो हेतु मान्य केल्यावर मानवाच्या सर्व कृतींची संगती लागते अस्तित्व अबाधित ठेवणे हेच चिरंतन सत्य आहे. याच्याशीही तो हेतु सलग्न आहे. मानवी जीवनाचा हेतु सुखप्राप्ती मान्य करुन त्या अनुरोधाने वाटचाल करीत गेल्यास आपले अस्तित्व अबाधित करून घेण्यास तो यशस्वी होईल. विश्वतील चिरंतन सत्याच्या तत्वात तो विलीन होऊन जाईल.

* * *

॥ समृद्धी ॥

वाढत्या गुन्हेगारी प्रवृतीची समस्या प्रत्येक देशात उग्रस्वरुप धारण करीत आहे. त्यावर नियंत्रण व प्रतिबंध करण्याचे विशेष प्रयत्न केले जात आहेत. त्यासाठी प्रचलित यंत्रणा, कायदे हे अपूर्णता व असमर्थता व्यक्त करीत आहेत. गुन्हेगारी प्रवृतीवर नियंत्रण व प्रतिबंध करण्यासाठी मोठ्या यंत्रणा उभ्या केलेलेल्या दिसून येतात. त्यासाठी बराच मोठा खर्च करावा लागतो आहे. युद्धावरही फार मोठे खर्च होतो. ती एक अत्यंत मोठे स्वरुप असलेली गुन्हेगारीच आहे. त्याचे नियंत्रण व प्रतिबंध करण्यासाठी सतत प्रयत्नशील रहावे लागते. युद्धावर जो प्रचंड खर्च केला जातो त्यातून उपभोग साधनांची निर्मिती होत नाही. त्यातून ज्याची निर्मिती केली जाते ते मानवाला अत्यंत घातक ठरते आहे. हे सर्व पिळवणूक प्रवृतीचे फलीत आहेत.

सहकार्य प्रवृतीवर आधारलेल्या मानवी जीवनात त्याची सर्व बुद्धी व शक्ती उपभोगाची साधने निर्माण करण्यासाठी खर्ची पडेल. सहकार्य

प्रवृत्तीतून गुन्हेगारी निर्माण होत नाही. व मानवामध्ये मुळातच गुन्हेगारी प्रवृत्ती असल्याचे आढळून येत नाही. त्याचा कल सहकार्य प्रवृत्तीकडेच झुकलेला असतो. परंतु संस्कृती, शिक्षण, समाज इत्यादीतून त्याच्यावर जे संस्कार घडत असतात त्यातून त्याच्यात पिळवणूकप्रवृत्ती निर्माण होत असते. ज्याच्यात साहसीवृत्ती अधिक असते त्याचे विकृत स्वरुपात झालेले रूपांतर गुन्हेगारी ही असते. गरजांची पूर्तता करणाऱ्या अधिकाधिक साधनांचे संपादन करण्यासाठी साहसाचा उपयोग त्याला होत असतो. ज्यांना समाज-मान्य मार्गाने त्याच्यातील साहसी वृत्तीचा उपयोग अधिकाधिक साधनांचे संपादन करण्यासाठी शक्य होत नाही ते गुन्हेगारी मार्गाने संपादन करीत असतात.

गुन्हेगारीचे नियंत्रण व प्रतिबंध करण्यासाठी जी यंत्रणा उभी केलेली असते. तिच्या कार्याला सेवा असे संबोधले जाते. त्या सेवेसाठी जो खर्च होतो तो साधनांची निर्मिती करतो असे म्हणता येणार नाही. कारण त्याचा उपयोग प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या उपभोगाच्या साधनाच्या निर्मितीसाठी होत नाही. परंतु ज्या सेवा साधनांच्या निर्मिती साठी प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या उपयोगात येतात त्याना साधनाच्या निर्मितीत सहाय्यक म्हणून आवश्यक सेवा अशी मान्यता देता येईल. त्या सेवेचे काम करणाऱ्याला समान मोबदल्यात साधने मिळवून देणे योग्य ठरते. त्यामुळे त्याचे महत्व कमी किंवा जास्त ठरू शकत नाही. त्याच्या सेवेला साधन निर्मितीत सहाय्यक म्हणून मान्यता मिळाल्याने तिचे महत्व साधन निर्मिती इतकेच राखले गेले पाहिजे.

ज्या उपयोगी व निरुपयोगी सेवाना आज अवाजवी महत्व प्राप्त झाले आहे. त्यातून साधनांच्या निर्मितीला बाधा निर्माण झाली आहे.

समृद्धी म्हणजे गरजेची पूर्तता करणाऱ्या साधनांची विपुल निर्मिती होय. समृद्धीतून मानवी जीवन पूर्णत्वाकडे जात असते. मानवी जीवन

पुर्णात्वाकडे जाण्याच्या समृद्धीच्या मार्गामुळे निसर्ग नियम जाणून घेवन विश्वावर नियंत्रण प्राप्त होत जाईल. या मार्गाने जेव्हा तो पूर्णत्वेला पोहोचेल, तेव्हा त्याचे अस्तित्व अबाधित राखणे हे त्याच्या नियंत्रणा खाली आलेले असेल. जन्म व मरण त्याच्या इच्छेनुसार होऊ लागेल.

विश्वाचे नियंत्रण व निर्मिती करणारी शक्ती किंवा तत्व असेल ते अविनाशी असले पाहिजे. मानव जेव्हा अविनाशी होईल तेव्हा पूर्णत्वाला पोहचलेला असेल. विश्वाच्या निर्मितीचे व नियंत्रणाचे जे तत्व असेल त्याचे पूर्ण आकलन झ'ल्याने त्याच्यातही विश्वाची निर्मिती करणाऱ्या शक्ती एवढी निर्मिती शक्ती निर्माण झालेली असेल ही शक्ती वाढते नियंत्रण व विकसित निर्मिती क्षमतेतून होणाऱ्या समृद्धीच्या मार्गाने प्राप्त होऊ शकते. म्हणून मानवाच्या वाटचालीचा मार्ग हा समृद्धीतूनच जाणारा असला पाहिजे.

मानवी जीवनाचा हेतु सुख प्राप्ती करुन घेणे हा आहे. परंतु ही सुख प्राप्ती करुन घेण्यांमागे त्याचे अस्तित्व टिकविले जाणे हे विश्वाचे अस्तित्व टिकविणे या चिरंतन सत्याच्या सुत्राशी सल्लग्न आहे. मानवाचे अस्तित्व टिकविणे करीता त्याच्या जीवनाचा हेतु सुखप्राप्ती झालेला असतो. मानवाचे अस्तित्व टिकविणे हे त्याच्या जीवनाच्या सुखप्राप्ती पेक्षा अधिक महत्वाचे ठरते. म्हणून मानवी समृद्धी घडवून आणण्यामागे पूर्णत्व प्राप्त करुन घेणे हे अंतिम उद्दिष्ट असले पाहिजे. कारण पूर्णत्व प्राप्त झाले म्हणजे त्याला त्याचे अस्तित्व अबाधित राखणे सहज शक्य होईल. समृद्धी मागील हेतु मानवाचे अस्तित्व अबाधित राखणे हाच असला पाहिजे.

मानवातील साधनाची निर्मिती क्षमता वाढविणे म्हणजे साधनांच्या निर्मिती तत्व जाणून घेणे. त्या तत्वानुसार साधनावर नियंत्रण प्रस्तापित करता येते. त्यामुळे अवश्यकते नुसार त्या साधनांची निर्मिती करता येते.

साधनांची निर्मिती करणे म्हणजे वस्तुचे रुपांतर करून त्याच्यांत गरजेची पूर्तता करण्याची क्षमता निर्माण करणे होय. वस्तूचा नाश घडून येणे म्हणजे त्याचे रूपांतर दुसऱ्या वस्तूत होणे होय. वस्तु कधीही नष्ट होत नाहीत त्यातील घटक वेगळे होऊन ते निराळे स्वरुप धारण करतात विश्वातील प्रत्येक वस्तुही याच पद्धतीने नाश पावत असते.

वस्तुंचे रूपांतर करण्याची प्रक्रियेचे नियंत्रण ज्या तत्वाने किंवा शक्तीने घडून येत असते ते तत्व किंवा शक्ती विश्वाचे नियंत्रण करीत असते. ते तत्व किंवा शक्ती अविनाशी आहे. मानवात वस्तूंचे रूपांतर करण्याची शक्ति आहे. मानवाची शक्ती विकसित करीत गेल्यास विश्वाची रूपांतर करण्याची जी अविनाशी शक्ती आहे, तिच्या एवढी होऊ शकेल. तेव्हा तो समस्त विश्वाचे नियंत्रण करू शकेल.

समृद्धीचा हेतू पूर्णत्वाकडे जाण्याचा असल्याचे मान्य न केल्यास त्याच्या जीवनाचा हेतु सुखप्राप्ती यातच तो गुरफटून जाऊन दिशाहिन होईल. समृद्धीत आडथळा निर्माण झाल्यामुळे जीवन थव्व होऊन बसेल. समजा समृद्धीचा हेतु सुख प्राप्ती करुन घेणे याच दिशेने जाणार असेल तर त्यातून मानवी जीवनात चैन व ऐश आराम याचे महत्व वाढत जाईल. व त्यातून निर्माण होणारा ऐदी पणा त्याच्या साधनांच्या निर्मिती क्षमतेवर अनिष्ट परिणाम घडवून आणेल. त्याच्या प्रगतीला गती राहणार नाही व समृद्धी घडवून येण्यास मोठा आडथळा निर्माण होऊन बसेल. त्या आडथळ्यातून गुंतागुंत निर्माण होत होऊन मानवी जीवन परत संकटात सापडण्याची नांदीसुरु होईल. व त्याचे अस्तित्वाला धोका निर्माण होण्याची शक्यता वाढत जाईल. म्हणून मानवाची समृद्धी घडवून आणण्याची दिशा पूर्णात्वाकडे जाणारी आसली पाहिजे.

मानवाचे अंतिम उदिष्टचे पुर्णत्वाला जाणे हे आहे. मानवी

जीवनांच्यां विविध अंगाचा विकास घडवून आणणारी क्षेत्रे यांचा हेतु मानवाचे अंतिम उद्दिष्टचे साध्य करण्यासाठी मानवाचो घडण करणे हा असला पाहिजे. हा घडण करण्याचा मार्ग समृद्धीतून जाणारा असेल. मानवाची बौद्धिक वाढ व मानसिक घडण त्याचे अंतिम उद्दिष्ट साध्य करण्याच्या रोखाने झाली पाहिजे. मानवाने बुद्धीचा व मनाचा उपयोग अंतिम उद्दिष्टचे साध्य करण्यासाठी करुन घेण्यास सुरुवात केल्यावर त्याची शक्ती अनाठायी खर्च होण्याची शक्यता आपोआप नष्ट होईल. व समृद्धी होत जाऊन त्याचे अंतिम उद्दिष्ट साध्य करणे शक्य होईल.

बौधिक वाढ व मानसिक घडण त्याचे अंतिम उद्दिष्ट स ध्य करण्यासाठी घडवून आणणे हे सर्वात अधिक महत्वाचे ठरते. अंतिम उद्दिष्ट साध्य करण्यासाठी लागणारी अमर्याद शक्ती बुद्धीतून मिळेल व प्रचंड प्रेरणा मन देत राहील. कोणतेही कार्य सिद्धीस नेण्यासाठी शक्ती व प्रेरणा यांची सांगड पाठीशी असल्या शिवाय ते अशक्य ठरते. जितकी प्रेरणा तीव्र तितकी शक्ती अधिक निर्माण होत असते. व तेवढ्यालवकर त्याचे उद्दिष्ट साध्य होते. त्यामुळे त्याच्यातील प्रेरणा व शक्ती यावर त्याचे उद्दिष्ट साध्य करण्याचे अवलबून राहिल मानवातील प्रेरणांची तीव्रता व त्याच्या शक्तीचे सामर्थ्य अधिकाधिक निर्माण करण्याचे प्रयत्न होणे हे त्याचे अंतिम उदिष्ट लवकरात लवकर साध्य करण्यासाठी आवश्यक ठरते.

मानवावर निर्माण केलेल्या धर्माचा प्रभाव हा त्याच्या बुद्धीचा मनाचा उपयोग करून घेऊन घडवून आणला आहे. त्यामुळे त्याने मानवाच्या सर्वांगांवर आपला प्रभाव निर्माण करून मानवी अस्तित्वालाही बाधा निर्माण करून ठेवली आहे. त्याच बूद्धीचा व मनाचा सद्उपयोग मानवी अस्तित्व अबाधित ठेवणे या अंतिम उद्दिष्टसाध्य करण्यासाठी करून घेतल्यास त्याचा प्रभाव जीवनाच्या सर्वांगांवर घडून येऊन त्याचे अंतिम उद्दिष्ट साध्य करणे सुलभ होईल.

समृद्धीमुळे मानवी जीवनाच्या सुखप्राप्तीसाठी गरजेची पूर्तता करणाऱ्या साधनांची एवढी उपलब्धता होत जाईल की, त्याचे सर्व लक्ष त्याला त्याचे अंतिम उद्दिष्ट साध्य करण्यासाठी केंद्रित करता येईल. आजपर्यंतचा अनुभव असे दर्शवितो की, सुखाची निश्चिती होत गेली की मानव त्याच्या विविध जीवनाचा अंगाचा विचार करण्याकडे आपले लक्ष वळवू लागतो. तो जेव्हां त्याच्या विविध अंगाचा विचार करण्यास सुरुवात करतो, तेव्हा त्याच्या जीवनाला कोणता अर्थ आहे हां विचार त्याला सर्वात जास्त आकर्षक वाटतो. त्याचाच त्याचा जीवनावर आधिक प्रभाव निर्माण होणार असतो. 'मानवाचे अंतिम उद्दिष्ट कोणते असावे?' हा प्रश्न त्याला सारखा भेडसावित असतो. वरील प्रश्नाचे उत्तर मिळाल्यामुळे समृद्धीतून त्याच्या पूर्णत्वाकडे जाण्यासाठी कराव्या लागणा-या प्रयत्नामुळे त्याचे सर्व लक्ष केंद्रीत होऊन त्याला अंतिम उद्दिष्ट साध्य करणं लवकरातलवकर शक्य होईल.

मानवी जीवनावर लैंगिक क्रियेतून मिळणाऱ्या सुखाचा मोठा प्रभाव पडलेला आहे. त्या प्रभावाने मानवी जीवनात मोठे स्थित्यांतर घडवून आणले आहे. लैंगिक सबंधावर कुटुंब आधारलेले आहेत. लैंगिक क्रियेतून मिळणारे सुख प्राप्तीचे साधन मानवच आहे. कुटुंब म्हणजे लैंगिक क्रियेवर नियंत्रण होय. मानवावर नियंत्रण करून लैंगिक साधनावर नियंत्रण होते. लैंगिक क्रिया ही विशिष्ट व्यक्तिमध्ये होऊन सुखाची प्राप्ती मिळविली जाते. त्या व्यक्तिशिवाय त्याच्या साधनांचा सुखाची प्राप्ती करून घेण्याचा उपयोग इतरांसाठी प्रतिबंध केला जातो. त्यामुळे सुखाची प्राप्ती करून घेण्याच्या हेतुला मर्यादा पडून अडथळा निर्माण होतो. त्यामुळे लैंगिक क्रियेतून मिळणाऱ्या सुखाची प्राप्ती मिळणाऱ्या साधनांच्या संपादनात गुंतून पडतो. त्यामुळे त्याचे लक्ष त्याचे अंतिम उद्दिष्ट साध्य करण्याकडे केंद्रीत होण्यास

अडथळा निर्माण होईल म्हणून लैंगिक क्रियेतून सुखाची प्राप्ती करुन घेण्यास प्रतिबंध लावणे हानी कारक ठरते.

लैंगिक क्रियेवरील प्रतिबंध काढून टाकले म्हणजे स्वैराचार निर्माण होणार नाही. सहकार्य प्रवृत्तीनुसार समान मोबदला व पूर्ण उपभोगाचा हक्क या तत्वानुसार लैंगिक क्रियेच्या साधनांची देवाण-घेवाण होईल म्हणजे बळजबरी होणार नाही. स्वतःच्या इच्छेनुसारच ती घडून येईल. एका लैंगिक क्रियेतील साधनातून त्याला सुखाची प्राप्ती पूर्ण झाली नाही तर, लैंगिक क्रियेतील दुसऱ्या साधनाच्या उपभोगातून सुखाची प्राप्ती करून घेता येईल. व त्याच्या जीवनाचा हेतु सफल करता येईल.

मानवाने लैंगिक क्रियेतील साधनांवर जे अवास्तव बंधने लादली आहेत. त्याने मानवी जीवनात मोठी अस्वस्तता निर्माण करून ठेवली आहे. मानवी मनांच्या विकृतीची कारणे बहुतांशी लैंगिक क्रियेतून मिळणाऱ्या सुखाच्या प्राप्तीच्या अभावातून निर्माण झालेली दिसून येतात. काही संघर्षाच्या मुळाशी तीच कारणे असतात.

लैंगिक क्रियेवरील लादलेल्या बंधनामुळे मानवाच्या समृद्धी घडून आणण्याच्या प्रयत्नांना खीळ बसलेली आहे. लैंगिक क्रियेतून मिळणाऱ्या सुखाच्या प्राप्तीच्या अतृप्ती मुळे निर्माण झालेली अस्वस्तता मानवी जीवन अधोगतीभिमुख करीत आली आहे. मानवी जीवनात विनाश घडवून आणण्यास त्याचा ही मोठा प्रभाव आहे.

प्राण्यामध्ये किंवा पक्ष्यामध्ये घडून येणाऱ्या लैंगिक क्रियेला सहकार्य प्रवृत्तीचाच आधार असल्याचे दिसून येते. नर व मादी यांच्यात होणारी लैंगिक क्रियेतील सुखाच्या साधनांची देवाण घेवाण ही सहकार्याच्या तत्वावर घडून येत असते. त्याच्यांतील इच्छा व गरज संपली म्हणजे ते एकमेकापासून मुक्त होतात. व पुढच्या वेळी त्याची इच्छा व गरजेनुसार नर व मादी एकमेकांची निवड करीत असतात.

प्राण्याच्या व पक्ष्याच्या जीवनात कोठेही अनर्थ माजलेला दिसत नाही. किंवा स्वैराचार माजून बळजबरीने लैंगिक क्रियेसाठी संघर्ष पेटवून हानी घडवून आणलेली दिसत नाही. त्यावरुन लैंगिक क्रियेवरील बंधने नष्ट करून सहकार्य प्रवृत्तीने मुक्त स्वरुपात लैंगिक क्रिया घडून आल्यास मानवी जीवनात अनर्थ किंवा स्वैराचार माजेल ही भिती बाळगणे व्यर्थ ठरते. मुक्त लैंगिक क्रियेतून होणारी प्रजोत्पादनाच्या संगोपनाची जबाबदारी साधनांचा मुक्त उपभोग घेण्याच्या पद्धती मुळे सर्व मानव जातीवर येते. त्यामुळे त्याच्या संगोपनाची चिंता करणे निरर्थक ठरते. मुबलक साधनांच्या उपभोगातून सुखाची प्राप्ती घडून येत असल्याने प्रजोत्पादन करण्याकडे आपोआप नियंत्रण निर्माण होईल. व प्रजोत्पादन अंत्यत मर्यादित स्वरुपात घडून येईल.

लैंगिक क्रियेतून मिळणाऱ्या सुखाच्या प्राप्तीचे एक वैशिष्टच आहे ते असे, इतर सुखाच्या प्राप्तीसाठी साधनांचा उपयोग घेताना ती साधने त्याच्यातील गरज पूर्ततेची क्षमता नष्ट झाल्याने त्याज्य ठरतात. परंतु लैंगिक क्रियेतून मिळणाऱ्या सुखाच्या प्राप्तीसाठी साधनाचा उपभाग घेतल्यानंतर ती साधने त्याज्य ठरत नाहीत. अश्या या सुखाची प्राप्ती घेतांना नष्ट न होणाऱ्या साधनांचा उपभोग आधिकाधिक सुखाची प्राप्ती करुन घेण्यासाठी केला जावा असी नैसर्गिक योजना असली पाहिजे.

विश्व अमर्याद वस्तूंनी भरलेले आहे. आज त्याचा ठाव घेणे हे मानवाच्यां शक्तीबाहेरचे आहे. मानवी जीवनाचा हेतु सुख प्राप्ती आहे. ती गरजेची पूर्तता करणाऱ्या साधनांच्या उपभोगातून मिळत असते. गरजेची पूर्तता करणारी साधने निर्माण करण्याचे सामर्थ्य मानवात आहे. ती साधने निर्माण करणे म्हणजे वस्तूचे रुपांतर करुन त्यांच्यात गरजेची पूर्तता करण्याची क्षमता उत्पन्न करणे. कोणत्याही वस्तु मध्ये जेव्हा गरजा पूर्तता करण्याची क्षमता बानावली

जाते तेव्हा त्या वस्तूला गरजांची पूर्तता करणारे साधन म्हटले जाते. विश्वातील अमर्याद वस्तूंकडे दृष्टीक्षेप टाकल्यास मानवापुढे केवढे विस्तृतक्षेत्र आहे, ज्यातून त्याला त्याच्या गरजांची पूर्तता करणाऱ्या साधनांची निर्मिती करता येईल यांची जाणीव होते. त्या दृष्टीकोनातून मानवाची आजची लोकसंख्या ही तुटपूंजी वाटू लागते.

सुखाची प्राप्ती करीत समृद्धी घडवून आणणे व त्यातून त्याचे अंतिम उद्दिष्ट साध्य करुन घेण्याचा प्रयत्न करणे हा मानवाला चिरंतन सत्याकडे घेऊन जाणार मार्ग आहे.

* * *



॥ सुरक्षितता ॥

प्रगतीमध्ये सुरक्षिततेचा विचार केला गेला नाही. किंबहुना सुरक्षिततेची किंमत देऊन प्रगती घडवून आणलेली आहे. प्रगती होत गेली ती मानवाची हत्या करत. मानवाने सुरक्षितता हे सर्वात महत्वाचे असूनही त्याकडे लक्ष दिले नाही.

मानवाने जे हत्त्या करण्याचे सुत्र अवलंबिले ते अजब वाटते. एका व्यक्तिची हत्या दुसऱ्या व्यक्तिकडून केली गेली की, पहिल्या व्यक्तिच्या सुरक्षितेला धोका निर्माण केला म्हणून दुसऱ्या व्यक्तिची हत्त्या करण्यात येते. व हे सुरक्षितता राखण्याच्या नावाखाली केले जाते. अनेकांच्या सुरक्षितेच्या नावाखाली अनेकांची हत्त्या घडवून आणली जाते. एवढेही करून सुरक्षितता ही पूर्वीपेक्षा अधिकच धोक्यात येत गेलेली आहे. मानवाच्या सुरक्षिततेसाठी मानवाकडून केली जाणारी मानवाची हत्त्या ही मानवाला अधिक असुरक्षित करीत आलेली आहे. आणि आज तर अखिल मानवजातच असुरक्षिततेमुळे चिंताग्रस्त झालेली आहे.

हे सर्व पिळवणूक प्रवृतीतून निष्पन्न झालेले परिणाम आहेत. तिने मानवाची सुरक्षितता नष्ट करून त्याच्या अस्तित्त्वालाच धोका निर्माण करून ठेवला आहे. विसाव्या शतकातील केवळ दोन महायुद्धात कोटीने मानवाची हत्त्या घडवून आणली आहे. त्यावरून पिळवणूक ही मानवाला कीती व कशी भयंकर होत आहे हे दिसून येते. पिळवणूकीचे संपूर्ण उच्चाटन केल्याशिवाय मानव सुरक्षित होणार नाही.

पिळवणूक प्रवृत्तीने मानवी जीवन उद्‌वस्त करून टाकले आहे. त्याच्या जीवनाचे नंदनवन करण्यासाठी त्याच्या जीवनाची उभारणी सहकार्य प्रवृत्तीवर केली पाहिजे. सहकार्य प्रवृत्तीतून जाणारा मार्ग त्याला संपूर्ण सुरक्षितता मिळवून देईल.

मानवाने निर्माण केलेल्या साधनांचा पूर्ण उपभोग घेण्याच्या त्याच्या हक्काचे संरक्षण केले गेले पाहिजे. त्यातून त्याचे इतर सर्व हक्क सुरक्षित राहतील. त्याचा पूर्ण उपभोग घेण्याचा हक्क डावलल्या गेल्यामुळे अनर्थाला सुरुवात झाली आहे.

कामगार कारखान्यात आठ तास काम करुन रुपये वीस मिळवितो. शेतमजूर शेतात आठ तास काम करून पांच रुपये मिळवितो. आठ तास केलेल्या श्रमाचा मोबदला एकाला रुपये वीस, दुसऱ्याला रुपये पांच मिळतो. श्रम म्हणजे बुद्धी व शारिरीक शक्ती यांच्या साहाय्याने केलेल्या विशिष्ट हालचाली होय. रुपये वीस मिळविणाऱ्या कामगाराला श्रम करताना ज्यादा झीज करावी लागत नाही किंवा शेतमजूरांच्या श्रमातून त्याची कमी झीज होते, असेही घडत नाही. असे असताना एकाला त्याच्या आठ तासाच्या श्रमाचे रुपये वीस मिळतात. व दुसऱ्याला आठ तासाच्या श्रमाचे रुपये पाच मिळतात. म्हणजे ज्याला रुपये पाच दिले जातात त्याचा हक्क रुपये पंधरानी डावलला गेला असे दिसते.

येथे कामगाराने विशेष कौशल्य मिळविण्यासाठी त्याला जे श्रम आगोदर करावे लागतात त्याच्या मोबदल्यात त्याला अधिक रुपये

पंधरा दिले जातात असे म्हणणे योग्य होणार नाही. कारण त्याला ते नैपुण्य संपादन करताना साधनांची निर्मिती न करताही साधनांचा उपभोग घेत होता. म्हणून त्याला ते कौशल्य संपादन करता येते. म्हणून त्याला त्याच्या कौशल्याबद्दल ज्यादा मोबदला घेता येणार नाही.

कामगाराला जसे त्याचे कौशल्य वापरावे लागते तसे शेतमजुराला अंगमेहनत करावी लांगते. जसे कामगार त्याच्या कामातील कौशल्याचा दावा योग्य मोबदला मिळण्यासाठी करू शकले तसे शेतमजूर ज्यादा अंगमेहनतीचा दावा योग्य मोबदला मिळविण्यासाठी करू शकतो.

केवळ कौशल्य असले म्हणून त्याला ज्यादा मोबदला दिला जावा असे म्हणणे संयुक्तिक होत नाही. त्याने जे कौशल्य संपादन करण्याचे कारण त्या विषयाची असलेली त्याची आवड, गुणवैशिष्टचे व मिळालेली संधी हे असतात. त्याला अंगमेहनत करणे झेपावणारे नसेल. परंतु अंगमेहनत करणं हेही महत्वाचे आहे. ते केले गेले नाहीतर शेतातून अन्नधान्याची निर्मिती करता येणार नाही. ज्याची शारिरीक शक्ती जास्त आहे व ज्याला कौशल्याची कामे करणे आवडत नसेल त्याला अंगमेहनत करणे आवडेल. किंवा संधीचा अभाव यामुळे अंगमेहनत करावी लागेल परंतु त्याची अंगमेहनत आहे, केवळ याच कारणास्तव त्याला योग्य मोबदला न देणे हे संयुक्तिक होत नाही. त्यामुळे त्याने निर्माण केलेल्या साधनांचा उपभोग घेण्याचा त्याचा हक्क डावलला जातो व त्याच्या सुखप्राप्तीच्या हेतुत व्यत्यय आणला जातो. त्यातून जो असंतोष निर्माण होतो त्याचे द्वेषात रुपांतर होते.

द्वेश जेव्हा सार्वत्रिक दिसून येऊ लागतो तेव्हा वैमनस्य पसरू लागते. त्याच्या होणाऱ्या उद्रेकातून साधनांची हानी व मानवी हत्याकांड घडवून येते. मानवाचे अस्तित्व असुरक्षित होऊ लागते.

साधनांच्या निर्मात्याचा त्या साधनावरील उपभोगाचा त्याचा हक्क डावलल्यामुळे असंतोष निर्माण होऊ नये म्हणून त्याच्या

स्वातंत्र्यावर घाला घालण्यात येतो. त्याचे स्वातंत्र्य नष्ट झाल्यामुळे त्याच्यातील प्रतिकार आपोआप गळून पडतो.

स्वातंत्र्य ही निसर्गाने दिलेली मोठी देणगी आहे स्वातंत्र्य असल्याशिवाय त्याचे अस्तित्व अबाधित ठेवण्याचा प्रयत्नात तो यशस्वी होणार नाही. विश्व निर्मितीचे तत्व हे स्वातंत्र्यात आहे म्हणूनच ते अबाधित आहे. स्वातंत्र्य धोक्यात आले म्हणजे अस्तित्व अबाधित ठेवणे अशक्य ठरते. अस्तित्व टिकविण्याकरिता स्वातंत्र्य अपरिहार्य ठरते.

प्राण्यांना व पक्ष्यांना मुक्त सैर करण्याचे स्वातंत्र्य आहे त्यामुळे एका ठिकाणावरील भक्ष किंवा खाद्य संपुष्टात आले म्हणजे त्याचे अस्तित्व अबाधित रहावे याकरिता तो दुसऱ्या ठिकाणी जाऊन तेथील भक्ष्य किंवा खाद्य प्राप्त करू शकतो.

राष्ट्र या कल्पनेने त्याचे स्वातंत्र्य मर्यादित करून ठवलेले आहे. धर्म ही त्याच्या स्वातंत्र्यावर मर्यादा घालतो. समाज व कुटुंब यांनीही त्याचे स्वातंत्र्य मर्यादित करून ठेवले आहे. अशा अनेक प्रकारे मानवाच्या स्वातंत्र्यावर मर्यादा घालून ते सकुचित करून ठेवले आहे.

स्वातंत्र्यावर मर्यादा घालणाऱ्या कारणांच्या मुळाशी साधनांचा पूर्ण उपभोग घेण्याचा त्याचा हक्क डावलणे हे दडलेले असते, असे आढळून येते.

स्वातंत्र्यावर मर्यादा घालून प्रतिकार नष्ट करण्याच्या प्रयत्नांत त्याने स्वतःलाच असुरक्षित करून ठेवले आहे.

पूर्ण स्वातंत्र्य प्रस्थापित झाल्याशिवाय तो सुरक्षित होण्याच्या प्रयत्नात यशस्वी होणार नाही.

मानवाची सुरक्षितता धोक्यात आणली आहे ती प्रामुख्याने मानव-निर्मित संकटानी. ही संकटे त्याच्या पिळवणूक प्रवृत्तीतून निर्माण झालेली आहे. पिळवणूक प्रवृत्तीतून निर्माण होणारा विरोध दडपून टाकण्यासाठी त्याने त्यांच्या नैसर्गिक हक्कावर मर्यादा घातल्या.

स्वातंत्र्य या महत्वपूर्ण नैसर्गिक हक्कांची पायमल्ली करण्यात आली. पिळवणूकीतून निर्माण होणाऱ्या विरोधाला दडपण्यासाठी स्वातंत्र्यावर मर्यादा घालणे अपरिहार्य होते. स्वातंत्र्यावर कमी जास्त मर्यादा निर्माण झाल्याने त्यातून निर्माण होणाऱ्या संघर्षाला सामोरे जावे लागले असताना असुरक्षितता वाढत होती.

स्वातंत्र्यावर मर्यादा घातल्याने झालेले दुष्परिणाम म्हणजे दारिद्र्य गलामी व वैमनस्य. तर ओढावलेले संकटे म्हणजे गुन्हेगारी, संघर्ष व युद्ध. दुष्परिणामांनी त्याचे जीवन असहाय्य करून सोडले तर संकटानी त्याच्या अस्तित्वालाच धोका पोहचविला आहे.

सहकार्य प्रवृत्तीची प्रस्थापना केल्यामुळे होणाऱ्या पिळवणुकीच्या उच्चाटनातून त्याला भोगावी लागणारी दुष्परीणाम व भेडसावणारी संकटे याचेही निर्मूलन होईल व गेलेले स्वातंत्र्य परत मिळेल. सुरक्षिततेकडे त्याची वाटचाल सुरू होईल.

पुनरू जीवन झालेल्या स्वातंत्र्यात त्याच्या समोर केवळ नैसर्गिक संकटे व समस्या असतील, त्याचा वेध घेण्याकडेच त्याचे लक्ष केंद्रित होईल.

नैसर्गिक समस्या ह्या नैसर्गिक नियमांचे आकलन करून घेणे व त्याच्यांवर नियंत्रण प्रस्थापित करणे या स्वरूपात असेल तर नैसर्गिक संकटे म्हणजे वादळ, पाण्यामुळे घडून येणारे प्रलय, भूकंप रोग, नैसर्गिक मृत्यू ज्यातून त्याच्या अस्तित्वाला बाधा निर्माण होते. ते होय. त्याचा प्रतिबंध करून मानवाचे अस्तित्व अबाधित ठेवण्याचा प्रयत्न केले जातील. त्या प्रयत्नात तो यशस्वी झाल्याशिवाय राहणार नाही.

अस्तित्वाला बाधा निर्माण करणाऱ्या सर्व कारणाचा नायनाट करण्यात जेव्हा तो यशस्वी होईल तेव्हा त्याला पूर्ण सुरक्षित आवस्था प्राप्त होईल.

* * *

2099
23940
निषेध
2-6-2010


REFBK-0023450